- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक व अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/ सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/ चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : रा.प.महामंडळातील अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अदा करणेबाबत.

संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१७/२०१४ दि.१५.०९.२०१४
क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/४२८८, दि.१५.०९.२०१४

-----

रा.प.महामंडळातील अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या कर्मचा-यांना वाहतूक भत्ता अदा करणेबाबतीत संदर्भित परिपत्रकीय सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत, त्यामध्ये मुद्दा क्र.०२ नुसार " ज्या कर्मचा-यांना रा.प.महामंडळाने वाहतूक सुविधा ही पुरविली आहे, त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही." असे नमूद केले आहे. रायगड विभागातील काही कर्मचा-यांना त्यांच्या मागणी नुसार स्कुटर विथ ॲडॉप्शन सुविधा पुरविण्यात आली आहे. त्यानुसार त्यांना रू.५०,०००/- पर्यंत विना परतावा अर्थसहाय्य देण्यात आलेले आहेत. अशा कर्मचा-यांना सदरचा भत्ता द्यावा अगर कसे? याबाबत विभाग नियंत्रक, रायगड यांनी तसेच अन्य विभागानी मार्गदर्शन करण्याबाबत विनंती केली आहे.

त्या अनुषंगाने सूचना देण्यात येत आहे की, शासन निर्णय क्र.वाह.भ-२०१४/प्रकरण क्र.०५/ सेवा-५ दि.०३.०६.२०१४ नुसार अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या राज्य शासकीय व इतर कर्मचा-यांना वाहतूक भत्त्यामध्ये दि.०१.०४.२०१४ पासून वाढ केलेली आहे. तथापि सदरहू शासन निर्णयात नमूद केलेले आहे की, वाहतूक भत्त्याच्या प्रयोजनार्थ शासन निर्णय वित्त विभाग क्र.वाह.भ-२००९/प्र.क्र.७८/सेवा-०५ दि.०५.०४.२०१० मधील इतर विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहेत, त्याच प्रकारे यापुढे ही राहतील.

शासन निर्णय ०५.०४.१० मधील अनु.क्र.३(दोन) ची तरतूदी खालीलप्रमाणे आहत.

*ज्या कर्मचा-यांना महामंडळाने वाहतूक सुविधा पुरविण्यात आली आहे, त्यांना वाहतूक भत्ता अनुज्ञेय असणार नाही.*

उपरोक्त तरतूदीत ज्यांना शासकीय वाहतूक सुविधा पुरविण्यात आली आहे, त्यांना हा भत्ता अनुज्ञेय असणार नाही. म्हणजेच ज्या कर्मचा-यांना रा.प.महामंडळातर्फे कार्यालय ते निवासस्थान अशी बस सुविधा वा इतर वाहतूक सुविधा रा.प.महामंडळातर्फे पुरविली असल्यास त्यांना वाहतूक भत्ता देय होत नाही. त्यामुळे संबंधीत रा.प.महामंडळातील अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या कर्मचा-यांना शासनाच्या तरतूदीअधीन त्यांच्या सोयीनुसार व मागणी विचारात घेऊन स्कुटरकरिता रू.५०,०००/- पर्यंत विना परतावा अर्थसहाय्य पुरविण्यात आले असले तरी त्याचा इंधन खर्च हा स्वत: कर्मचा-यांच्या वतीने करण्यात येत असल्यामुळे रा.प.महामंडळातील अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या कर्मचा-यास स्कुटर विथ ॲडॉप्शन सुविधा पुरविण्यात आली असली तरी सदरचा वाहतूक भत्ता दि.०१.०४.२०१४ पासून अनुज्ञेय करण्यात येत आहे. त्यानुसार यथोचित कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने प्रसारीत करण्यात आले आहे.

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्रमांक ०७ /२०१५**

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ८८८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- २७ फेब्रुवारी,२०१५

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - शैक्षणिक आणि सामाजिकदृष्टया मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुंसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा.उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.

संदर्भ - १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२१ दि.०५ सप्टेंबर,२०१४
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १३/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२२ दि.०५ सप्टेंबर,२०१४
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१३३ दि.०६सप्टेंबर,२०१४

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकःबीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दिनांक २१ फेब्रुवारी,२०१५ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

Gaikwad
उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**प्रत सादर रवाना :-**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन/ प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/ (घटकसंवर्ग) यांचे माहितीसाठी.उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

(signature) १५/१/१९

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २१ फेब्रुवारी, २०१५.

वाचा:-

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.
२. शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि.१५ जुलै,२०१४.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२४.७.२०१४.

प्रस्तावना :-

उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश २०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३)** अन्वये **"शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्ग"** निर्माण करण्यात आला आहे. सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये १६ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. उक्त अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी १६ टक्के आरक्षण दिलेले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार संदर्भाधिन क्र. २ येथील दि.२४.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आलेली आहे.

**सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१३** या अध्यादेशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये सदर अध्यादेशास अंतरिम स्थगिती दिलेली आहे. सदर निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात शासनामार्फत विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती. मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. १८.१२.२०१४ च्या आदेशान्वये सदर विशेष अनुमती याचिका खारीज केली असून मा. उच्च न्यायालयाच्या दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये दिलेली अंतरिम स्थगिती कायम ठेवली आहे. तसेच महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ चे कायदयात रूपांतर होऊन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, ( महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ ) अस्तित्वात आला आहे त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- या शासन निर्णयान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि.१४.११.२०१४ रोजीचे स्थगिती आदेश विचारात घेऊन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे. :-

**अ)** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १५ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयातील शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गातंर्गत मराठा समाजास शासकीय/निमशासकीय सेवा ( सरळसेवा भरतीसाठी ) व शैक्षणिक संस्थांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याच्या निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.

शालेय शिक्षण, उच्च व तंत्र शिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि कृषी व पशु संवर्धन विभागांतर्गत शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विना अनुदानित शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या आरक्षणाव्यतिरिक्त १६ टक्के आरक्षण शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास देण्याबाबतची तरतूद दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात येत आहे.

**ब)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ३ येथील दिनांक २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात यावी. दि. १४ नोव्हेंबर, २०१४ नंतर शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरीता पूर्वीच्या आदेशांनुसार विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करुन ही पदे भरण्याची कार्यवाही करावी.

**क)** मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिलेल्या स्थगिती आदेशापूर्वी, शैक्षणिक संस्थांमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणांतर्गत झालेले प्रवेश अबाधित राहतील.

**ड)** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शासकीय/निमशासकीय सेवेमध्ये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे उमेदवारांच्या नेमणुका झाल्या असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधीन राहून त्या नेमणुका कायम राहतील.

**इ)** दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गांसाठी असलेल्या आरक्षणाच्या आधारे, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांना व शासकीय सेवेत नियुक्त झालेल्या उमेदवारांना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही संबंधित विभागांनी करावी.

**ई)** दि. १४ नोव्हेंबर २०१४ नंतर शैक्षणिक संस्थामध्ये द्यावयाच्या प्रवेशांबाबत शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी आरक्षण वगळता प्रचलित आदेशांनुसार कार्यवाही करावी.

**प)** शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास अशी पदे मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत भरण्यात येऊ नयेत. अशी पदे भरण्याबाबतचा निर्णय मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय झाल्यानंतर घेण्यात येईल. मात्र शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग वगळता उर्वरित पदे सदर जाहिरातीनुसार भरण्याची कार्यवाही करावी. कारण अशा बहुतांश प्रकरणात निवड प्रक्रिया सुरु झालेली असेल किंवा शेवटच्या टप्प्यात असल्यामुळे अशा जाहिराती रद्द करुन पुन्हा नव्याने जाहिरात देणे प्रशासकीय दृष्टया उचित ठरणार नाही.

**फ)** दि. १४ नोव्हेंबर २०१४ नंतर शासकीय व निमशासकीय सेवा भरती करताना पूर्वीच्या आदेशांनुसार वेळोवेळी विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करुन ही पदे भरण्याची कार्यवाही करावी.

उपरोक्त सर्व कार्यवाही ही मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात यावी

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था , शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

३. सरळसेवेव्दारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत वरीलप्रमाणे शासन निर्णयाचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २०/मावक, दिनांक २० फेब्रुवारी, २०१५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०२२११६४६०२८७०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( टि. वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव,
२. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५. मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७. मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,

९. प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०.प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११.सर्व विभागीय आयुक्त,
१२.सर्व जिल्हाधिकारी,
१३.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७. प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९.सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०.सचिव,राज्य माहिती आयोग,
२१.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५.संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७. संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८. संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३.सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३४.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३५.सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३६. निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्रमांक ०८ /२०१५**

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ९९९२
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :-०४ मार्च,२०१५

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशानुसार करावयाची कार्यवाही.

संदर्भ - १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२१ दि.०५ सप्टेंबर,२०१४
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १४/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२३ दि.०५ सप्टेंबर,२०१४
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १६/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१३४ दि.०६सप्टेंबर,२०१४
४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/१९९७
क्र.राप/आस्था/माजा-२/२८०४ दि.२०.५.१९९७

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकःबीसीसी -२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४/१६-ब, दिनांक २ मार्च,२०१५ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**प्रत सादर रवाना :-**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन/ प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/ (घटकसंवर्ग) यांचे माहितीसाठी.उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशानुसार करावयाची कार्यवाही.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक बीसीसी -२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४ /१६-ब**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
**दिनांक:- २ मार्च, २०१५.**

<u>वाचा:-</u>

१.सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १४, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ व या अध्यादेशाबाबत दि.१४ जुलै, २०१४ चे शुद्धिपत्र.

२. शासन निर्णय अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि२०१४/प्र.क्र.८१/का-७, दि.१९ जुलै,२०१४.

३. महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचीत जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम,२००१.

४. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७.

५. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१६-ए/२०१४ /१६-ब, दि.२४.७.२०१४

<u>प्रस्तावना :-</u>

उपरोक्त संदर्भाधिन क्रमांक १ येथे नमूद केलेल्या महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४)** अन्वये **"विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)"** निर्माण करण्यात आला आहे, सदर अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

उक्त अध्यादेशातील कलम ४ (१) नुसार व अल्पसंख्याक विकास विभागाच्या संदर्भाधीन क्रमांक २ येथील दिनांक १९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयानुसार सरळ सेवेच्या पदभरतीमध्ये विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) प्रवर्गासाठी ५ टक्के आरक्षण देण्यात आलेले आहे.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. बीसीसी १०९७/प्र.क्र.२/९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीमध्ये सुधारणा करुन, उक्त अध्यादेशातील कलम ८ (१) नुसार संदर्भाधिन क्र.५ येथील दि.२४.७.२०१४ च्या शासन निर्णयान्वये सरळसेवा भरतीच्या पदांसंदर्भात सुधारित बिंदुनामावली विहित करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश,२०१४ **(सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र.१४)** या अध्यादेशाच्या विरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका दाखल करण्यात आलेल्या आहेत.

या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये सदर अध्यादेशातील कलम ४ (१) मधील राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवामधील सरळ सेवा प्रवेश नियुक्त्यांमधील ५% नियुक्त्या विमाप्र-अ करिता राखून ठेवण्याच्या तरतुदीस अंतरिम स्थगिती दिलेली आहे. या अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्याने सदरचा अध्यादेश दि.२३.१२.२०१४ रोजी व्यपगत झालेला आहे. त्यास अनुसरुन शासन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**शासन निर्णयः-** **अ)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील दिनांक २४ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी दिनांक १४ नोव्हेंबर, २०१४ पासून स्थगित करण्यात येत असून, शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी १०९७/प्र.क्र.२/ ९७/१६-ब, दि. २९.३.१९९७ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या बिंदुनामावलीचा वापर करण्यात यावा.

**आ)** सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन क्रमांक ५ येथील शासन निर्णय, दिनांक २४ जुलै, २०१४ मधील कार्यपध्दतीनुसार, ज्या प्रकरणी भरती प्रक्रिया दिनांक १४.११.२०१४ पूर्वी पूर्ण झालेली नसेल, अशा प्रकरणी उपरोक्त मुद्दा क्रमांक (अ) मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अवलंबावी.

इ) दि २३.१२.२०१४.रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्र १४.चे कायद्यात रुपांतर न झाल्यामूळे सदर अध्यादेश व्यपगत झालेला आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेता, या विभागाचा संदर्भाधिन क्र ५ .येथे नमूद केलेला दि २४.७.२०१४.चा शासन निर्णय रद्द करण्यात येत आहे

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे, शासकीय अनुदान प्राप्त संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०३०२११५४४२४५०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(टि.वा.करपते)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रति,

१) राज्यपाल यांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
५) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
६) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
७) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
९) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१०) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१९) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२०) सचिव,राज्य माहिती आयोग,
२१) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२२) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२३) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२४) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२५) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२६) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२७) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२८) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२९) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३०) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३२) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३३) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३४) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३५) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
३६) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

कामगार करार २०१२-२०१६
परिपत्रक क्र.०८/२०१५

क्रमांकः राप/आस्था/४०८-ई(१)/ ११४७
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४०० ००८.
दिनांक :०५ मार्च , २०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/गडचिरोली/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय : कामगार करारानुसार १२ वर्षानंतर ज्या कर्मचा-यांचे श्रेणीकरण केलेले आहे आणि त्यांनी विद्यमान वेतनश्रेणीत पुन्हा १२ वर्षांची (एकूण २४ वर्षांची) अखंड सेवा केलेली आहे, त्यांचे श्रेणीकरणाबाबत.

संदर्भ : १) कामगार करार परिपत्रक क्रमांक १/२०१३
जा.क्र.राप/आस्था/७०२-जीई/२९७८, दिनांक ०४.०७.२०१३.
२)कामगार करार परिपत्रक क्रमांक ३/२०१३
जा.क्र.राप/आस्था/७०२-जीई/४९०३, दिनांक २८.१०.२०१३.

---

कामगार करार सन २०१२-२०१६ मधील मागणी क्रमांक ७६ नुसार, मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा करुन मान्य झालेल्या समझोत्याअधीन कर्मचारीवर्ग खात्याकडून संदर्भित परिपत्रकीय सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत. मात्र काही विभागांकडून याबाबत मार्गदर्शन अपेक्षित केलेले असल्याने, त्या अनुषंगाने उपरोक्त विषयांकीत बाबीमध्ये स्पष्टता आणण्यासाठी खालीलप्रमाणे सूचना प्रसारीत करण्यांत येत आहेत :-

कामगार करार सन १९९६ च्या तरतूदीअधीन चालक, सहाय्यक, सहाय्यक कारागिर, ही पदे वगळून, ज्या कर्मचा-यांनी त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीत १२ वर्षे अखंड व समाधानकारक सेवा पूर्ण केलेली आहे, त्यांना निकटवरच्या बढतीच्या वेतन श्रेणीत श्रेणीकरण करण्याची तरतूद आहे. कारण श्रेणीकरण ही संकल्पना विद्यमान पदामध्ये बढती मिळत नसल्यामुळे कामगार करारानुसार पर्याय उपलब्ध करुन दिला होता. आता, कामगार करार सन २०१२-२०१६ मधील समझोत्याअधीन, श्रेणीकरणाच्या विहित अटी व तरतूदीनुसार दिनांक ०१.०४.२०१२ रोजी व तदनंतर जे कर्मचारी त्यांच्या विद्यमान वेतनश्रेणीत १२ वर्षांची अखंड सेवा पूर्ण करीत आहेत, त्यांचे निकटवरच्या बढतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत प्रथम श्रेणीकरण केलेले आहे, असे कर्मचारी पुन्हा १२ वर्षांची म्हणजे एकूण २४ वर्षांची सेवा एकाच विद्यमान वेतनश्रेणीत पूर्ण करीत असतील, त्या कर्मचा-यांना निकटवरच्या बढतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत ३ टक्क्यांची एक वेतनवाढ देऊन, दुसरे श्रेणीकरण करण्याची तरतूद विहित केलेल आहे. तरी, पुढील दिलेल्या सूचनांचा विचार करुन, पात्र कर्मचा-यांची दुसरे श्रेणीकरण करुन, वेतन निश्चिती करण्यात यावी.

१) ज्या कर्मचा-यांना २४ वर्षांच्या कालावधीत नियमित बढती मिळालेली आहे, असे कर्मचारी सदरच्या श्रेणीकरणास पात्र असणार नाहीत.

२) कामगार करारात मान्य केल्याप्रमाणे, जे कर्मचारी अशा श्रेणीकरणास दिनांक ०१.०४.२०१२ पूर्वी पात्र झालेले असतील, अशा कर्मचा-यांना दिनांक ०१.०४.२०१२ पासून श्रेणीकरणाचे लाभ देय रहातील.

३) दिनांक ०१.०४.२०१२ पूर्वी ज्या कर्मचा-यांना २४ वर्षानंतरचे दुसरे श्रेणीकरण देय होत असेल व ज्यांना विद्यमान वेतनश्रेणीत व पदात २४ वर्षे अखंड सेवा पूर्ण झाली आहे, आणि त्यांना २४ वर्षानंतर दिनांक ०१.०४.२०१२ पूर्वी नियमित बढती मिळालेली आहे, अशा कर्मचा-यांच्या बाबतीत वेतन निश्चिती करताना कामगार कराराच्या तरतूदी अधिन दिनांक ०१.०४.२०१२ रोजी ३ टक्क्यांची एक वेतनवाढ देऊन, दुसरे श्रेणीकरण करण्यात यावे.

(उदा.लिपिक प्रवर्गातील कर्मचारी यांस दि.०६.१२.१९९७ रोजी १२ वर्षानंतर देय असलेली प्रथम श्रेणीकरण मिळाली असल्यास त्या कर्मचा-यांने एकाच वेतनश्रेणीत व पदात पुढील १२ वर्षाची म्हणजे एकुण २४ वर्षाची सेवा श्रेणीकरणाच्या अटी व तरतूदी अधिन दि.०८.१२.२००९ रोजी पूर्ण केल्यानंतर त्यांस २४ वर्षानंतर दुसरे श्रेणीकरण देय होईल. तद्नंतर सदरहू कर्मचारी वरिष्ठ लिपिक या नियमित बढती पदावर दि.१४.०१.२०११ रोजी नेमणूक झाली असली तरी त्यांनी एकाच पदात व वेतनश्रेणीत २४ वर्षाची सेवा दि.०८.१२.२००९ रोजी झालेली असल्याने त्यांस दुस-या श्रेणीकरणाचा लाभ दि.०१.०४.२०१२ रोजीच्या मुळवेतनावर ३ टक्केची एक वेतनवाढ देऊन वेतननिश्चिती करण्यात यावी.)

४) दिनांक ०१.०४.२०१२ नंतर ज्या कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ व निवडश्रेणी एकाच तारखेस येत असेल तर, अशा कर्मचा-यांना वार्षिक वेतनवाढ प्रथम देऊन, तद्नंतर श्रेणीकरणाची वेतननिश्चिती करण्यात यावी. तसेच, ज्या कर्मचा-यांची वार्षिक वेतनवाढ श्रेणीकरणाच्या तारखेनंतर ६ महिन्यांपर्यंत येत असेल, अशा कर्मचा-यांना प्रथम वार्षिक वेतनवाढ देऊन, तद्नंतर दुसरे श्रेणीकरणाची वेतननिश्चिती करण्यात यावी.

५) जे कर्मचारी दिनांक ३१.०३.२०१२ रोजी रा.प.महामंडळाच्या हजेरीपटावर होते, अशाच कर्मचा-यांना सदरच्या तरतूदी लागू राहतील.

६) जे कर्मचारी १२ वर्षानंतर श्रेणीकरणाच्या अटी व तरतूदी अधीन पात्र झालेले आहेत, अशा कर्मचा-यांना पुढील १२ वर्षानंतर देय होणा-या दुस-या श्रेणीकरणाबाबतही त्याच निकषाच्या आधारे ३ टक्क्यांची एक वेतनवाढ देऊन, श्रेणीकरण करण्यात यावे.

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये आपल्या विभागातील / घटकातील जी प्रकरणे निकाली काढण्यात आलेली नाहीत, अशी प्रकरणे वरील सूचनांनुसार निकाली काढण्यात यावीत.

सदरचे परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

D:\GAD\Settlement\Year २०१२-२०१६\Circular

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ९/२०१५

क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/ ९२८४
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०000८.
दिनांकः ११ मार्च, २०१५.

नक (वाहतूक)/
यापक (माहिती
धिकारी / उप
सहा. जनसंपर्क
व्यवस्थापकीय
रीवर्ग अधिकारी

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प. मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प. विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

(शीर्ष)

विषय : वय वर्षे ४० पुढील चालकांची आरोग्य तपासणी करणेबाबत.

संदर्भः १) क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/युआर/५३२ दि. ०६.०२.२०१२
२) परिपत्रक क्र. ०२/२०१४(क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/३२३ दि. १८ जानेवारी, २०१४)
३) परिपत्रक क्र. २१/२०१४(क्र. राप/कर्मवर्ग/प्रशा/५२९१ दि. १३ नोव्हेंबर, २०१४)

------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भित परिपत्रकान्वये वय वर्षे ४० किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या चालकांच्या बाबतीत आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

तथापि काही विभागांनी चालकांच्या आरोग्य तपासणी संदर्भात येणा-या अडचणीबाबत मार्गदर्शन मागितले आहे. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) चालकांची आरोग्य तपासणी ही शासकीय रुग्णालय, धर्मादाय रुग्णालय, शासकीय किंवा धर्मादाय पॅथोलॉजिकल सेंटर, नामांकित रजिस्टर्ड पॅथोलॉजिकल सेंटर मधून किंवा रोटरी क्लब, लायन्स क्लब किंवा अन्य सेवाभावी संस्था (N.G.O.) यांचेशी संपर्क साधून त्याच्यामार्फतच करुन घेण्यात याव्यात म्हणजे परिपत्रकीय सूचनेनुसार प्रतिचालक रु.५००/- पर्यंतच्या मर्यादिपर्यंतच्या खर्चामध्ये सदरच्या चाचण्या करुन घेता येतील.

तसेच याबाबत झालेला खर्च किंवा महिना अखेरीस झालेल्या तपासणीनुसार प्रतिचालक प्रत्यक्ष झालेला खर्च किंवा प्रतिचालक कमाल रु.५००/- या दोहोंपैकी जे कमी असेल त्या मर्यादेपर्यंत खर्च करण्याची परवानगी विभाग नियंत्रक यांना देण्यात येत आहे. वैद्यकीय खर्चाची रक्कम महामंडळाद्वारे तपासणी अहवाल प्राप्त झाले नंतर संबंधित संस्थेला अदा करण्यात यावी. तसेच सदरचा खर्च हा लेखाशिर्ष ३७२ ला खर्ची टाकण्यात यावा.

२) आरोग्य तपासणीसाठी शक्यतो वैद्यकीय संस्थेच्या कर्मचा-यांना रा.प. महामंडळाच्या कार्यालयाच्या ठिकाणी (आगारात) शक्य तितक्या चालकांना एकत्रित करुन वैद्यकीय आरोग्य तपासणीच्या टेस्ट करता येतील का ? याची पडताळणी करावी. अन्यथा संबंधित चालकाला त्यांच्या ड्युटी अॅडजस्ट करुन वैद्यकीय तपासणीकरिता पाठविण्यात यावे. सदरच्या सूचना वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांच्या सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहेत.

तरी, संदर्भित परिपत्रकांमध्ये देण्यात आलेल्या सर्व सूचना व या परिपत्रकातील सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात येऊन ४० वर्षांपुढील चालकांच्या आरोग्य तपासणीचा कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात यावा.

परिपत्रकाची पोच द्यावी.

Shandare
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रतः माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ)
(घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

उप महाव्यवस्थापक (कर्मचारी वर्ग)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १०/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ९३७९
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०००0८.
दिनांकः १६ मार्च, २०१५.

महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे/
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : प्रथम व व्दितीय आवेदनाबाबत

------

रा.प.महामंडळाच्या सुधारीत शिस्त व आवेदन कार्यप्रणालीमध्ये प्रथम व व्दितीय अपिल निकाली काढणे प्रकरणी खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत.

"अपिल प्राप्त झाल्याच्या तारखेपासून प्रथम अपिलाच्या प्रकरणी शक्य तर तीन महिन्याच्या आत कर्मचा-याला/ भूतपूर्व कर्मचा-याला निर्णय कळविण्यात येईल आणि व्दितीय अपिलाच्या बाबतीत तो चार महिन्याच्या आत कळविण्यात येईल."

वरील सूचना या स्पष्ट असतानाही प्रथम व व्दितीय आवेदने वेळेवर निकाली काढली जात नाहीत. त्यामुळे प्रथम व व्दितीय आवेदने मोठया प्रमाणात प्रलंबित राहत आहेत. तसेच याबाबत कर्मचा-यांच्या तक्रारीही उद्भवत आहेत. सदर बाब अत्यंत गंभीर आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे पुन्हा सूचना देण्यात येत आहेत की, रा.प.महामंडळातील कर्मचा-याने प्रथम अपिल विहीत मुदतीत संबंधित सक्षम प्राधिका-याकडे सादर केल्यानंतर तीन महिन्याचे आत निकाली काढण्यात यावे व तसे संबंधित कर्मचा-यास एक महिन्याच्या आत कळविण्यात यावे. तसेच व्दितीय आवेदनही संबंधित सक्षम प्राधिका-याकडे प्राप्त झाल्यापासून तीन महिन्याच्या आत निकाली काढण्यात यावे व तसे संबंधित कर्मचा-यास एक महिन्याच्या आत कळविण्यात यावे.

विभागांच्या कामकाजावर महाव्यवस्थापक (आवेदन) यांनी नियंत्रण ठेवावे व सक्षम प्राधिका-याद्वारे निकाली काढलेल्या प्रथम आवेदनांच्या प्रकरणांची माहिती विभागांकडून प्राप्त करुन घेऊन मध्यवर्ती कार्यालयाकडे प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठविण्यात यावी.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

परिपत्रकाची पोच द्यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रतः माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (कां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ)
(घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारी वर्ग)

कामगार करार २०१२-१६
परिपत्रक क्र. ०९/२०१५

क्रमांकःराप/आस्था/७०२-जीई / ७५५४
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४००००८
दिनांक : २५।३।२०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक व अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : कामगार करार सन २०१२-२०१६ मधील मागणी क्र.८४ मधील तरतूदी बाबत.**

-----

कामगार करार २०१२-२०१६ मधील मागणी क्र.८४ अन्वये खालीलप्रमाणे समझोता झालेला आहे.

| मागणी क्रमांक | मागणी/मुद्दा | समझोता |
|---|---|---|
| ८४ | प्रसूतीनंतर कामावर हजर झालेल्या महिला कर्मचा-यांस स्तनपानासाठी वेळ राखून ठेवावा. | सदरची मागणी तत्वतः मान्य करण्यात येत आहे. |

उपरोक्त करारातील समझोत्या अधिन रा.प.महामंडळातील महिला कर्मचा-यांस त्यांचे सेवाकालावधीत प्रसूतीनंतर कामावर हजर झाले नंतर (दोन अपत्यापर्यंत) स्तनपानासाठी वेळ राखून ठेवण्यासंबधी महाराष्ट्र प्रसूती लाभ कायदा १९६५ मधील खंड-६ च्या तरतूदी अधिन सूचना देण्यात येत आहे की, रा.प.महामंडळातील महिला कर्मचारी यांस प्रसूतीच्या दिवसापासून १५ महिने या कालावधी पर्यंत किमान ५ मिनिटे व कमाल १५ मिनिटे या मर्यादेत त्यांचे शिशुस स्तनपान करण्यासाठी दैनंदिन कामगिरीच्या दरम्यान दोन वेळेस सदरची सवलत देण्यात येईल.

कामाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी स्वंतत्र्यपणे खाजगी पाळणाघराची व्यवस्था असल्यास वा पर्यायी व्यवस्था कर्मचा-याच्या वतीने करण्यात आली असेल अथवा कुटुंबातील सदस्य यांनी त्यांचे जबाबदारीवर शिशुस स्तनपान करण्यासाठी कामाच्या ठिकाणी आणणे शक्य होत असल्यास रा.प.च्या महिला विश्रांती गृहात महिला कर्मचा-यांस त्यांचे नियोजित कामगिरीच्या वेळेत दोनदा अपत्यास स्तनपानाकरिता किमान ५ मिनिटे व कमाल १५ मिनिटे या मर्यादेत सदरची सवलत देण्यात येईल.

महिला वाहकांच्या बाबतीत त्यांचे कामगिरी मुख्यालयाच्या आगार स्पर्शी फे-या असल्यास व दोन फे-या दरम्यान पुरेसा वेळ असल्यास १५ मिनिटांच्या मर्यादेपर्यंत दोन वेळा स्तनपानाची सवलत बस स्थानकावरील हिरकणी कक्षात देण्यात येऊन सदर सवलतीच्या वेळ स्प्रेड ओव्हर कामगिरी म्हणून ग्राहय धरण्यात येईल.

Sharbare

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/
महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/
मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/
मुख्य सांख्यिक अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /
कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/
(मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक ११ /२०१५

क्रमांकः राप/कर्मवर्ग/प्रशा/ १५५८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८.
दिनांक : २८ मार्च, २०१५.

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे/
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड
अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर / गडचिरोली.

विषय : शिस्त व आवेदन कार्यप्रणालीतील तरतूदीनुसार अपराध प्रकरणांचे पुनर्विलोकन करणेबाबत.
संदर्भ : सुधारीत शिस्त व आवेदन कार्यप्रणाली परिपत्रक क्र. १६/२००५, क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/२३००, दिनांक २७.०५.२००५

------

रा.प.महामंडळाने तयार केलेल्या शिस्त व अपिल कार्यपद्धतीमध्ये गैरवर्तणूकीची कृत्ये व त्याकरिता कसूरदाराने द्यावयाच्या शिक्षा याबाबत स्पष्ट उल्लेख केला असून याबाबत वेळोवेळी सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

सुधारीत शिस्त व आवेदन कार्यप्रणालीतील खंड ९ नुसार अपराध प्रकरणांचे पुनर्विलोकनाबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शन करण्यात आलेले आहे.

अपील प्राधिकाऱ्यास स्वतः होऊन चौकशीचे कागदपत्र मागविता येतील आणि त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे कोणत्याही प्रकरणातील निर्णयाचे एक वर्षाच्या आत पुनर्विलोकन करता येईल व सक्षम प्राधिका-याच्या शिक्षेचा आदेश बाजूस सारता येईल आणि प्रकरणपरत्वे शिक्षेत वाढ करुन किंवा ती कमी करुन त्याऐवजी स्वतःचे आदेश देता येतील किंवा सक्षम प्राधिकाऱ्याचे मूळ आदेश कायम ठेवता येतील.परंतु सक्षम प्राधिका-याने दिलेल्या शिक्षेमध्ये वाढ करण्याचे प्रस्तावित असेल तर अपचार करणाऱ्या कर्मचाऱ्याला "कारणे दाखवा नोटीस" देण्यात येईल.

शिस्त व आवेदन कार्यपद्धतीमधील तरतूद स्पष्ट असतानाही सक्षम अपिलीय प्राधिकाऱ्यांद्वारे अपराध प्रकरणांचे पुनर्विलोकन कारवाई केली जात नाही, असे निदर्शनास आले आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर आहे.

या परिपत्रकाद्वारे पुन्हा सूचित करण्यात येत आहे की, शिस्त व आवेदन कार्यपद्धतीमधील तरतूदीप्रमाणे अपराध प्रकरणी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे दिलेल्या शिक्षेच्या अनुषंगाने शिस्त व आवेदन कार्यप्रणालीतील तरतूदीनुसार पुनर्विलोकन करावे.

संबंधित सक्षम प्राधिकारी/ अपिलीय प्राधिकाऱ्याद्वारे पुनर्विलोकन केलेल्या प्रकरणाबाबतची माहिती महाव्यवस्थापक (आवेदन), प्रादेशिक कार्यालय, पुणे यांचेकडे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठविण्यात यावी.

महाव्यवस्थापक (आवेदन) यांच्याद्वारे विभागातील प्रथम आवेदने वेळीच निकाली काढली जातात किंवा नाही याबाबतचा पाठपुरावा संबंधित अपिलीय प्राधिकाऱ्याकडे करावा व त्याचबरोबर अपिलीय प्राधिकाऱ्याद्वारे पुनर्विलोकन केलेल्या प्रकरणाबाबतची व प्रथम अपील निकाली काढल्याबाबतची माहिती मध्यवर्ती कार्यालयाकडे प्रत्येक महिन्याच्या २० तारखेपर्यंत पाठविण्यात यावी.

सदरची बाब महत्त्वाची समजून कार्यवाही करावी.

Khankare

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

--२--

प्रतः माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग)/(मुख्यालय)/(मनुष्यबळ)/(घटकसंवर्ग)/ (प्रशासन)/ (सामान्य प्रशासन)

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

तात्काळ

क्रमांकः राप/कर्मवर्ग/प्रशा/ ९५८२
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४०० ००८.
दिनांक :२६ मार्च, २०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे/
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
- कार्यशाळा व्यवस्थापक,
  रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
  मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी/ नांदेड/अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय : वय वर्षे ४० पुढील चालकांची आरोग्य तपासणी करणेबाबत.
संदर्भः १) क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/युआर/५३२ दि.०६.०२.२०१२
२) परिपत्रक क्र.०२/२०१४(क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३२३ दि.१८ जानेवारी,२०१४)
३) परिपत्रक क्र.२१/२०१४(क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/५२९१ दि.१३ नोव्हेंबर,२०१४)
४) परिपत्रक क्र.९/२०१५ (क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१२८४ दि.११.३.२०१५)

------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भित परिपत्रकान्वये वय वर्षे ४० किंवा त्यापेक्षा जास्त वय असलेल्या चालकांच्या बाबतीत आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या सूचना प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

सदर विषय अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील असल्याने याबाबत आरोग्य विभाग,महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्याकडे वरिष्ठ स्तरावर चर्चा आयोजित करण्यात आली होती. सदर चर्चेमध्ये ४० वर्षांपुढील चालकांची आरोग्य तपासणी कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने आरोग्य विभाग यांना प्रस्ताव सादर करावयाचा असून प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील दिलेल्या विहीत नमुन्यात माहिती सादर करावयाची आहे.

| अ.क्र. | विभाग | आगार | एकूण चालकांची संख्या | ४० वर्षेपुढील चालकांची संख्या | वैद्यकीय तपासणी करण्यात आलेल्या चालकांची संख्या | वैद्यकीय तपासणी न केलेल्या चालकांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

तरी सर्व प्रादेशिक व्यवस्थापक यांनी आपल्या प्रदेशांतर्गत येणा-या सर्व विभागातील दिनांक १५.३.२०१५ पर्यंतची आगारनिहाय माहिती संकलित करुन विहीत नमुन्यात साक्षांकित करुन मुख्य कामगार अधिकारी यांना दिनांक ३०.०३.२०१५ पर्यंत पोहचेल अशी पाठविण्यात यावी. तसेच सदरची माहिती stadm@rediffmail.com येथे ई-मेल करण्यात यावी.

सदरची बाब अत्यंत तांतडीची समजण्यात यावी.

Guymaig

उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत सादर रवानाः

१) सचिव,म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई यांचे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी.
२) मुख्य कामगार अधिकारी यांचे माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

26.3.15 26.3.15

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२ /२०१५

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/युआर/ १६०६
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : २७.०३.२०१५.

- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : सरळसेवा भरती अंतर्गत चालक (कनिष्ठ) पदासाठी अर्ज केलेल्या व लेखी परिक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांना कागदपत्र छाननीसाठी बोलविण्याबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/२१०५ दिनांक १२.०५.२०१०.
२) या कार्यालयाचे पत्र क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५४९९ दिनांक १२.१०.२०१२.

...

संदर्भित पत्र क्र. २ अन्वये चालक (कनिष्ठ) पदातील उमेदवारांना लेखी परिक्षेत मिळालेल्या गुणांवर ४०% भारांक व वाहन चालन चाचणीत मिळालेल्या गुणांवर ६०% भारांक देऊन तोंडी मुलाखत न घेता एकत्रित भारांकावर गुणवत्तेनुसार निवड करण्याबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

रा.प.महामंडळ ठराव क्र.२०१०:०२:०२ दिनांक ०१.०२.२०१० अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार चालक (कनिष्ठ), वाहक (कनिष्ठ), सहाय्यक वाहतूक निरिक्षक (कनिष्ठ), प्रमुख कारागिर (कनिष्ठ), कारागिर "क" (कनिष्ठ) व सहाय्यक (कनिष्ठ) या पदांच्या बाबतीत भरतीबाबतची सुधारित कार्यपध्दती व निवडीचे निकष खाली नमुद केल्याप्रमाणे संदर्भित पत्र क्र. १ नुसार प्रसारित करण्यात आले होते. त्यामधील चालक (कनिष्ठ) पदातील निवडीचे निकष खालीलप्रमाणे होते.

| अ. क्र. | पद | वस्तुनिष्ठ लेखी परीक्षेसाठी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण | वाहन चालन चाचणी/ व्यवसाय चाचणी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण. | मुलाखतीस बोलवावयाच्या उमेदवारांचे प्रमाण | प्रत्यक्ष मुलाखती साठी गुण शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रानिमं-२००७/ प्र.क्र.४६/०७/१३-अ दि.१९.१०.०७ अनुसार | अंतिम निवडीसाठी निकष शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-२००७/ प्र.क्र. ४६/०७/१३-अ दि.१९.१०.०७ वर आधारित. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | चालक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br><br>उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br><br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | लेखी चाचणीत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून त्या त्या जाती प्रवर्गातील लेखी परीक्षेत मिळालेल्या गुणां नुसार १:५ या प्रमाणात उमेदवारांना वाहन-चालन चाचणी साठी बोलाविण्यात येईल. १०० गुणांची वाहन चालन चाचणी घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी किमान ५० गुण आवश्यक. | वाहन चालन चाचणीत उत्तीर्ण झालेल्या त्या त्या जाती प्रवर्गातील वाहन चालन चाचणीत मिळालेल्या गुणांनुसार १:३ या प्रमाणात उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल. | १०टक्के | १) लेखी चाचणी मधील गुणांवर ४० टक्के भारांक, वाहन चालन चाचणी मधील गुणांवर ५० टक्के भारांक व मुलाखती मधील गुणांवर १० टक्के भारांक काढून गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल.<br><br>२) एम.एस.सी.आय.टी. कोर्स पूर्ण केलेल्या उमेदवारांना प्राधान्य. |

-२-

दिनांक २६.१२.२०१४ रोजी झालेल्या रा.प.संचालक मंडळाच्या बैठकीसमोर उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास महामंडळ ठराव क्र. २०१४:१२:०९ दिनांक २६.१२.२०१४ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार चालक (कनिष्ठ) पदातील सुधारित कार्यपध्दती व निवडीच्या निकषांच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

| अ. क्र. | पद | वस्तुनिष्ठ लेखी परीक्षेसाठी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण | वाहन चालन चाचणी/ व्यवसाय चाचणी गुण व उत्तीर्णतेसाठी किमान आवश्यक गुण. | अंतिम निवडीसाठी निकष शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-१०११/प्र.क्र.-९९/ ११ /१३-अ दिनांक २६.१२.११ वर आधारित. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | चालक (कनिष्ठ) | १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल.<br>उत्तीर्णतेसाठी किमान ३५ टक्के गुण आवश्यक.<br>पुरेसे उमेदवार न मिळाल्यास मागासवर्गीयांसाठी ३० टक्के पर्यंत शिथिलक्षम. | चालक (कनिष्ठ) पदासाठी अर्ज केलेल्या उमेदवारापैकी लेखी परीक्षेमध्ये खुल्या प्रवर्गातील ३५ व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेले व मागासवर्गीय प्रवर्गासाठी ३० व त्यापेक्षा जास्त गुण प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांना चालक (कनिष्ठ) पदाच्या कागदपत्र छाननीसाठी बोलाविण्यात येईल व छाननीमध्ये पात्र आढळल्यास सर्व उमेदवारांना वाहन चालन चाचणीसाठी बोलाविण्यात येईल. २५ गुणांची वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी - पुणे येथील संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर घेण्यात येईल. उत्तीर्णतेसाठी प्रत्येक चाचणी प्रकारात किमान ५० टक्के गुण आवश्यक. | लेखी परीक्षेमधील गुणांवर ४० टक्के भारांक, वाहन चालन चाचणी मधील गुणांवर ६० टक्के भारांक या एकत्रित भारांकानुसार मुलाखत न घेता जात प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे अंतिम निवड केली जाईल. |

वर नमुद केलेल्या सुचनां व्यतिरिक्त संदर्भित परिपत्रकातील सुचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

Gujrat ९।५

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.९३/२०१५

क्रमांक:राप/आस्था/७०२-जीई/ ११०८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४०० ००८
दिनांक : १०/०४/२०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक व अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : नक्षलग्रस्त व अतिसंवेदनशील क्षेत्रात काम करणा-या अधिकारी / कर्मचारी यांना प्रोत्साहन भत्ता अदा करतांना प्रत्यक्ष वास्तव्याच्या अटीबाबत.**

**संदर्भ : १) क्र.राप/आस्था/७०२-जीई/२९१४, दि.०१.०६.१९९५**
**२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२००९**
**क्र.राप/आस्था/७०२-जीई/३४९०, दि.२१.०८.२००९**

-----

संदर्भित कर्मचारीवर्ग खाते परिपत्रकाद्वारे यापूर्वी उपरोक्त विषयांकित प्रकरणी शासन निर्णयाधिन स्पष्ट सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापी दि.०३.१२.२०१४ रोजीच्या राज्यस्तरीय संयुक्त विचार विनिमय बैठकित मुद्दा घेण्यात आला की, नवापूर तालूक्यात वास्तव्यात असलेले व नवापूर आगारात कार्यरत असलेल्या कर्मचा-यांना शासननिर्णयानुसार वाढीव आदिवासी भत्ता देण्यात यावा. त्या अनुषंगाने स्पष्ट करण्यात येत आहे की, कामगार करार १९९२-१९९६ खंड ८ (२०) मधील समझोत्यानुसार शासनाने ठरवून दिलेल्या दराने व नियमाप्रमाणे भत्ता देण्यात येईल, अशी तरतूद विहित केलेली आहे. त्यानुसार प्रोत्साहन भत्ता व वास्तव्याच्या अटी संदर्भात शासनाकडे मार्गदर्शन मागिवले असता, मा.अवर सचिव, आदिवासी विस्तार विभाग यांनी त्यांचे पत्र क्र.प्रोभत्ता-२००६/प्र.क्र.-२२४/का.१५ दि.२२.०९.२००६ नुसार खालील प्रमाणे अत्यंत स्पष्ट स्वरूपात कळविलेले आहे.

"आदिवासी व दुर्गम क्षेत्रात नियुक्त केलेले अधिकारी/कर्मचारी राहत नाहीत, त्यांनी नियुक्तीच्या ठिकाणी वास्तव्य करून राहावे म्हणून प्रोत्साहन भत्ता देण्यात येतो. त्यामुळे ज्या कर्मचा-यांची अतिसंवदेनशील व नक्षलग्रस्त म्हणून घोषित केलेल्या क्षेत्रात नियुक्ती होते व जे कर्मचारी तेथे वास्तव्य करून राहतात त्यांनाच प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय ठरतो. जे अधिकारी/कर्मचारी नियुक्त मुख्यालयी प्रत्यक्ष व नियमितपणे वास्तव्य करीत नाहीत त्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय नाही. "

वर स्पष्ट केल्याप्रमाणे, शासन निर्णयान्वये जी गावे आदिवासी उपयोजना क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आलेली आहेत. त्या गावात राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचा-यांची प्रत्यक्ष नियुक्ती असेल त्यांना व ते तेथे प्रत्यक्ष वास्तव्यास रहात असतील त्यांना, प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय होईल. **मात्र जे अधिकारी/कर्मचारी नियुक्त ठिकाणी/मुख्यालयी राहत नाहीत व अन्य ठिकाणावरून ये-जा करतात त्यांना प्रोत्साहन भत्ता अनुज्ञेय असणार नाही.**

उपरोक्त शासकीय सूचना विचारात घेऊन सदरचा प्रोत्साहन भत्ता विहित अटी व तरतूदी अधिन अनुज्ञेय करण्यात यावा.

सदरहू परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने प्रसारीत करण्यात आले आहे.

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्रमांक १४/२०१५**

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ १८८४
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- १८ एप्रिल,२०१५

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - मा.राज्यपाल यांच्या अधिसुचने नुसार अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेली १२ संवर्गातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधुन भरण्याच्या अनुषंगाने करावयाची पुढील कार्यवाही.

संदर्भ - १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ३५/१९९७
क्र.राप/आस्था/माजा-२/६१३३ दि.१२.११.१९९७
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १२/२०१४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/४१२१ दि.०५ सप्टेंबर,२०१४
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ०७/२०१५
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/९९६ दि.२४ फेब्रुवारी,२०१५
४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ०८/२०१५
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/१११२ दि.०४ मार्च,२०१५

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांकःबीसीसी -२०१४/प्र.क्र.२१३A/१४/१६-ब, दिनांक ५ मार्च,२०१५ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**प्रत सादर रवाना :-**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन/ प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/ (घटकसंवर्ग) यांचे माहितीसाठी.उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**मा.राज्यपाल यांच्या अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील सुनिश्चित केलेली १२ संवर्गातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधुन भरण्याच्या अनुषंगाने करावयाची पुढील कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र. : बीसीसी -२०१४/ प्र.क्र.२१३A /१४/१६-ब**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
दिनांक: ५ मार्च, २०१५.

<u>वाचा:-</u> १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०७२/जे, दि.६ जून १९७२.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी ११८७/२७७६/सीआर २९६/८७/१६-ब, दि.१५ ऑक्टोबर.१९८७.
३) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९३/२१६७/सीआर १४१/९३/१६-ब, दि.१८जून १९९४.
४) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९३/२१६७/सीआर १४१/९३१६-ब, दि. १ सप्टेंबर, १९९७.
५) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी १०९८/प्र.क्र-११६/९८/१६-ब, दि.२० सप्टेंबर १९९९.
६) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २००१/३५३/प्र.क्र-१४/२०००/१६-ब, दि.१३ ऑगस्ट २००२.
७) महाराष्ट्र राज्य लोकसेवा (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जाती (विमुक्त जाती),भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागासवर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम, २००१
८) शासन अधिसूचना क्र.आरबीटीसी/ई-१३०१३(४)/अधिसूचना-१/४७४/२०१४, दि.९ जुन,२०१४
९) शासन अधिसूचना क्र.आरबीटीसी/ई-१३०१३(४)/अधिसूचना-२/४७४/२०१४/७३०, दि.१४ ऑगस्ट,२०१४
१०) शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१४/प्र.क्र.२१३A/१४/१६-ब, दि.३१ जुलै,२०१४
११) शासन अधिसूचना क्र.आरबीटीसी/ई-११०१९(१६)(२०१४)/अधिसूचना-५/११२२/२०१४, दि.३१.१०.२०१४

**प्रस्तावना:-**

राज्यात शासकीय सेवेमध्ये सरळसेवा पद भरतीमध्ये अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी ७ टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे.

२. वरील संदर्भाधीन अनु.क्र. १ ते ६ येथील शासन निर्णयान्वये १९७२ पासून व तद् नंतर वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार आदिवासी बहुल जिल्हयात अनुसूचित जमातीच्या लोकसंख्येच्या आधारे जिल्हा निहाय संवर्गातील गट-क व गट-ड सेवांमधील पदे भरतांना अनुसूचित जमातीसाठी खालील प्रमाणे वाढीव आरक्षण विहित केले आहे. :-

| जिल्हा | ठाणे | धुळे | नाशिक | रायगड | नंदुरबार | चंद्रपूर | यवतमाळ | गडचिरोली |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण | २२% | २२% | २२% | ९% | २२% | १५% | १४% | २४% |

३. संदर्भाधीन अनु. क्र.८ येथील अधिसूचनेन्वये मा.राज्यपाल महोदयांनी भारतीय राज्य घटनेच्या पाचव्या सूचीतील परिच्छेद ५ मधील उप परिच्छेद १ नुसार प्रदान केलेल्या अधिकारानुसार, अनुसूचित क्षेत्रामध्ये देण्यात येणाऱ्या विविध सेवा सुविधांच्या दर्जामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने, अनुसूचित क्षेत्रामधील आदिवासींच्या सर्वांगीण विकासास गती देण्याकरिता, स्थानिक बोली-भाषा आणि संस्कृतीच्या ज्ञानाच्या अभावी निर्माण होणारे संदेशवहनाचे प्रश्न सोडविण्यासाठी, अनुसूचित क्षेत्रामधील विविध संस्थांमध्ये कर्मचारीवृंदाच्या वारंवार गैरहजर राहण्यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याच्या हेतूने आणि अनुसूचित क्षेत्रामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या कल्याण व प्रगती करिता शासनामार्फत राबविण्यात येणारे कार्यक्रम आणि योजनांच्या अंमलबजावणीच्या दर्जात सुधारणा करण्याकरिता, अनुसूचित क्षेत्रामधील सरळसेवेने भरण्यात येणारी १) तलाठी, २) सर्वेक्षक, ३) ग्रामसेवक, ४) अंगणवाडी पर्यवेक्षक, ५) शिक्षक, ६) आदिवासी विकास निरीक्षक, ७) कृषि सहाय्यक, ८) पशुधन विकास सहाय्यक,९) परिचारिका व १०) बहुद्देशिय आरोग्य कर्मचारी या दहा संवर्गातील रिक्त असलेली पदे स्थानिक अनुसूचित जमातीमधील उमेदवारांमधूनच भरण्याचे आदेश दिलेले आहेत.

३.१ संदर्भाधीन अनु. क्र.९ येथील दि.१४.८.२०१४ च्या अधिसूचनेन्वये "पशुधन विकास सहाय्यक" या पदाऐवजी "पशुधन विकास पर्यवेक्षक" असा पदनामात बदल करण्यात आला असून नव्याने "वन रक्षक" या पदाचा समावेश करण्यात आलेला आहे. संदर्भाधीन अनु. क्र.१० येथील दि.३१.१०.२०१४ च्या अधिसूचनेन्वये "कोतवाल" या पदाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे संवर्गाची संख्या १२ अशी झाली आहे.

४. या विभागाच्या संदर्भाधीन अनु.क्र.१० येथील दि.३१ जुलै,२०१४ च्या परिपत्रकान्वये उपरोक्त अनुसूचित क्षेत्रातील दहा संवर्गातील सर्व रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमाती मधील उमेदवारांमधून भरण्याबाबतच्या सूचना नियुक्ती प्राधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

५. मा.राज्यपाल यांच्या अधिसूचनेनुसार करावयाच्या कार्यवाहीबाबत सविस्तर सूचना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत आता पुढील प्रमाणे सूचना या शासन निर्णयान्वये देण्यात येत आहेत:-

## शासन निर्णय:-

१) ठाणे, पालघर, नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर, पुणे, नांदेड, अमरावती, यवतमाळ, गडचिरोली व चंद्रपूर या जिल्हयांमध्ये अनुसूचित क्षेत्राचा समावेश होत आहे.

२) अनुसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या तालुक्यांची/गावांची खात्री सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी आदिवासी विकास विभागाकडून करावी. तसेच आदिवासी विकास विभागाने सदर गावांची सद्य:स्थिती दर्शविणारी तालुकानिहाय यादी सर्व विभागांना उपलब्ध करुन दयावी.

## अनुसूचित क्षेत्रांतर्गत करावयाची कार्यवाही

३) संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी प्रथमत: उपरोक्त १२ संवर्गात मंजूर असलेल्या पदांची अनुसूचित क्षेत्रात व अनुसूचित क्षेत्राबाहेर अशा दोन भागांत विभागणी करावी.

४) तद् नंतर अनुसूचित क्षेत्रामध्ये येणाऱ्या मंजूर पदांची व कार्यरत पदांची संख्या निश्चित करावी.

५) यापुढे, अनुसूचित क्षेत्रातील सर्व रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरावयाची आहेत. ही कार्यवाही करत असतांना, सध्या अनुसूचित क्षेत्रात कार्यरत असलेली पदे खालील तक्त्याप्रमाणे दाखविण्यात यावीत.

| अनु. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | प्रवर्ग | नियुक्तीचा दिनांक | स्थानिक/ अस्थानिक |
|---|---|---|---|---|
| | | | | |

६) अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदांवर स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून पदभरती करणे आवश्यक आहे. त्याकरीता सद्य:स्थितीत अनुसूचित क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या स्थानिक अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांस प्रथम अनुसूचित क्षेत्रात जाण्यास इच्छुक आहेत किंवा नाहीत याबाबत त्यांचा विकल्प घेण्यात यावा.

७) सद्य:स्थितीत अनुसूचित क्षेत्राबाहेर कार्यरत स्थानिक अनुसूचित क्षेत्रातील उमेदवारांनी अनुसूचित क्षेत्रात काम करण्याचा विकल्प दिल्यास अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे प्रथम त्यांच्या मधून भरण्यात यावीत.

८) वरील प्रमाणे विकल्पानुसार बदलीने पदभरती केल्यानंतर अनुसूचित क्षेत्रात रिक्त पदे राहिल्यास ती जाहिरातीव्दारे विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन स्थानिक अनुसूचित जमातीतील उमेदवारांमधून भरण्यात यावीत, त्यापैकी १/३ (एक तृतीयांश) पदे स्थानिक अनुसूचित जमातीतील महिला उमेदवारांमधून भरण्यात यावीत.

**अनुसूचित क्षेत्राबाहेर करावयाची कार्यवाही**

**९) उपरोक्त १२ संवर्गात, अनुसूचित क्षेत्रातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरावयाची आहेत. उपरोक्त १२ संवर्गात अनुसूचित क्षेत्राबाहेर अनुसूचित जमातीसाठी ७ टक्के आरक्षण या शासन निर्णयान्वये लागू करण्यात येत आहे. तसेच इतर प्रवर्गांच्या आरक्षणाची टक्केवारी महाराष्ट्र राज्य लोकसेवा ( अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण) अधिनियम २००१ मधील कलम ४ (२) प्रमाणे लागू करण्यात यावी.**

१०) उपरोक्त मुद्दा क्र.३ प्रमाणे, उपरोक्त १२ संवर्गांची अनुसूचित क्षेत्राबाहेर येणारी मंजूर पदसंख्या निश्चित करावी व मंजूर पदसंख्येस वरील मुद्दा क्र ९ .मध्ये दर्शविल्याप्रमाणे आरक्षण लागू करण्यात यावे.

११) उपरोक्त १२ संवर्ग वगळता अन्य संवर्गात पूर्वीच्या संदर्भाधीन क्र.१ येथील दि.८.६.१९७२, संदर्भाधीन क्र. २ येथील दि. १५.१०.१९८७ , संदर्भाधीन क्र. ३ येथील दि.१८.६.१९९४, संदर्भाधीन क्र. ४ येथील दि.१.९.१९९७, संदर्भाधीन क्र. ५ येथील दि.२२.९.१९९९ आणि संदर्भाधीन क्र. ६ येथील दि.१३.८.२००२ च्या प्रशासकीय आदेशांप्रमाणे ज्या जिल्हयांसाठी अनुसूचित जमातीसाठी वाढीव आरक्षण विहित केले आहे ते लागू राहील.

महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग- अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे ) आरक्षण अध्यादेश, २०१४ (सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्र. १४ ) अन्वये “ विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए)” निर्माण करण्यात आला होता, सदर

अध्यादेशातील कलम ४(१) नुसार या प्रवर्गास सरळसेवेच्या पदभरतीमध्ये ५ टक्के आरक्षण विहित करण्यात आले होते. सदर अध्यादेशाचे कायद्यात रुपांतर न झाल्यामुळे हा अध्यादेश दि २३.१२.२०१४.रोजी व्यपगत झालेला आहे, ही वस्तुस्थिती विचारात घेता, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र. बीसीसी-२०१४/ प्र.क्र.२१६-ए /२०१४ /१६-ब, दि.२४.७.२०१४ हा शासन निर्णय, या विभागाच्या समक्रमांकाच्या दि. २ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे रद्द करण्यात आला आहे.

शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गाकरिता विहित केलेल्या आरक्षणाबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्र.बीसीसी-२०१३/प्रक ३५४/भाग-२/१३/१६-ब, दि.२१ फेब्रुवारी, २०१५ अन्वये निर्गमित केलेल्या सुचनांनुसार कार्यवाही करावी.

१२) मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या रिट याचिका क्रमांक ८७८३/२०१४ बिगर आदिवासी हक्क बचाव समिती विरूध्द महाराष्ट्र शासन व इतर, या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक २७.१.२०१५ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने, अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील अनुसूचित क्षेत्रातील आदिवासी विकास निरीक्षक आणि शिक्षक या भरती प्रक्रियेस स्थगिती दिली आहे. ही वस्तुस्थिती विचारात घेता, त्यांच्या कार्यक्षेत्रात न्यायालयीन निर्णयानुसार कार्यवाही करावी.

१३) मा.राज्यपालांच्या अधिसुचनेनुसार अनुसूचित क्षेत्रातील रिक्त पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरावयाची आहेत. असे करत असतांना, प्रथम अनुसूचित क्षेत्रात सध्या प्रवर्ग निहाय कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना, अनुसूचित क्षेत्राबाहेर रिक्त असलेल्या पदांवर त्या- त्या प्रवर्गात उपलब्धतेनुसार आणि त्यांचा विकल्प घेऊन बदलीने नियुक्ती दयावी व यामुळे रिक्त होणारी अनुसूचित क्षेत्रातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीमधील उमेदवारांमधून भरण्यात यावी. सद्य:स्थितीत जे कर्मचारी अनुसूचित क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांच्या बदल्या टप्प्याटप्प्याने कराव्यात. (करण्यात येणाऱ्या बदल्या विकल्पाच्या मर्यादेत पण जास्तीत जास्त अनुसूचित क्षेत्रातील संवर्गातील मंजूर पदांच्या साधारण प्रतिवर्षी २०% च्या मर्यादेपर्यंत प्रशासकीय सोईनुसार कराव्यात) तथापि अनुसूचित क्षेत्रातील पदे स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून भरल्यानंतरच अनुसूचित क्षेत्राबाहेर जाण्याचा विकल्प दिलेल्या कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करावे, हे करताना सेवाज्येष्ठ कर्मचा-याला प्रथम कार्यमुक्त करावे.

१४) वरीलप्रमाणे कार्यवाही पूर्ण होईपर्यंत संपूर्ण जिल्हयासाठी वरील १२ संवर्गाकरिता एकच बिंदुनामावली ठेवावी.

१५) अनुसूचित क्षेत्रात व अनुसूचित क्षेत्राबाहेर पद भरती करत असतांना सदर पद भरतीमुळे एकूण मंजूर पदांच्या संख्येत वाढ होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

१६) उक्त मार्गदर्शक सूचना सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणाव्यात. वरील प्रमाणे सर्व मार्गदर्शक सूचनांनुसार नियुक्ती प्राधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी.

१७) वरील प्रमाणे कार्यवाही केल्यानंतर पदभरती करतांना काही अडचणी उद्भवल्यास, विभागाने सविस्तर तपशीलासह प्रशासकीय विभागांमार्फत सामान्य प्रशासन विभागाकडे मार्गदर्शनासाठी प्रस्ताव सादर करावा. यासाठी योग्य ते निर्णय शासन मान्यतेने घेण्यास सामान्य प्रशासन विभागास या शासन निर्णयाद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.

सदरहू शासन निर्णय शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५०३०५१६४९३१७९०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( टि.वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. राज्यपाल यांचे सचिव
२. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
६. सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य
८. अपर मुख्य सचिव,(प्र.सु.,र.व का., वि.चौ.) सामान्य प्रशासन विभाग
९. अपर मुख्य सचिव,महसूल व वन विभाग
१०.अपर मुख्य सचिव, (कृषि), कृषि व पदुम विभाग
११.प्रधान सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग

१२.प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग

१३.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

१४.प्रधान सचिव, महिला व बालकल्याण विभाग

१५.प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग,

१६.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग

१७.सचिव, (साविस) सामान्य प्रशासन विभाग

१८. सचिव, शालेय शिक्षण विभाग

१९.सचिव, (पदुम) कृषि व पदुम विभाग

२०.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानसभा)

२१.प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधानपरिषद)

२२.सर्व विभागीय आयुक्त,

२३.सर्व जिल्हाधिकारी,

२४.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

२५.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,

२६.प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,

२७.प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,

२८. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,

२९.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,

३०.राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,

३१.सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,

३२.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,

३३.संचालक, समाजकल्याण, पुणे,

३४.आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,

३५.संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,

३६.संचालक, सेवायोजन, मुंबई,

३७.महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,

३८. महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,

३९.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

४०.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,

४१.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई

४२.निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

************

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१५/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/लैं.छ/ 230८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई-४००००८.
दिनांकः 30 एप्रिल, २०१५.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषयः कामाच्या ठिकाणी महिलांवर होणा-या लैंगिक अत्याचाराबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत.
संदर्भः १)परिपत्रक क्र.राप/आस्था/लैछ/६७२२ दि.३१.१२.२०१२.
२)कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र ११/२०१३ जावक क्र.राप/कर्मवर्ग/लैं.छ/ ४११९ दिनांक १६ सप्टेंबर, २०१३.

----------

उपरोक्त संदर्भित क्र.१ नुसार महिला लैंगिक अत्याचार तक्रार निवारण यंत्रणा समिती मध्यवर्ती कार्यालय स्तरावर निर्माण करण्यात आली होती. सदर समितीतील एक सदस्य सेवानिवृत्त झाल्याने व एका सदस्याची बदली अन्यत्र झाल्याने सदर समिती निरसीत करुन नव्याने खालील प्रमाणे तक्रार निवारण यंत्रणा समिती पुनर्गठीत करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | श्रीमती सी.ए.पालकर | सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| २ | सदस्य सचिव | श्रीमती वाय.वाय.कोरे | लेखा अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय, मुंबई |
| ३ | सदस्य | श्रीमती शिल्पा मल्होत्रा | सहा.लेखा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ४ | सदस्य | श्री.पी.बी.पवार | मुख्य कामगार अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ५ | सदस्य | श्री.एन.आर.तिवारी | यंत्र अभियंता (चालन) मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ६ | सदस्य | श्री.आर.डी.एडके | सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी,मध्यवर्ती कार्यालय,मुंबई |
| ७ | सदस्य | श्रीमती दिव्या तनेजा | अशासकीय सदस्य (टाटा सामाजिक विज्ञान संस्थान, मुंबई) |

परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

६५४/५/१५
उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रतः माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / उप महाव्यवस्थापक (विधी) / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / सहा.जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / अध्यक्षांचे स्वीय सचिव/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)

६५४/५/१५
उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १६/२०१५

क्र. राप//आस्था/युआर/५८६-हे/ २४७०
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : ७ .०५.२०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर/ नाशिक / अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : महाराष्ट्र सफाई कर्मचारी आयोग सन १९९८-९९ च्या अहवालावरील शिफारसीबाबत.

संदर्भ : १) राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१८५७ दिनांक २५.५.२००७.
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १३/२००८ - राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५१२२ दिनांक १८.११.२००८.

*****

महामंडळ ठराव क्र. २००७:०४:१९ दिनांक २१.०४.२००७ नुसार मेहतर, वाल्मिकी व भंगी समाजाच्या सफाईगार कर्मचा-यांच्या वारसास वारसाहक्काने सफाईगार पदी नियुक्ती देण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. त्या अनुषंगाने संदर्भित परिपत्रक क्र. २ नुसार सर्व विभागांना सुचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. लाड-पागे समितीच्या शिफारसीच्या अनुषंगाने वारसा हक्काने नेमणूक देण्यासंदर्भात खालीलप्रमाणे नमुद करण्यात येत आहे.

(अ) आता, लाड-पागे समितीच्या शिफारसीनुसार वारसा हक्काने नेमणूक देण्यासंदर्भात संचालक मंडळाने निर्णय घेऊन महामंडळ ठराव क्र. २०१५:०३:०८ दिनाक ०५.०३.२०१५ पारित केला आहे. त्यानुसार वरील संदर्भित परिपत्रक क्र. २ मधील अनुक्रमांक ०६ येथे "वरील कोणीही वारस उपलब्ध नसल्यास त्याचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारा जवळचा नातेवाईक किंवा नामनिर्देशित व्यक्ती यांचा समावेश आहे." त्याऐवजी "वारसा" या संज्ञेनुसार "कोणीही वारस उपलब्ध नसल्यास अथवा सदर वारसापैकी कोणीही सफाईचे काम करण्यास तयार नसल्यास संबंधित सफाई कामगाराचा सांभाळ करण्याची लेखी हमी घेणारी कोणीही नामनिर्देशित व्यक्ती" असा बदल करण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

(ब) उपरोक्त संदर्भित परिपत्रक क्र. २ नुसार मेहतर, वाल्मिकी व भंगी समाजातील उमेदवारांना वारसा हक्काने नियुक्ती देण्याबाबत सुचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. उपरोक्त महामंडळ ठरावानुसार त्याची व्याप्ती वाढविण्यात आली असून, मेहतर, वाल्मिकी व भंगी या व्यतिरिक्त अनुसूचित जातीतील महार व मांग या पोट जातींनासुध्दा "वारसा" हक्काचा लाभ देऊन महामंडळामध्ये सफाईगार पदी नियुक्ती देण्यास संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

वरील बदला व्यतिरिक्त संदर्भित कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १३/२००८ दिनांक १८.११.२००८ अन्वये दिलेल्या इतर सुचनांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वरील सुचनांची अंमलबजावणी उपरोक्त महामंडळ ठरावाच्या तारखेपासून अंमलात येईल.

कृपया परिपत्रकाची पोच देण्यात यावी.

६५५/७/५

उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

६५५/७/५

उप महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

SH\D:\2015\A-Circular.docx

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक १७ /२०१५

क्रमांक : राप/कर्मवर्ग/साप्र/ २६२१
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक : १६ मे, २०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई / पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक व अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा व यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : रजेचा हिशोब व नोंदी अद्ययावत ठेवणेबाबत.**

**संदर्भ : १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१८/२००२**
**(क्र.राप/आस्था/२१७-ऐ/३५५९ दि.०६.०७.२००२)**
**२) परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/साप्र/१२८८,दि.२३.०३.२००९**
**३) परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/साप्र/४४७०,दि.२८.१०.२०१०**

------

रजेचा हिशोब व नोंदी अद्यावत ठेवणेबाबत तसेच कर्मचा-यांनी उपभोगलेल्या रजेचे लेखा परिक्षण करून रजा पुस्तकात त्याची नोंद ठेवण्याबाबत वेळोवेळी उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी देखिल असे निर्दशनास येत आहे की, कर्मचा-यांच्या रजेच्या पुस्तिकेत संबधित कर्मचा-यांने वेळोवेळी घेतलेल्या रजेच्या नोंदी प्रशासनाकडून वेळीच केल्या जात नाहीत, तसेच रजा मंजूर करतांना शिल्लक रजेची नोंद घेतली जात नाही त्याचप्रमाणे रजा नोंदवहीची तपासणी लेखा शाखेकडून वेळोवेळी केली जात नसल्याने कर्मचा-यांच्या खाती शिल्लक रजा नसतांनाही रजा मंजूर केली जाते. त्यामुळे रा.प.महामंडळास आर्थिक भुर्दंड सहन करावा लागतो. याबाबत अंतर्गत लेखा परिक्षण तपासणी मध्ये रजेबाबतचे आक्षेप उपस्थित केले जातात. कर्मचारी सेवा निवृत्तीच्या उंबरठयावर असताना काही प्रसंगी त्यांच्या उपदानातून अतिरिक्त रजेची वसूली करावी लागते.

जे कर्मचारी/अधिकारी सेवा निवृत्त होणार असतील त्यांच्या सेवानिवृत्तीच्या ६ महिन्यापूर्वी सदर अधिकारी/कर्मचारी सेवेत रूजू झाल्यापासून रजा नोंदी तपासून घेणेबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१८/२००२ दि.०६.०७.२००२ (क्र.राप/आस्था/२१७-ऐ/३५५९ दि.०६.०७.२००२) अन्वये स्पष्ट सूचना दिलेल्या असतानाही त्या कडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे कर्मचारी सेवा निवृत्त होत असताना त्यांच्याकडून त्यांच्या सेवेच्या सुरूवातीपासून जादा उपभोगलेल्या रजेची रक्कम, सेवा निवृत्तीच्या देयकामधून वसूल करण्यात येते, तसेच मृत कर्मचा-यांच्या वारसांना अदा करण्यात येणा-या रक्कमेतूनही अशी वसूली केली जाते. याचा अर्थ कर्मचा-यांच्या सेवेच्या सुरूवातीपासूनच्या नोंदी विभागाकडून अद्ययावत ठेवण्यात येत नाहीत. कर्मचा-यांच्या अंतिम देय रक्कमेतून किंवा सेवानिवृत्तीच्या वर्षात अशी वसूली करावी लागणे हे योग्य नाही. विभागांनी रजेच्या नोंदी वेळोवेळी तपासून त्या मधील आवश्यक ती दुरूस्ती त्या वर्षातच करणे आवश्यक आहे.

वरील बाबी टाळण्यासाठी विभागांना सूचना देण्यात येत आहेत की, आपल्या विभागात संख्या बळावर असणा-या कर्मचा-यांच्या/अधिकारांच्या सेवेच्या सुरूवातीपासून ते दिनांक ३०.०४.२०१५ पर्यंत सर्व प्रकारच्या रजा नोंदी तपासून घ्याव्यात व रजा पुस्तकात आवश्यक त्या दुरूस्त्या कराव्यात. तसेच, जे अधिकारी / कर्मचारी दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत सेवानिवृत्त होणार आहेत, त्यांची रजा तपासणी प्राधान्याने करण्यात यावी. तसेच लेखा शाखेकडून त्याचे लेखा परिक्षण करून घ्यावे.

..२..

वरील सर्व बाबी विचारात घेता रजेचा हिशोब व अद्ययावत नोंदी ठेवण्याबाबत पुन्हा एकदा खालीलप्रमाणे **सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.**

१) कर्मचा-यांनी घेतलेल्या रजेच्या नोंदी रजा रजिस्टरला व रजा पुस्तकात वेळेवर करण्याची दक्षता घ्यावी. रजेचा हिशोब/नोंदी अद्यावत ठेवण्याबाबत कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१८/२००२ (क्र.राप/आस्था/२१७-ऐ/३५५९ दि.०६.०७.२००२) अन्वये दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

२) जे कर्मचारी रा.प.सेवेतून सेवानिवृत्त होणार असतील त्यांच्या रजा पुस्तिका लेखा शाखेकडून सहा महिन्यापूर्वी सुरूवातीपासूनच्या रजेच्या नोंदी तपासून घेण्यात याव्या.

३) कर्मचा-यांनी केलेल्या रजा नोंदीची तपासणी तसेच रजा पुस्तकात कर्मचा-याच्या खाती शिल्लक दर्शवलेली रजा याची तपासणी आस्थापना पर्यवेक्षक/विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी/कर्मचारीवर्ग अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.

रा.प अधिकारी/कर्मचारी यांना नियमानुसार देय असलेल्या भविष्य निर्वाह निधी/उपदान यासाठी आवश्यक ती नामनिर्देशन प्रपत्रे भरून घेण्यासाठी रा.प.कर्मचारी सेवा विनिमय मधील खंड १०९ येथे सूचना विहीत करण्यात आलेल्या आहेत. तसेच यास अनुसरून लेखा खाते व कर्मचारीवर्ग खाते यांचेकडून यापूर्वीच व वेळोवेळी सूचना देण्यांत आलेल्या आहेत. तरीही नामनिर्देशन पत्र भरलेले नसणे यासारख्या बाबींमुळे भविष्य निर्वाह निधी, उपदानाच्या रकमा कर्मचा-याच्या/अधिका-याच्या कायदेशीर वारसास मिळण्यास विलंब होतो हे लक्षात घेऊन पुनःएकदा स्पष्ट करण्यात येते की, आपल्या विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व रा.प.अधिकारी/कर्मचा-यांचे नामनिर्देशन अर्ज भरले आहेत किंवा नाही याची खात्री करून घ्यावी. जर अधिकारी/कर्मचारी यांनी नामनिर्देशन अर्ज भरले नसतील तर ते त्यांच्या कडून भरून घ्यावेत व त्याची नोंद वैयक्तिक दप्तर/सेवापुस्तकात ठेवावी.सदरचे काम दिनांक ३०.६.२०१५ पर्यंत १०० टक्के पूर्ण होणे आवश्यक आहे. याचबरोबर आपल्या विभागामध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा पुस्तकामधील नोंदी अद्ययावत ठेवण्याचे काम दिनांक ३०.६.२०१५ पर्यंत पूर्ण करण्यात यावे.

प्रादेशिक व्यवस्थापक यांनी आपल्या अखत्यारीत येणा-या विभागातील विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी, विभागीय लेखा अधिकारी यांची समिती नेमून त्यांचेमार्फत वरील बाबींची तपासणी करावी. उदा : एका विभागाची तपासणी अन्य विभागामार्फत करण्यात येऊन त्याप्रमाणे आपणामार्फत तातडीने तपासणी मोहिम राबविण्यात यावी.

मध्यवर्ती कार्यशाळेतील तपासणी खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

१) म.का.दापोडीची टिम - म.का.औरंगाबादची तपासणी करेल, २) म.का.औरंगाबादची टिम - म.का.नागपूरची तपासणी करेल, ३) म.का.नागपूरची टिम - म.का.दापोडीची तपासणी करेल.

तरी, याबाबतचा तपासणी कार्यक्रम दिनांक १.६.२०१५ ते दि.३०.६.२०१५ पर्यंत पुर्ण करुन त्याचा अहवाल संबंधीत विभागास / घटकास सादर करुन त्याची एक प्रत या कार्यालयास अवगत करावी. कार्यशाळा व्यवस्थापक यांनीही हा कार्यक्रम वर नमुद केल्याप्रमाणे पुर्ण करावयाचा आहे.

उपरोक्त दिलेल्या सूचनाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. वरील प्रमाणे लेखा परिक्षण केल्यानंतरही काही तक्रारी उद्‌भवल्यास याबाबत संबधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येईल त्याची नोंद घ्यावी.

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारी वर्ग)**

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ) (नियोजन/समन्वय) / (घटकसंवर्ग).

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारी वर्ग)**

महत्वाचे / तातडीचे :
कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १८ /२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ २८३८
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग, मुंबई-०८
दिनांक : ३०.०५.२०१५
०१६५७५

- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय : मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी-पुणे येथील संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चालक (कनिष्ठ) प्रवर्गातील उमेदवारांची वाहन चालन चाचणी घेण्यात येणार असल्याने कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.५२/८० मध्ये बदल करणेबाबत.

संदर्भ : १) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ५२/८० दिनांक २१.८.१९८०
२) महामंडळ ठराव क्रमांक २०१३:०६:२३ दिनांक २५.६.२०१३.
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५०९ दि.२८.१.२०१४
४) महामंडळ ठराव क्रमांक २०१४:०१:०९ दिनांक १.१.२०१४
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक ०६/२०१४ संदर्भ क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/२२९६ दिनांक १२.०५.२०१४.
६) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/२६११ दिनांक १६.०५.२०१५.

*****

उपरोक्त संदर्भ क्रमांक ५ वरील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना या परिपत्रकान्वये रद्द करण्यात येत आहेत.

उपरोक्त विषयासंदर्भात कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील परिशिष्ट "ब" मध्ये करावयाच्या बदलांबाबत खालीलप्रमाणे सुधारित सूचना देण्यात येत आहेत.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात चालक पदातील उमेदवारांसाठी वाहन चालन चाचणी घेण्याकरीता संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथ उभारण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पामध्ये फॉरवर्ड "8" ट्रॅक,रिव्हर्स "S" ट्रॅक,रिव्हर्स पार्किंग, अप ग्रेडियन्ट इत्यादी स्वतंत्र संगणकीय ट्रॅकवर चालन चाचणी घेण्यात येणार असल्याने महामंडळाचे वाहन चालक निवडीमध्ये संपूर्णतः पारदर्शकता येऊन सर्व चालकांची समान चाचणी होऊन चांगले कौशल्य असलेल्या चालकांची निवड होऊन प्रवाशी सुरक्षिततेची हमी राहणार आहे. तसेच कमीत कमी वेळेत जास्तीत जास्त उमेदवारांची सचोटीपूर्ण चाचणी होऊन चाचणी नंतर उमेदवाराचे निकालपत्र संगणकाद्वारे प्राप्त होणार असून त्यामुळे तक्रारीस वाव राहणार नाही. सदर पथावर सरळसेवा भरती सन २०१४ अंतर्गत चालक (कनिष्ठ) पदातील उमेदवारांच्या वाहन-चालन चाचण्या घेण्यात आलेल्या आहेत.

रा.प.महामंडळामध्ये चालक (कनिष्ठ) प्रवर्गातील उमेदवारांच्या भरतीच्या अनुषंगाने कार्यपध्दती सुचना कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक ५२/१९८० दिनांक २१ ऑगस्ट १९८० अन्वये प्रसारीत केलेल्या होत्या. सदर परिपत्रकामधील सूचनांप्रमाणे वाहन चालन चाचणी ही महामंडळाद्वारे गठीत केलेल्या विभाग नियंत्रक, उपयंत्र अभियंता, वाहतूक निरीक्षक (प्रशिक्षण) यांचा समावेश असलेल्या समितीद्वारे घेण्यात येते. या समितीचे सर्व सदस्य खालील बाबीवर आधारीत गुण चालकास प्रदान करतात.

| क्र. | तपशील | कमाल गुण |
|---|---|---|
| १) | चालकाची मुळ चालन पध्दती. | ३० |
| २) | मार्गावरुन गाडी चालविणे. | ३० |
| ३) | गाडी चालविताना द्यावयाचे संकेत.(सिग्नल) | २० |
| ४) | गाडी मागे घेणे / तसेच पार्क करणे. | १० |
| ५) | गाडीची तांत्रिक माहिती चालकांकरिता असलेले वाहतुकीचे संकेत व मानसिकता. | १० |
| | एकूण | १०० |

..२..

संगणकीकृत वाहन चालन पथावर वाहन चालन चाचणी घ्यावयाची झाल्यास उपरोक्त नमुद केल्यानुसार अस्तित्वात असलेली परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील वाहन चालन चाचणी समितीमार्फत घ्यावयाच्या गुणांच्या तरतुदीत परिशिष्ट "ब" मध्ये आवश्यक ते बदल करण्यास रा.प.संचालक मंडळाने महामंडळ ठराव क्रमांक २०१३:०६:२३ दिनांक २५.६.२०१३ अन्वये मान्यता दिलेली होती. त्यानुसार संदर्भित परिपत्रक क्र. ५ अन्वये सुचना प्रसारित करण्यात आल्या होत्या. सदर सुचना या परिपत्रकाद्वारे रद्द करण्यात येत असून खालीलप्रमाणे सुधारित सुचना प्रसारित करण्यात येत आहेत.

१) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० दिनांक २१.८.१९८० अन्वये चालकांच्या निवडीबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे.सदर कार्यपध्दतीमध्ये प्रादेशिक छाननी समितीद्वारे घेण्यात येत असलेल्या वाहन चालन चाचणी व्यतिरिक्त अन्य कोणताही बदल करण्यात येऊ नये. सदर कार्यपध्दतीमध्ये नमुद केल्यानुसार उमेदवारांच्या कागदपत्रांची प्राथमिक छाननी विभागीय पातळीवरील समितीमार्फत परिपत्रकांमधील सूचनांनुसार घेण्यात यावी व या छाननीमध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांना संबंधीत विभागांमार्फत मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे येथे आवश्यक त्या कागदपत्रांसह उचित कागदपत्र छाननी व संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर वाहन चालन चाचणी घेण्यासाठी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे येथे पाठविण्यात यावे.

२) मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे येथे या उमेदवारांच्या कागदपत्रांची व शारिरीक पात्रतेची छाननी कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील सूचनांप्रमाणे करण्यात यावी व त्यामध्ये पात्र ठरलेल्या उमेदवारांची संदर्भित परिपत्रकामधील सूचनांप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या प्रादेशिक छाननी समिती (Regional Screening Committee) ऐवजी संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर वाहन चालन चाचणी घेण्यात येईल.

३) संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चालक पात्र ठरल्यानंतर सदर चालक उमेदवारांना रा.प.महामंडळाच्या सध्याच्या कार्यपध्दतीनुसार वैद्यकीय तपासणी, ४८ दिवसांचे प्रशिक्षण व त्यानंतर यंत्र अभियंता (चालन) व विभागीय वाहतूक अधिकारी यांचेमार्फत अंतिम वाहन चालन चाचणी इत्यादी सध्याच्या कार्यपध्दतीनुसार करावयाची कार्यपध्दती सुरु राहील, त्यात कोणताही बदल करण्यात येऊ नये.

४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मधील परिशिष्ट "ब" (Annexure "B") मध्ये वाहन चालन चाचणी समितीमार्फत घ्यावयाच्या गुणाच्या तरतुदीत खाली नमुद केल्यानुसार आवश्यक ते बदल करण्यात यावे.

| क्र. | चाचणीचा प्रकार | वेळ (सेकंदात) | गुण | उत्तीर्ण होण्यासाठी ५०% गुण |
|---|---|---|---|---|
| १ | "8" ट्रॅक ( Forward "8" Test ) | ६० | ५ | २.५ |
| २ | चढावावरील चाचणी. (Up-Gradient Test) | ० | ५ | २.५ |
| ३ | "s" ट्रॅक वर गाडी मागे घेणे.(Reverse "s" Test) | ३०० | ७ | ३.५ |
| ४ | गाडी मागे घेणे व पार्किंग करणे (Reverse Parking Test) | ६० | ६ | ३ |
| ५ | वाहतूक निशाणी चाचणी.(Signal) | १२० | २ | १ |
| | एकूण | ५४० सें. | २५ | १२.५ |

**(i) "8" ट्रॅक (Forward "8" Test)**

सदर चाचणी करीता ६० सेकंद अवधी देण्यात आला आहे.

अ) सदर चाचणीस एकूण ६१ ते ७५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ०.५ गुण कपात करावा.

ब) सदर चाचणीस एकूण ७६ ते ९० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास १ गुण कपात करावा.

क) सदर चाचणीस एकूण ९१ ते १०५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास १.५ गुण कपात करावा.

ड) सदर चाचणीस एकूण १०६ ते १२० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास २ गुण कपात करावा.

ई) सदर चाचणीस एकूण १२१ ते १३५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास २.५ गुण कपात करावा.

फ) सदर चाचणीस एकूण १३६ ते १५० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ३ गुण कपात करावा.

च) सदर चाचणीस एकूण १५१ ते १६५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ३.५ गुण कपात करावा.

छ) सदर चाचणीस एकूण १६६ ते १८० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ४ गुण कपात करावा.

ज) सदर चाचणीस एकूण १८१ ते १९५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ४.५ गुण कपात करावा.

झ) सदर चाचणीस एकूण १९५ पेक्षा जास्त सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास काहीही गुण देण्यात येवू नये.

सदर चाचणीच्या वेळेस ट्रॅकमधील सेन्सॉर्सना स्पर्श केल्यास प्रत्येक स्पर्शाकरीता एक गुण कपात करण्यात यावा.

**(ii) S ट्रॅकवर गाडी मागे घेणे (Reverse "S" Test)**

सदर चाचणी करीता ३०० सेकंद अवधी देण्यात आला आहे.

अ) सदर चाचणीस एकूण ३०१ ते ३१५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ०.५ गुण कपात करावा.

ब) सदर चाचणीस एकूण ३१६ ते ३३० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास १ गुण कपात करावा.

क) सदर चाचणीस एकूण ३३१ ते ३४५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास १.५ गुण कपात करावा.

ड) सदर चाचणीस एकूण ३४६ ते ३६० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास २ गुण कपात करावा.

ई) सदर चाचणीस एकूण ३६१ ते ३७५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास २.५ गुण कपात करावा.

फ) सदर चाचणीस एकूण ३७६ ते ३९० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ३ गुण कपात करावा.

च) सदर चाचणीस एकूण ३९१ ते ४०५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ३.५ गुण कपात करावा.

छ) सदर चाचणीस एकूण ४०६ ते ४२० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ४ गुण कपात करावा.

ज) सदर चाचणीस एकूण ४२१ ते ४३५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ४.५ गुण कपात करावा.

झ) सदर चाचणीस एकूण ४३६ ते ४५० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ५ गुण कपात करावा.

य) सदर चाचणीस एकूण ४५१ ते ४६५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ५.५ गुण कपात करावा.

र) सदर चाचणीस एकूण ४६६ ते ४८० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ६ गुण कपात करावा.

ल) सदर चाचणीस एकूण ४८१ ते ४९५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ६.५ गुण कपात करावा.

व) सदर चाचणीस एकूण ४९५ पेक्षा जास्त सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास काहीही गुण देण्यात येवू नये.

सदर चाचणीच्या वेळेस ट्रॅकमधील आतील किंवा बाहेरील सेन्सॉर्सना स्पर्श केल्यास प्रत्येक स्पर्शाकरीता एक गुण कपात करण्यात यावा.

**(iii) गाडी मागे घेवून स्थानबध्द करणे (Reverse Parking Test)**

सदर चाचणी करीता ६० सेकंद अवधी देण्यात आला आहे.

अ) सदर चाचणीस एकूण ६१ ते ७५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ०.५ गुण कपात करावा.

ब) सदर चाचणीस एकूण ७६ ते ९० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास १ गुण कपात करावा.

क) सदर चाचणीस एकूण ९१ ते १०५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास १.५ गुण कपात करावा.

ड) सदर चाचणीस एकूण १०६ ते १२० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास २ गुण कपात करावा.

ई) सदर चाचणीस एकूण १२१ ते १३५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास २.५ गुण कपात करावा.

फ) सदर चाचणीस एकूण १३६ ते १५० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ३ गुण कपात करावा.

च) सदर चाचणीस एकूण १५१ ते १६५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ३.५ गुण कपात करावा.

छ) सदर चाचणीस एकूण १६६ ते १८० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ४ गुण कपात करावा.

ज) सदर चाचणीस एकूण १८१ ते १९५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ४.५ गुण कपात करावा.

झ) सदर चाचणीस एकूण १९६ ते २१० सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ५ गुण कपात करावा.

य) सदर चाचणीस एकूण २११ ते २२५ सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास ५.५ गुण कपात करावा.

र) सदर चाचणीस एकूण २२५ पेक्षा जास्त सेकंदापर्यंत वेळ घेतल्यास काहीही गुण देण्यात येवू नये.

सदर चाचणीच्या वेळेस ट्रॅकमधील सेन्सॉर्सना स्पर्श केल्यास प्रत्येक स्पर्शाकरीता एक गुण कपात करण्यात यावा.

..४..

**(iv) चढावावरील चाचणी (Up-gradiant Test)**

चढावावर एका विशिष्ठ ठिकाणी वाहन थांबविल्यानंतर

अ) वाहन पुन्हा पुढे नेताना २ इंचापर्यंत मागे आल्यास ०.५ गुण कपात करावा.

ब) वाहन पुन्हा पुढे नेताना २ इंचापेक्षा जास्त व ४ इंचापर्यंत मागे आल्यास १ गुण कपात करावा.

क) वाहन पुन्हा पुढे नेताना ४ इंचापेक्षा जास्त व ६ इंचापर्यंत मागे आल्यास १.५ गुण कपात करावा.

ड) वाहन पुन्हा पुढे नेताना ६ इंचापेक्षा जास्त व ८ इंचापर्यंत मागे आल्यास २ गुण कपात करावा.

इ) वाहन पुन्हा पुढे नेताना ८ इंचापेक्षा जास्त व १० इंचापर्यंत मागे आल्यास २.५ गुण कपात करावा.

फ) वाहन पुन्हा पुढे नेताना १० इंचापेक्षा जास्त व १२ इंचापर्यंत मागे आल्यास ३ गुण कपात करावा.

च) वाहन पुन्हा पुढे नेताना १२ इंचापेक्षा जास्त व १४ इंचापर्यंत मागे आल्यास ३.५ गुण कपात करावा.

छ) वाहन पुन्हा पुढे नेताना १४ इंचापेक्षा जास्त व १६ इंचापर्यंत मागे आल्यास ४ गुण कपात करावा.

ज) वाहन पुन्हा पुढे नेताना १६ इंचापेक्षा जास्त व १८ इंचापर्यंत मागे आल्यास ४.५ गुण कपात करावा.

झ) वाहन पुन्हा पुढे नेताना १८ इंचापेक्षा जास्त मागे आल्यास काहीही गुण देण्यात येवू नये.

**(v)** वाहतुक निशाणी ओळखणे चाचणी. (Identification of Traffic symbols )

सदर चाचणीकरीता चालक उमेदवारास ४ वाहतूक निशाण दाखविण्यात येऊन त्याखाली ८ निशांणाची नांवे दर्शविण्यात यावी व चालकाने ४ निशाणे व नांवे त्यांच्या जोडया अचूक ओळखाव्यात. सदर चाचणीकरीता २ मिनिटे देण्यात येणार आहेत व प्रत्येक बरोबर उत्तराकरीता ½ गुण देण्यात येईल. २ मिनिटाचे आत दिलेल्या उत्तरांचाच निकालाकरीता विचार होईल.

मुद्दा क्रमांक ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या तक्त्यामध्ये नमुद केल्यानुसार सदरची वाहन चालन चाचणी ही २५ गुणाची एकदाच घेण्यात यावी व प्रत्येक वाहन चालन चाचणी प्रकारात ५० टक्के गुण उत्तीर्ण होणेसाठी उमेदवाराने मिळविणे आवश्यक आहे. वाहन चालन चाचणीमध्ये उत्तीर्ण होणेसाठी वर नमुद केलेप्रमाणे सर्व चाचणी प्रकारामध्ये मिळून १२.५ गुण मिळविणे आवश्यक आहे. ( ५० टक्के गुण)

५) उपरोक्त क्रमांक ४ येथे नमुद केल्यानुसार मे.निपुण नेट सोल्युशन्स यांचेमार्फत सिस्टीममध्ये / सॉफ्टवेअरमध्ये आवश्यक ते बदल करण्याची जबाबदारी उप महाव्यवस्थापक (संगणित्र) यांची राहील.

६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ५२/८० मध्ये नमुद केल्यानुसार परिशिष्ट "ब" वर सही करणारे अधिकारी विभाग नियंत्रक, उप यंत्र अभियंता या दर्जाचे अधिकारी असले तरी यापुढे सुरु करावयाच्या संगणकीकृत वाहन चालन चाचणी नंतरच्या अहवालावर सर्टिफाईंग ऑफिसर म्हणून स्वाक्षरी करण्याकरीता कर्मचारीवर्ग खात्यामार्फत विभागीय वाहतूक अधिकारी किंवा उप यंत्र अभियंता यांची ८ दिवसांकरीता आळीपाळीने (रोटेशन पध्दतीने) नियुक्ती करण्यात येईल. तसेच, सदर चाचणी दरम्यान सुरक्षा खात्यामार्फत सुरक्षा खात्याचा अधिकारी किंवा पर्यवेक्षकीय दर्जाचा कर्मचारी देण्यात यावा. याबाबत चाचणीसाठी पाठविण्यात आलेल्या विभागामार्फत सुरक्षा व दक्षता खात्याशी समन्वय साधुन कार्यवाही पूर्ण करावी.

७) यापुढे होणा-या नवीन चालक भरतीमधील चालकांची वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे येथे घेण्यात येणार असल्याने आवश्यक असणारा कर्मचारीवर्ग (प्रत्येकी ५ प्रशिक्षित लिपीक-टंकलेखक - प्रत्येक १ आठवडयाकरिता) हा प्रत्येक विभागांनी पॅनल तयार करुन, त्यांना प्रशिक्षण देऊन या पॅनलचा वापर आवश्यकतेनुसार चाचणी दरम्यान करण्यात यावा.विभागातील कर्मचारीवर्गांना उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे यांचेमार्फत आवश्यक वेळापत्रक (Schedule) तयार करण्यात येऊन त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

८) सदर वाहन चालन चाचणीचे काम पुर्णपणे पारदर्शकतेने करण्याची जबाबदारी उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) व वरील अनुक्रमांक ६ नुसार संबंधीत विभागाकरीता नेमण्यात येणा-या सर्टिफाईंग ऑफिसर यांची राहील. तसेच सर्व चाचण्यांचे सी.सी.टिव्हीद्वारे चित्रिकरणांचे व संगणकीय तपशिलांचे जतन करण्याची जबाबदारी उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) यांची राहील.

..५..

९) संगणकीकृत वाहन चालन चाचणीपथ (ADTT) काही कारणास्तव बंद पडला असल्यास अथवा अपवादात्मक परिस्थितीमध्ये वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे येथील संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर न घेता सदर चाचणी विभागात घ्यावयाची झाल्यास अशावेळी परिपत्रक क्रमांक ५२/८० दिनांक २१.८.१९८० मधील प्रचलित कार्यपध्दतीनुसार वाहन चालन चाचणी पध्दत अवलंबिण्यात यावी.

१०) सध्याचे प्रणालीनुसार पाचही म्हणजेच प्रत्येक चाचणीमध्ये ५० टक्के गुण उत्तीर्ण होण्यांसाठी आवश्यक आहेत. परंतू पाच चाचण्या पूर्ण झाल्याशिवाय उमेदवाराच्या उत्तीर्ण/अनुत्तीर्ण निकाल निकालाचे तक्त्यावर येत नाही. त्यामुळे उमेदवाराच्या पाचही चाचण्या घ्याव्या लागतात व निकाल देण्यांस विलंब होतो. त्यामुळे चाचणी देताना ज्या चाचणीमध्ये उमेदवार प्रथमतः अनुत्तीर्ण होईल (म्हणजेच ५० टक्यापेक्षा कमी गुण मिळाल्यास) त्या उमेदवाराच्या त्या पुढील चाचण्या घेण्यात येऊ नये. यामुळे वेळेचा अपव्यय टाळता येणे शक्य होईल. सदरचा बदल संगणक प्रणालीमध्ये करण्यांबाबतची कार्यवाही उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) यांचेकडून त्वरीत करण्यात यावी. त्यामुळे वाहन चालन चाचणीची सध्याची प्रतीदिनी उमेदवारांची संख्या ५० ऐवजी ७० पर्यत वाढविणे शक्य होईल.

११) चाचणीस येणा-या उमेदवारांची चाचणी फक्त एकदाच घेण्यात यावी. वाहन चालन चाचणीचे आयोजन करतांना प्रथम सोप्या चाचणी पासुन सुरुवात करण्यात यावी.

१२) सदर चाचणी करीता दुहेरी नियंत्रणाच्या पाच बसेस प्रशिक्षकासहीत उपलब्ध करुन देण्यांबाबतची कार्यवाही महाव्यवस्थापक (यं.अ.), यांत्रिकी अभियांत्रिकी खाते यांचेमार्फत करण्यात यावी.

१३) सदर वाहन चालन चाचणी कालावधीमध्ये वैद्यकिय अधिकारी व अँब्युलन्स चाचणीचे ठिकाणी नियुक्त करणेबाबत कार्यवाही उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) यांचे मार्फत करण्यात यावी.

१४) चाचणी कालावधीमध्ये वाहन दुरुस्तीसाठी पाच कार्यशाळा कर्मचारी (१ आर्ट ए इलेक्ट्रिशिअन, १ टायर फिटर, १ आर्ट ए मँकेनिक व २ सहाय्यक) यांची नेमणूक टूलसह करण्यांबाबतची कार्यवाही संबंधित विभागामार्फत उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), म.प्र.सं.भोसरी, पुणे यांचेशी समन्वय साधून करण्यात यावी.

१५) चाचणी कालावधीमध्ये चाचणीच्या वेळी संगणकीय प्रणालीमध्ये काही व्यत्यय येवू नये यासाठी मे.निपूण नेट सोल्यूशन यांचे प्रतिनिधी आवश्यक त्या प्रणालीच्या स्पेअरपार्टसह उपस्थित रहाणे आवश्यक असल्याने त्याबाबतची कार्यवाही उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) हे उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) यांचे मदतीने करतील.

१६) संगणकीकृत वाहन चालन चाचणी पथावर चाचणी देणारे उमेदवार व तेथे काम करणारे कर्मचारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यांसाठी ध्वनिक्षेपण यंत्रणा बसवून घेण्याबाबत स्थानिक पातळीवर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. याबाबत मे.निपूण नेट सोल्यूशन्स यांचेकडे उपलब्ध असलेली संगणकीकृत घोषणा प्रणाली घेता येईल किंवा कसे याची शक्यता ही पडताळून पहावी. याबाबत उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण) यांचेमार्फत पाठपुरावा करण्यात यावा.

१७) मुद्या क्र. ४ नुसार चाचणी देताना सुधारीत बदलानुसार ज्या ठिकाणी प्रथमतः उमेदवार चाचणीमध्ये अनुत्तीर्ण होईल त्याच ठिकाणी त्याला अनुत्तीर्ण घोषीत करुन त्याच्या पुढील चाचण्या घेण्यात येऊ नयेत. सदरचा निर्णय हा नियुक्त केलेले सर्टिफाईग ऑफिसर, सुरक्षा व दक्षता अधिकारी व संबंधीत विभागाचे कर्मचारी वर्ग अधिकारी यांचेमार्फत घेण्यात यावा.

१८) चाचणीसाठी येणा-या उमेदवारांची उंची मोजमाप करण्यासाठीचे प्रमाणीत उपकरण संबंधीत विभागाने सोबत आणणे आवश्यक आहे.

१९) वरील मुद्या क. ४ प्रमाणे झालेला बदल उमेदवारांना चाचणी सुरु करणेपूर्वी माहिती करुन देणेसाठी चाचणीपूर्वी सर्व उमेदवारांना खालीलप्रमाणे स्पष्ट सूचना देण्यात याव्यात.

..६..

" संगणकीकृत वाहन चालन चाचणीमध्ये उमेदवारांना पाचही चाचण्यांमध्ये स्वतंत्रपणे ५० टक्के गुण व एकत्रित सरासरी ५० टक्के गुण उत्तीर्ण होणेसाठी आवश्यक आहे, तथापी जो उमेदवार एखादया चाचणीमध्ये ५० टक्के पेक्षा कमी गुण मिळाल्याने अनुत्तीर्ण होईल त्याची वाहन-चालन चाचणी प्रक्रिया त्याच ठिकाणी थांबविण्यात येईल व त्याच्या उर्वरीत चाचण्या घेतल्या जाणार नाहीत."

उपरोक्त नमुद केल्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत रवाना : माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष,म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक ७८/२०१५.

क्रमांक: राप/कर्मवर्ग/मावक/ 3369
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ४०० ००८.
दिनांक : 09 जुलै, २०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/गडचिरोली/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

**विषय : शासकीय/ निमशासकीय/मंडळे/ महामंडळे/ नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्याबाबत.**

**संदर्भ : कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ३/२००५, क्रमांक राप/कर्मवर्ग/मावक/१७३, दिनांक १२ जानेवारी, २००५.**

---

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी-२०१०/ प्र.क्र.४०९/१६-ब, दिनांक १६ ऑगस्ट, २०१० ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

**सोबत : वरीलप्रमाणे**

**उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

**<u>प्रत सादर रवाना :</u>**

(१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (यं. अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन/प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/ (घटकसंवर्ग) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

(२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन परिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

**उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

शासकीय/निमशासकीय/मंडळे/महामंडळे/
नगरपालिका/महानगरपालिका इत्यादी
कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन
करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र.बीसीसी-२०१०/प्र.क्र.४०९/१६-ब
मंत्रालय,मुंबई ४०० ०३२
दिनांक : १६ ऑगस्ट, २०१०.

वाचा : शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब.
दिनांक १० ऑगस्ट, २००४.

प्रस्तावना : शासन परिपत्रक क्र.बीसीसी २००४/१६६६/प्र.क्र.६१/०४/१६-ब, दिनांक १० ऑगस्ट. २००४ नुसार शासकीय/निमशासकीय तसेच मंडळे/महामंडळे/नगरपालिका/महानगर पालिका/ शासकीय उपक्रम, अनुदानित संस्था, विद्यापीठे, सहकारी संस्था, शैक्षणिक अनुदानित संस्था इत्यादींमध्ये ज्या कार्यालयांमध्ये १००० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करण्यात यावा असे आदेश शासनाने दिले आहेत.

या संदर्भात अध्यक्ष. अनुसूचित जमाती कल्याण समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई यांच्याकडे दिनांक ४ जून, २०१० रोजी झालेल्या सचिवांच्या साक्षीच्या वेळी त्यांनी सदर आदेशातील १००० इतक्या अधिकारी व कर्मचारी वृंदाच्या मर्यादेत सुधारणा करुन ती संख्या कमी करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले.

शासन परिपत्रक : उपरोक्त बाबत विचार करुन शासन आता असे आदेश देत आहे की, ज्या कार्यालयांमध्ये ५०० पेक्षा अधिक अधिकारी व कर्मचारी वृंद आहे, अशा कार्यालयांमध्ये मागासवर्ग कक्ष स्थापन करावा.

२. शासन परिपत्रक. दिनांक १०.८.२००४ मधील क्रमांक २ पुढे दिलेल्या आदेशामध्ये या अनुषंगाने १००० च्या ऐवजी ५०० इतकी अधिकारी व कर्मचारी वृंदाची मर्यादा राहील. शासन परिपत्रक, दिनांक १०.८.२००४ मधील अन्य आदेश जसे आहेत तसे लागू रहातील.

३. मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील सर्व शासकीय/ निमशासकीय, मंडळे/महामंडळे, शासकीय उपक्रम इत्यादी कार्यालयांना या परिपत्रकानुसार

योग्य त्या सूचना निर्गमित कराव्यात व यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे याची खातरजमा करावी.

४. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०१००८१६१८४३४२००१ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

**( दि. रा. डिंगळे )**
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रति,
सर्व विधानसभा व विधान परिषद सदस्य,
मा.राज्यपाल यांचे सचिव,
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव/अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालयीन विभाग,
सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना शाखा),
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
संचालक, समाज कल्याण, पुणे,
सदस्य सचिव, अनुसूचित जाती व जमाती आयोग, १ला मजला,प्रशासकीय इमारत (डेअरी विभाग),
अब्दुल गफारखान मार्ग, वरळी सी फेस, मुंबई ४०० ०१८,
सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष), सर्व विभागीय आयुक्तांची कार्यालये,
सर्व मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई,
निवड नस्ती,
* पत्राने.

---

**कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २० /२०१५**

जा.क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ 3524
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई : ४०० ००८
दिनांक : ०८ जुलै, २०१५

- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- विभाग नियंत्रक,
  रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/ धुळे/
  अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/
  उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय : नविन चालकांकडून घ्यावयाच्या शपथपत्राबाबत.
संदर्भ : मा.परिवहन मंत्री यांचे पत्र क्र.मंत्री/परिवहन/नोट/व्हीआयपी/जन/४२८/२०१५
दि.४.६.२०१५.

----

रा.प.महामंडळाच्या प्रवाशी सेवेत चालक हा महत्वाचा घटक आहे. त्याचा थेट संबंध प्रवाशांच्या सुरक्षिततेशी आहे. व्यसनामुळे कुटुंबावर, आरोग्यावर, कार्यक्षमतेवर दुष्परिणाम होतोच, त्याचबरोबर अपघाताची शक्यता जास्त असते. कामावर असताना नशा केल्याचे आढळल्यास कर्मचा-यांवर प्रमादीय कारवाई करण्याची तरतूद शिस्त व आवेदन कार्यपध्दतीत आहे. तथापि, कर्मचा-यांवर विशेषतः चालकावर नैतीक, सामाजिक, वैयक्तिक बंधन यावे यासाठी कामावर असताना कोणत्याही प्रकारची नशा करणार नाही अशा स्वरुपाचे शपथपत्र नोकरीत रुजू होण्यापुर्वी घेण्याचे निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार, सरळसेवा भरती सन २०१५ अंतर्गत नव्याने सेवेत येणा-या चालकांकडून सोबत जोडलेल्या जोडपत्रानुसार शपथपत्र घेण्यात यावे. तसेच यापुढे होणा-या रा.प.महामंडळातील सर्व पदातील भरती प्रक्रियेबाबत ही प्रक्रिया अवलंबिण्यात यावी.

वरीलप्रमाणे विहीत नमुन्यातील शपथपत्र दिल्याची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात करण्यात यावी व शपथपत्र वैयक्तिक दप्तरासोबत ठेवावे.

वरील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सोबत : शपथपत्राचा नमुना

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष. म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

## '' शपथपत्र''

मी ----------------------------------------------------------------, हुद्दा ------------------- वय ------------- ,

पत्ता ------------------------------------------------------------------------------------------------------------

शपथपूर्वक लिहून देतो की, रा.प.सेवेत असेपर्यंत कर्तव्यावर असताना मी दारु किंवा तत्सम मद्य पदार्थांचे तसेच तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणार नाही. अशा प्रकारच्या व्यसनामुळे माझ्या आरोग्यावर, कुटुंबावर, कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होऊ शकतो. महत्त्वाचे म्हणजे यामुळे प्रवाशांच्या जीवाला व मालमत्तेस धोका निर्माण होतो याची मला जाणीव आहे. त्यामुळे रा.प.सेवेत असताना व कर्तव्यावर असताना मी कोणतेही व्यसन करणार नाही हे शपथपूर्वक लिहून देत आहे.

स्वाक्षरी ---------------------------------

नाव -------------------------------------

कर्मचारीवर्ग खाते

परिपत्रक क्र. २१/२०१५

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ 3830

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८

दिनांक : 2( जुलै, २०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक व अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : कर्तव्य स्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्य स्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या, अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असलेल्या रा.प.महामंडळातील कर्मचा-यांना रु.१,०००/- या दराने वाहतूक भत्ता मंजूर करणेबाबत.**

**संदर्भ :**
**१) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ०२/२०११ (क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/जीएडी/३०२ ,दि. १७.१.२०११)**
**२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ०५/२०१२ (क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१२५१ ,दि. २०.०३.२०१२)**
**३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक १५/२०१२ (क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/४९८६ ,दि. १२.०९.२०१२)**
**४) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१७/२०१४ दि.१५.०९.२०१४ (क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/४२८८, दि.१५.०९.२०१४)**
**५) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ०६/२०१५ (क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/९५२ ,दि. २३.०२.२०१५)**

-----

राज्य परिवहन महामंडळातील अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या कर्मचा-यांना शासन धर्तीवर सुधारीत दराने वाहतूक भत्ता अदा करण्याबाबतच्या सूचना संदर्भित परिपत्रक क्र.४ अन्वये प्रसारीत केलेले आहेत.

वाहतूक भत्त्याच्या प्रयोजनार्थ शासन निर्णय वित्त विभाग क.वाहभ-२००९/प्र.क.७८/सेवा.५ दिनांक ५एप्रिल, २०१० मधील इतर विद्यमान तरतूदी व कार्यपध्दती आहे त्याच प्रकारे यापुढे लागू राहतील असे शासन निर्णय दि.०३.०६.२०१४ च्या परिपत्रकात स्पष्ट केलेले आहे व तश्या स्वरूपाच्या सूचना संदर्भित परिपत्रक ४ नुसार शासन निर्णयाधिन दिलेल्या आहेत. तथापि शासनाने दि.०५.०४.२०१० मधील परिच्छेद ३(तीन) नंतर पुढील उप.परिच्छेद समाविष्ठ केल्याबाबतचे शुध्दीपत्रक दि.०७.०९.२०११ रोजी प्रसारीत केलेले आहे.

चार) कर्तव्य स्थानापासून एक किलोमीटरच्या आत किंवा कर्तव्यस्थाना किंवा निवास्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या **अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पीडीत असलेल्या** राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचा-यांना वरील तक्त्यात नमूद केलेल्या दराच्या निम्म्या दराने, मात्र अशा प्रकारे दर निम्मा केल्याने तो रू.१०००/- पेक्षा कमी होत असल्यास, किमान रू.१,०००/-या दराने वाहतूक भत्ता मंजूर करण्यात येईल.

कर्तव्यस्थानापासून एक किलोमीटर अंतराच्या आत किंवा कर्तव्यस्थान व निवासस्थान यांचा एकत्र परिसर असेल अशा ठिकाणी राहणा-या, अंध, अस्थिव्यंगाने अधु आणि कण्याच्या विकाराने पिडीत असलेल्या रा.प.महामंडळातील कर्मचा-यांना वाहतूक भत्ता मंजूर करणेबाबतच्या सूचना कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१५/२०१२ दि.१२.०९.२०१२ नुसार दिलेल्या आहेत, त्यानुसार यथोचित कार्यवाही करण्यात यावी.

सदरहू परिपत्रकात नमूद केलेले शासननिर्णय महाराष्ट्र शासनाच्या (वित्त विभाग) www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेताक क्रमांक खालील प्रमाणे आहे.

१) दि.०५.०४.२०१० संकेतांक क्र.२०१००४०५१३४६२०००१

२) दि.०७.०९.२०११ संकेतांक क्र.२०११०९०७१४०६१०००१

३) दि.०३.०६.२०१४ संकेतांक क्र.२०१४०६०३१२१५५१३४०५

सदरहू परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने प्रसारीत करण्यात आले आहे.

Signature

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

**<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिक अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

Signature

**उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)**

D:\GAD\Handicap\Circular

**महत्त्वाचे / तातडीचे :**
कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. 22/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ -3८४
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : 30 .०७.२०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : चालक प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, रा.प.यवतमाळ विभाग व चालक प्रशिक्षण केंद्र, गडचिरोली, रा.प.चंद्रपूर विभाग येथील प्रशिक्षण पुर्ण केलेल्या व अनुकंपा तत्वावर चालक (कनिष्ठ) पदी नेमणूक देण्यापूर्वी उमेदवारांची अंतिम वाहन चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी- पुणे येथील संगणकीकृत वाहन-चालन चाचणी पथावर घेणेबाबत.

संदर्भ : या कार्यालयाचे परिपत्रक क्र. १८/२०१५ संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/२८३७ दिनांक ०१.०६.२०१५.

*****

उपरोक्त संदर्भित परिपत्रकान्वये दिलेल्या सुचनांनुसार सरळसेवा भरती अंतर्गत चालक (कनिष्ठ) पदातील प्राथमिक कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र ठरलेल्या सर्व उमेदवारांची वाहन-चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे येथे संगणकीकृत वाहन-चालन चाचणी पथावर घेण्यात येत आहे. त्याचधर्तीवर यापुढे चालक प्रशिक्षण केंद्र, पांढरकवडा, रा.प.यवतमाळ विभाग व चालक प्रशिक्षण केंद्र, गडचिरोली, रा.प.चंद्रपूर विभाग येथील चालक प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारांची अंतिम वाहन-चालन चाचणी तसेच अनुकंपा तत्वावर चालक (कनिष्ठ) पदात उमेदवारांची नेमणूक करण्यापूर्वी त्यांची वाहन-चालन चाचणी मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी- पुणे येथील संगणकीकृत वाहन-चालन चाचणी पथावर संदर्भित परिपत्रकामधील दिलेल्या सुचनांनुसार घेण्यात यावी.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

SH\D:\2015-UR\UR-Circular-2015.docx

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २३/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४३८५
म.रा.मा.प.महामंडळ,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.
दिनांक: २ ~~ऑगस्ट~~ सप्टेंबर, २०१५.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.

विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /नांदेड अमरावती /अकोला /बुलढाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: वय वर्षे ४० पुढील चालकांची आरोग्य तपासणी करणेबाबत.**
**संदर्भ: १)क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/५३२ दि.६/२/२०१२.**
**२)परिपत्रक क्र. २/२०१४क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३२३ दि.१/.१.१४.**
**३)परिपत्रक क्र. २१/१४ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/५२९१ दि.१३.११.१४.**
**४)परिपत्रक क्र.९/१५ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/१२८४ दि.११.३.१५.**

-----------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने वय वर्षे ४० पुढील सर्व चालकांच्या आरोग्य तपासणी करण्याबाबतच्या सुचना संदर्भित परिपत्रकांन्वये प्रसारीत करण्यात आलेल्या आहेत.

महामंडळाद्वारे सन २०१५-१६ चा जो के.आर.ए. महाराष्ट्र शासनास सादर करण्यात आलेला आहे, त्यामध्ये मार्च, २०१६ पर्यंत वय वर्षे ४० पेक्षा जास्त वयोमर्यादा असलेल्या २१,७१५ चालकांची आरोग्य तपासणी पूर्ण करण्याचे नमुद केले आहे. त्या अनुषंगाने आपल्या घटक विभागातील वय वर्षे ४० पुढील ज्या चालकांची आरोग्य तपासणी करण्यात आलेली नाही, अशा सर्व चालकांची आरोग्य तपासणी संदर्भित परिपत्रकामध्ये देण्यात आलेल्या सुचनेनुसार त्वरीत पूर्ण करण्यात यावी व आरोग्य तपासणी पूर्ण होईपर्यंत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या ७ तारखेला मुख्य कामगार अधिकारी यांचेकडे व कर्मचारीवर्ग खाते यांचेकडे पाठविण्यात यावा.

परिपत्रकाची पोहोच देण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत:

**महत्त्वाचे / तातडीचे :**

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. 24 / 2015

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ ४४०८

म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,

महाराष्ट्र वाहतूक भवन,

डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-08.

दिनांक : .09.2015.

०३|१०|१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

...

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम, 1961 अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : 1) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/आस्था/714-जीई/3918 दि.16.8,2001.

2) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप /आस्था/201-ई/4169 दि.2.11.2007.

3) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/आस्था/201ई/4599 दि.6.ऑक्टोंबर 2008.

4) या कार्यालयाचे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/1075 दि.28.2.2014

...

रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसुचना भाग - II खंड - 3, उपखंड (I) दिनांक 19.12.2014 अन्वये अभियांत्रिकी/पदवीकाधारक, तांत्रिक शिकाऊ उमेदवार व व्होकेशनल शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतन दरात दिनांक 19.12.2014 पासून खाली दर्शविल्याप्रमाणे वाढ करण्यात आलेली आहे.

सदर अधिसूचनेनुसार अभियांत्रिकी पदवीधर / पदविकाधारक, तांत्रिक शिकाऊ उमेदवार व व्होकेशनल शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनाचे सुधारित खालीलप्रमाणे दर्शविले आहेत.

| क्र. | तपशिल | सुधारित दर (प्रति माह) श्रम व रोजगार मंत्रालय, अधिसुचना दि. 19.12.2014 |
|---|---|---|
| 1. | पदवीधर शिकाऊ उमेदवार (Gratuate Apprentice) | रु.4984/- |
| 2. | सँडविच कोर्स (पदवीसंस्थेचे उमेदवार) दरमहा Sandwich Course (Student from Degree Institution) | रु.3542/- |
| 3. | तांत्रिक शिकाऊ उमेदवार - दरमहा Technician Apprentices | रु.3542/- |
| 4. | सँडविच कोर्स (डिप्लोमा संस्थेचे उमेदवार) दरमहा Sandwich Course (Student from Diploma Institution) | रु.2890/- |
| 5. | तांत्रिक (व्होकेशनल) शिकाऊ उमेदवार - दरमहा Technician (Vocational) Apprentices | रु.2758/- |

शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात उपरोक्त दर्शविल्यानुसार शिकाऊ उमेदवारांना दिनांक 19.12.2014 पासून सुधारीत दरानुसार विद्यावेतन अदा करण्यात यावे. सुधारित दरानुसार विद्यावेतन अदा करताना शासनामार्फत प्रसारित केलेल्या संदर्भित परिपत्रकाची पडताळणी करण्यात यावी व कोणत्याही प्रकारे अतिरिक्त विद्यावेतन अदा होणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी.

सदर परिपत्रक वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

SH\F:\2015-UR\UR-Circular - 2015.docx

**महत्त्वाचे / तातडीचे :**
कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २५ /२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ ४६२८
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : ११.०९.२०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

*****************

विषय : शिकाऊ उमेदवार अधिनियम, १९६१ अंतर्गत शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनात वाढ करण्याबाबत.

संदर्भ : १) रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग-II खंड-३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ ची अधिसुचना
२) रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसुचना भाग - II खंड - ३, उपखंड (i) दिनांक १९.१२.२०१४ ची अधिसुचना
३) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/आस्था/७१४-जीई/३९१८ दि.१६.८.२००१.
४) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप /आस्था/२०१-ई/४१६९ दि.२.११.२००७.
५) या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/आस्था/२०१ई/४५९९ दि.६ ऑक्टोबर २००८.
६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २४/२०१५ संदर्भ क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/४४०४ दि. ०३.०९.२०१५.

...

रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसुचना भाग - II खंड - ३, उपखंड (i) दिनांक १९.१२.२०१४ अन्वये अभियांत्रिकी/पदवीकाधारक व व्होकेशनल शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतन दरात दिनांक १९.१२.२०१४ पासून दर्शविलेली वाढ संदर्भित पत्र क्र.६ अन्वये प्रसारीत करण्यात आलेली आहे.

रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग-II खंड-३, उपखंड (i) दि.२२.०९.२०१४ अन्वये शिकाऊ उमेदवारांच्या विद्यावेतनामध्ये दिनांक २२.०९.२०१४ पासून खालील प्रमाणे वाढ केली आहे.

त्यानुसार, जुने दर व सुधारीत दर खालील प्रमाणे दर्शविले आहेत.

| क्र. | वर्ष | **पुर्वीचा दर**<br>केंद्र शासन राजपत्र दि.२७.०९.२०१३ अन्वये दिलेल्या अधिसुचनेनुसार व कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/१०७५ दि.२८.२.२०१४ नुसार | **सुधारित दर**<br>रोजगार व प्रशिक्षण महानिदेशालय, श्रम व रोजगार मंत्रालय अधिसूचना भाग-II खंड-३, उपखंड (i) दि.२२.९.२०१४ नुसार संबंधितराज्य किंवा केंद्रशासित प्रदेशाद्वारा अधिसूचित अर्धकुशल कर्मचा-यांसाठी निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या | कामगार आयुक्त यांचे दि.२८.०१.२०१५ नुसार किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>**परिमंडळ-१ =**<br>मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु.२९१३.७५ = रु.७५१३.७५ व<br>**परिमंडळ-२ =**<br>मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु.२९१३.७५ = रु. ७३१३.७५ (विशेष भत्ता दि.०१.०७.२०१४ ते ३१.१२.२०१४ कालावधीकरीता कामगार उपआयुक्त मुंबई यांचे पत्र क्र. कार्या-२२ दि.२८.०१.२०१५ नुसार)) यापमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>**सुधारित दर (रुपयामध्ये)** | | कामगार आयुक्त यांचे दि.२८.०१.२०१५ नुसार किमान वेतन = मुळ वेतन + विशेष भत्ता<br>**परिमंडळ-१ =**<br>मुळ वेतन रु. ४६०० + विशेष भत्ता रु.३२०२.५० = रु.७८०२.५० व<br>**परिमंडळ-२ =**<br>मुळ वेतन रु. ४४०० + विशेष भत्ता रु.३२०२.५०= रु. ७६०२.५० (विशेष भत्ता दि.०१.०१.२०१५ ते ३०.०६.२०१५ कालावधीकरीता कामगार उपआयुक्त मुंबई यांचे पत्र क्र. कार्या-१०/८७३७ दि.०५.०६.२०१५ नुसार)) यापमाणे निश्चित केलेल्या किमान वेतनाच्या दरानुसार<br>**सुधारित दर (रुपयामध्ये)** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** | **परिमंडळ - १** | **परिमंडळ - २** |
| १ | **पहिले वर्ष** | **रु.२१००/- दरमहा** | **किमान वेतनाच्या ७० टक्के** | किमानवेतन रु.७५१३.७५ च्या ७०% = रु.५२५९.६३ | किमानवेतन रु. ७३१३.७५ च्या ७०% = रु.५११९.६३ | किमानवेतन रु. ७८०२.५० च्या ७०% = रु.५४६१.७५ | किमानवेतन रु. ७६०२.५० च्या ७०% = रु.५३२१.७५ |
| २ | **दुसरे वर्ष** | **रु.२४००/- दरमहा** | **किमान वेतनाच्या ८० टक्के** | किमानवेतन रु.७५१३.७५ च्या ८०% = रु.६०११.०० | किमानवेतन रु. ७३१३.७५ च्या ८०% = रु.५८५१.०० | किमानवेतन रु. ७८०२.५० च्या ८०% = रु.६२४२.०० | किमानवेतन रु. ७६०२.५० च्या ८०% = रु.६०८२.०० |
| ३ | **तिसरे वर्ष** | **रु.२८००/- दरमहा** | **किमान वेतनाच्या ९० टक्के** | किमानवेतन रु.७५१३.७५ च्या ९०% = रु .६७६२.३८ | किमानवेतन रु. ७३१३.७५ च्या ९०% = रु.६५८२.३८ | किमानवेतन रु. ७८०२.५० च्या ९०% = रु.७०२२.२५ | किमानवेतन रु. ७६०२.५० च्या ९०% = रु.६८४२.२५ |
| ४ | **चौथे वर्ष** | **रु.३१००/- दरमहा** | | | | | |

** परिमंडळ १ - महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका व 'अ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल.

** परिमंडळ २ - परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.

..२..

मा.कामगार आयुक्त, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. काउआ/मुश/औविअ/व्हीएनसी/ई-वॉर्ड/कार्या-२२ दिनांक २८.०१.२०१५ अन्वये या कार्यालयास असे कळविले आहे की, सार्वजनिक मोटार वाहतूक उद्योगांसाठी दिनांक ०१.०६.२०१४ ते ३१.१२.२०१४ या कालावधीसाठी व पत्र क्र.ग्रावि/किवेअ/२०१५/कार्या-१०/८७३७ दिनांक ०५.०६.२०१५ अन्वये दिनांक ०१.०१.२०१५ ते दिनांक ३०.०६.२०१५ या कालावधीतील जाहीर झालेली विशेष भत्ता प्रत या कार्यालयास प्राप्त झाली असून सदर दोन्ही कालावधीकरीता असलेल्या अर्ध कुशल कामगारांसाठी किमान वेतनाचा दर वरीलप्रमाणे आहे.

वर नमुद केल्याप्रमाणे, सुधारित दराने विद्यावेतन अदा करताना संबंधित खात्याशी संपर्क साधून महामंडळामधील शिकाऊ उमेदवारांना कोणत्या दराने विद्यावेतन द्यावे लागणार आहे, याची पुर्णपणे पडताळणी करुन व लेखा परिक्षण करुनच शिकाऊ उमेदवारांना विद्यावेतन अदा करावे.अतिरिक्त विद्यावेतन अदा केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी संबंधित विभाग/घटकाची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

तरी, वर दर्शविलेल्या तारखेपासून सुधारीत दराने विद्यावेतन अदा करण्यात यावे.

सदर परिपत्रक वित्त व लेखा खात्याच्या सहमतीने प्रसृत करण्यात येत आहे.

सोबत : १) मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र. काउआ/मुश/औविअ/व्हीएनसी/ई-वॉर्ड/कार्या-२२ दिनांक २८.०१.२०१५

२) मा.कामगार आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र.ग्रावि/किवेअ/२०१५/कार्या-१०/८७३७ दिनांक ०५.०६.२०१५

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.) / महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / उपमहाव्यवस्थापक (विधी)/ उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य स्थापत्य अभियंता / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / स.क.अ. (मुख्यालय) / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन यांस माहितीसाठी.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

कर्मचारीवर्ग खाते
रा.प.मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८
आवक क्र. 749
दिनांक 18/2/15

क्र.काउआ/मुश/औविअ/व्हीएनसी/ई-वॉर्ड/कार्या-२२
कामगार उप आयुक्त यांचे कार्यालय,
मुंबई शहर, कामगार भवन, सी-२०, सिटी पार्कच्या बाजूला,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
दिनांक : 28 JAN 2015

प्रेषक

श्रीमती. शिरिन सं.लोखंडे,
कामगार उप आयुक्त,
मुंबई.

प्रति,

महाव्यवस्थापक(क.व.औ.सं.)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
कर्मचारी वर्ग खाते, सेंन्ट्रल ऑफीस,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर रोड,
मुंबई सेंन्ट्रल, मुंबई-४०० ००८.

**विषय : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातील शिकाउ उमेदवारांच्या अधिनियम १९६१ अंतर्गत विद्यावेतनात वाढ करण्याबाबत**

महोदय,

उपरोक्त विषयाच्या संदर्भात आपणास कळविण्यात येते की सार्वजनिक मोटार वाहतुक उद्योगासाठी दि.१/०६/२०१४ ते दि.३१/१२/२०१४ या कालावधीसाठी अर्धकुशल कामगारांसाठी किमान वेतनचा दर खालील प्रमाणे आहे. सोबत याकार्यालयाने शासन स्तरावर दि. ६/ऑगस्ट२०१४ रोजी दि. १/०६/२०१४ ते दि.३१/१२/२०१४ जाहीर केलेल्या विषेश भत्यांचे दराचे परिपत्रकाची छायाप्रत तसेच महाराष्ट शासनाने मुळ वेतनातबाबत जारी केलेली दि. २० जुलै २०१० च्या अधिसुचनेची प्रत देखिल आपल्या माहितीसाठी सोबत जोडून पाठवित आहे.

| अनु क्र. | तपशिल | किमान वेतनाचे दर | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ |
| १. | मुळ वेतन | ४६०० | ४४०० |
| २. | विशेष भत्ता | २,९१३.७५ | २,९१३.७५ |
| ३. | एकुण | ७.५१३.७५ | ७,३१३.७५ |

आपली विश्वासू

( शिरिन सं.लोखंडे )
कामगार उप आयुक्त,मुंबई.
मुंबई शहर.

RNI No. MAHBIL/2009/31747

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग एक-ल

वर्ष २, अंक ३८] मंगळवार, जुलै २०, २०१०/आषाढ २९, शके १९३२ [पृष्ठे ७
किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक ११६

## प्राधिकृत प्रकाशन

(केंद्रीय) औद्योगिक विवाद अधिनियम व मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम यांखालील (भाग एक, चार-अ, चार-ब आणि चार-क यांमध्ये प्रसिद्ध केलेल्या अधिसूचना, आदेश व निवाडे यांव्यतिरिक्त) अधिसूचना, आदेश व निवाडे.

### उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २० जुलै २०१०

### अधिसूचना

**किमान वेतन अधिनियम, १९४८.**

क्रमांक किवेअ. ३२०१०/सीआर-१२८१/काम-७.–ज्याअर्थी महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही " सार्वजनिक मोटार वाहतुकीच्या संबंधातील कामधंदा " या रोजगारात असलेल्या (यात यापुढे ज्याचा उक्त " अनुसूचित रोजगार " असा उल्लेख करण्यात आलेला आहे.) कामगारांना देय असलेले किमान वेतन दर शासन अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्रमांक एमडब्ल्युए-१०९६/१००/काम-७ दिनांक ३ एप्रिल २००१ अन्वये पुनर्निर्धारित केलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने, पुनर्विलोकन करून उक्त अनुसूचित रोजगारातील कामगारांना देय असलेले किमान वेतन दर पुनर्निर्धारित करण्याचे ठरविले आहे ;

त्याअर्थी, आता किमान वेतन अधिनियम, १९४८ (१९४८ चा अकरा) हा महाराष्ट्र राज्यात लागू करताना, त्यांच्या कलम (३) च्या पोट-कलम (१) चा खंड (ब) आणि कलम (५) चे पोट-कलम

(२) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्रमांक किवेअ. ८२००८/सीआर-१०२१/कामगार-७, दिनांक २४ फेब्रुवारी २००९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रस्तावाच्या संबंधात मिळालेली सर्व अभिवेदने विचारात घेतल्यानंतर आणि सल्लागार मंडळाचा सल्ला विचारात घेतल्यानंतर महाराष्ट्र शासन, याद्वारे, दिनांक २० जुलै २०१० पासून उक्त रोजगारात नोकरीत असलेल्या यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या स्तंभ २ मध्ये नमूद केलेल्या कामगारांच्या वर्गाला त्या अनुसूचीच्या स्तंभ ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वेतनाचे किमान दर निश्चित करीत आहे.

## अनुसूची

| अ. क्र. (१) | कामगारांची वर्गवारी (२) | किमान वेतनाचे दर (दरमहा रुपए) (३) | |
|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ |
| १ | कुशल-अ<br>मल्टीॲक्सल वाहनचालक, व्यवस्थापक, पर्यवेक्षक. | ५,७००.०० | ५,५००.०० |
| २ | कुशल-ब<br>इतर वाहनचालक. | ५,५००.०० | ५,३००.०० |
| ३ | कुशल-क<br>वाहक, लिपिक. | ५,३००.०० | ५,१००.०० |
| ४ | अर्धकुशल<br>सर्व सहाय्यक. | ४,६००.०० | ४,४००.०० |
| ५ | अकुशल<br>मदतनीस, क्लिनर. | ४,२००.०० | ४,०००.०० |

**स्पष्टीकरण.**— या अधिसूचनेच्या प्रयोजनार्थ,—

(ए) **परिमंडळ एक**--महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगरपालिका व ' अ ' वर्ग नगरपालिका क्षेत्रांचे मिळून होईल.

(बी) **परिमंडळ दोन**--परिमंडळ एक वगळून राज्याच्या उर्वरित क्षेत्राचे मिळून होईल.

(सी) रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांस देय असलेले मजुरीचे किमान वेतन दर तो कामगार ज्या वर्गाचा असेल त्या वर्गासाठी निश्चित करण्यात आलेल्या मासिक मजुरीच्या दरांना २६ ने भागून येणारा भागाकार नजीकच्या पैशापर्यंत पूर्णांकात करून काढण्यात येईल;

(डी) किमान वेतनांमध्ये साप्ताहिक सुट्टीच्या वेतनाचा समावेश असेल ;

(इ) अर्धवेळ काम करणाऱ्या कामगारांना देय असलेल्या प्रतितास किमान वेतनाचा दर तो कामगार ज्या वर्गवारीचा असेल, त्या वर्गवारीच्या रोजंदारी किमान वेतनास ८ ने भागून व त्यात १५% वाढ करून तसेच येणारी रक्कम नजिकच्या पैशापर्यंन्त पूर्णांकात परिवर्तित करण्यात येऊन काढण्यात येईल;



(एफ) किमान वेतन दरामध्ये मूळ वेतन दर व विशेष भत्ता या सर्व दरांचा समावेश असेल.

(जी) एखादा कुशल कामगार म्हणजे जो स्वतःच्या निर्णय शक्तीनुसार आपले काम कार्यक्षमतेने व जबाबदारीने पार पाडू शकतो असा कामगार;

(एच) अर्धकुशल कामगार म्हणजे सर्वसाधारणपणे नित्याच्या स्वरूपाचे काम करतो की, ज्यामध्ये निर्णय घेण्याची फारशी गरज नसते. परंतु तुलनेने त्याला दिलेले छोटेसे काम की ज्यामध्ये महत्त्वाचे निर्णय इतरांकडून घेतले जातात असे काम योग्यरीतीने पार पाडण्याची आवश्यकता असते. मर्यादित व्याप्तीचे नित्याचे काम पार पाडणे हेच त्याचे कर्तव्य असते ;

(आय) अकुशल कामगार म्हणजे ज्यास लहानसा किंवा स्वतंत्र निर्णय घेणे आणि पूर्वानुभव असणे आवश्यक नाही. परंतु तरीही व्यावसायिक परिस्थितीची माहिती असणे आवश्यक आहे. असे साध्या कर्तव्य पालनाचा अंतर्भाव असलेले काम करणारा कामगार, म्हणून त्याच्या कामासाठी शारीरिक परिश्रमाशिवाय निरनिराळ्या वस्तुंची किंवा मालाची त्याला चांगली माहिती असणे आवश्यक असेल.

## परिशिष्ट

महाराष्ट्र राज्यातील १० केंद्रांचा सरासरी ग्राहक मूल्य निर्देशांक (नवीन मालिका १९८२=१००) हा उक्त अनुसूचित रोजगारात नोकरीत असलेल्या कामगारांना लागू असलेला राहणीमान निर्देशांक असेल. महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेला सक्षम प्राधिकारी, १ जानेवारी आणि १ जुलै रोजी सुरू होणाऱ्या प्रत्येक सहामाहीच्या समाप्तीनंतर, त्या सहा महिन्यांसाठी उक्त कर्मचाऱ्यांना लागू असलेल्या राहणीमान निर्देशांकाची सरासरी काढील आणि ६५९ निर्देशांकावर अशा प्रत्येक अंकाच्या वाढीसाठी ज्या सहामाहीच्या संबंधात अशी सरासरी काढण्यात आलेली असेल, त्या सहा महिन्यालगत पुढील सहामाहीसाठी उक्त कर्मचाऱ्यांना देय असलेला विशेष भत्ता (यात यानंतर ज्याचा " राहणीमान भत्ता " असा निर्देश करण्यात आलेला आहे) सर्व परिमंडळाच्या संबंधित दरमहा रुपये **५.२५** या दराने असेल.

२. सक्षम प्राधिकारी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, उपरोक्तप्रमाणे हिशेब करून काढलेला राहणीमान भत्ता जेव्हा जानेवारी ते जून या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जानेवारी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये आणि जेव्हा जुलै ते डिसेंबर या कालावधीतील प्रत्येक महिन्यासाठी देय असेल, तेव्हा जुलै महिन्याच्या शेवटच्या आठवड्यामध्ये जाहीर करील :

परंतु, सक्षम प्राधिकारी, किमान वेतन निश्चित केल्याच्या दिनांकापासून देय असलेला राहणीमान भत्ता, जून किंवा डिसेंबर अखेरपर्यंत किंवा यथास्थिति, किमान वेतन दर निश्चित करण्यात आल्याच्या दिनांकानंतर लगेचच जाहीर करील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**बा. शि. वानखेडे,**
शासनाचे उप सचिव.

In pursuance of clause (3) of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. MWA-32010/CR-1281/Lab-7, dated 20th July 2010, is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. WANKHEDE,
Deputy Secretary to Government.

**INDUSTRIES, ENERGY AND LABOUR DEPARTMENT**

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 20th July 2010

*NOTIFICATION*

MINIMUM WAGES ACT, 1948.

No. MWA. 32010/CR-1281/Lab-7.–Whereas by Government Notification, Industries, Energy and Labour Department, No MWA. 1096/CR 100/Lab-7, dated the 3rd April 2001 the Government of Maharashtra had revised the minimum rates of wages payable to the employees employed in the scheduled employment *viz*. "Employment in Public Motor Transport" (hereinafter referred to as "the said scheduled employment") in the State of Maharashtra;

And, whereas, the Government of Maharashtra having reviewed the minimum rates of wages payable to the employees employed in the said Scheduled Employment, considers it expedient to revise them further ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*b*) of sub-section (*1*) of section 3, read with sub-section (*2*) of section 5 of the Minimum Wages Act, 1948 (XI of 1948), in its application to the State of Maharashtra, the Government of Maharashtra, after considering the representations received in respect of the proposal published in the Government Notification, Industries, Energy and Labour Department No. MWA. 82008/CR-1021/Lab-7, dated 24th February 2009 and after consulting the Advisory Board, hereby Revises, with effect from 20th July 2010, the minimum rates of wages payable to the employees employed in the said Scheduled Employment and Revises them, as set out in column No. (3) of the said Schedule appended hereto as the minimum rates of wages payable to the class of employees mentioned against them in column No. (2) of the said Schedule.



(623)

*Schedule*

| Sr. No. | Class of Employees | Basic Minimum Rates of Wages (Per month Rs.) | |
|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | |
| | | *Zone-I (Rs.)* | *Zone-II (Rs.)* |
| 1 | Skilled-A<br>Multiaxcel Driver,<br>Manager, Supervisor. | 5700.00 | 5500.00 |
| 2 | Skilled-B<br>Other Driver. | 5500.00 | 5300.00 |
| 3 | Skilled-C<br>Driver Clerk. | 5300.00 | 5100.00 |
| 4 | Semi Skilled | 4600.00 | 4400.00 |
| 5 | Unskilled Helper, Cleaner | 4200.00 | 4000.00 |

*Explanation*.—For the purposes of this notification–

(*a*) Zone I–shall comprise of the areas falling within the limit of all Municipal Corporations and all A class Municipal Councils ;

(*b*) Zone II–shall comprise of all other areas in the State, which are not included in Zone I :

(*c*) the minimum rates of daily wages payable to an employee employed on daily wages shall be computed by dividing the minimum rates of monthly wages fixed for the class of employees to which he belongs by twenty-six, the quotient being stepped upto the nearest *paisa* ;

(*d*) the minimum rates of wages shall be inclusive of payment of remuneration in respect of weekly day of rest ;

(*e*) The minimum rates of hourly wages payable to part-time employee shall be computed by dividing the daily rates of minimum wages applicable to the concerned class of employees by eight with 15 % rise in it and quotient being stepped up to the nearest paisa;

(*f*) the minimum rates of wages shall consist of basic rates and the cost of living allowance ;

(g) a skilled employee is one who is capable of working efficiently, exercising considerable independent Judgement and discharging his duties responsibly ;

(*h*) a semi-skilled employee is one, who does work generally of a well defined routine nature, wherein the major requirement is not so much of the judgement, skills and dexterity, but of proper discharge of duties assigned to him for a relatively narrow job and important decisions are made by others. His work is thus limited to the performance of routine operation of limited scope ;

(*i*) an unskilled employee is one, who does operations that involve the performance of simple duties which require the exercise of little or no independent judgment or previous experience although a familiarity with the occupational environment is necessary. His work may thus require, in addition to physical exertion, familiarity with a variety of articles or goods.

## APPENDIX

1. The Average Consumer Price Index Number in respect of ten centres in the State of Maharashtra for working class (New Series 1982=100) shall be the Cost of Living Index Number applicable to the employee employed in the said Scheduled Employment. The Competent Authority appointed by Government shall, after expiry of every six months commencing on the first day of January and the first day of July, calculate the average of the Cost of Living Index Number applicable to the said employees for these six months and ascertain the rise of such average over 659 points. For such rise of every point, special allowance (hereinafter referred to as " the Cost of Living Allowances") payable to the employees in the said Scheduled Employment for each of the six months immediately following six months in respect of which such average has been calculated at the rate of Rs. **5.25** per month in respect of all Zones.



2. The Cost of Living Allowance computed as aforesaid shall be declared by the Competent Authority by notification in the *Official Gazette* in the last week of July when such allowance is payable for each of the months from July to December and in the last week of January when such allowance is payable for each of the months from January to June :

Provided that, the Competent Authority shall declare the Cost of Living Allowance payable in respect of the period from the date of fixation of the rate of minimum wages to the end of December or June, as the case may be, immediately after the said date with effect from which the minimum rates of wages are fixed.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

B. S. WANKHEDE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI. PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

**कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**"कामगार भवन", ई - ब्लॉक, सी - २०,**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

**दिनांक- ६ ऑगस्ट, २०१४**

क्र.ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१४-२/कार्या-१० किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्याचे दर दिनांक ०१.०७.२०१४ ते ३१.१२.२०१४ या कालावधीकरिता जाहीर करीत आहे.

| अ. क्र. | अनुसुचित उद्योगाचे नांव | परिमंडळ निहाय विशेष भत्याचे दर | | | | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ रुपये | परिमंडळ-२ रुपये | परिमंडळ-३ रुपये | परिमंडळ-४ रुपये | | |
| १ | २ | ३ | | | | ५ | |
| १ | मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायवादीच्या आस्थापनातील अधिवक्ता किंवा न्यायवादी यांचा अधिसंघ संस्था व विधी व्यवसायाच्या संबंधित आस्थापनेतील कामधंदा | १,८७६.०० | १,८७६.०० | १,८७६.०० | -- | प्रती महिना | |
| २ | मोटर दुरुस्ती कार्यशाळा उद्योग | २,८००.०० | २,८००.०० | २,८००.०० | -- | प्रती महिना | |
| ३ | बेकरी उद्योग | २,९१३.७५ | २,९१३.७५ | २,९१३.७५ | -- | प्रती महिना | |
| ४ | कापुस दाबणे व पिंजणे उद्योग | २,६२५.०० | २,६२५.०० | २,६२५.०० | -- | प्रती महिना | |
| ५ | कापड रंगविणे, छपाई उद्योग | २,९१३.७५ | २,९१३.७५ | -- | -- | प्रती महिना | |
| ६ | काजु प्रक्रिया उद्योग | २,२०५.०० | संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता | | | प्रती महिना | |
| ७ | कागदी, गवती पुठ्ठ्यापासून खोकी तयार करणारा उद्योग | २,३७६.०० | २,३७६.०० | २,३७६.०० | -- | प्रती महिना | |
| ८ | रासायनिक खते बनविणारा उद्योग | २,६४०.०० | २,६४०.०० | २,६४०.०० | -- | प्रती महिना | |
| ९ | कॅन्टीन आणि क्लब उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना | |
| १० | सिमेंट व सिमेंटवर आधारीत उद्योग | ३,३९८.४० | ३,३९८.४० | ३,३९८.४० | -- | प्रती महिना | |
| ११ | रस्ते तयार करणे, देखरेख करणे, बांधकाम उद्योग | २,०९४.५० | २,०९४.५० | २,०९४.५० | -- | प्रती महिना | |
| १२ | चित्रपट प्रदर्शनाचा उद्योग | २,७४२.९५ | [illegible] | २,७४२.९५ | २,७४२.९५ | प्रती महिना | |
| १३ | सायकल यांत्रिकी कार्यशाळेतील कामधंदा | २,५२०.०० | २,५२०.०० | -- | -- | प्रती महिना | |
| १४ | दवाखाना उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना | |
| १५ | औषधी द्रव्ये व औषध बनविणारा उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना | |
| १६ | दुधशाळा ( डेअरी ) उद्योग | २,७५०.०० | २,७५०.०० | २,७५०.०० | -- | प्रती महिना | |
| १७ | लिखाणाच्या वह्या बनविणारा उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना | |
| १८ | खाण्याचा तंबाखू उद्योग | २,४९७.५० | संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता | | | प्रती महिना | |
| १९ | अभियांत्रिकी उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना | |
| २० | कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम २ पोट कलम (एम) या व्याख्येतील कारखाने | २,५२०.०० | २,५२०.०० | २,५२०.०० | | प्रती महिना | |
| २१ | शाईपेन व बॉलपेन बनविणारा उद्योग | ३,११६.५० | ३,११६.५० | ३,११६.५० | -- | प्रती महिना | |
| २२ | चित्रपट निर्मिती उद्योग | २,८८०.०० | २,८८०.०० | -- | -- | प्रती महिना | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २३ | काच बल्ब बनविणारा उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| २४ | काच उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| २५ | निवासी हॉटेल व उपाहारगृह उद्योग | १,[illegible]५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| २६ | कश कर्तनालय उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| २७ | रुग्णालय उद्योग | २,३९८.५० | २,३९८.५० | २,३९८.५० | -- | प्रती महिना |
| २८ | बर्फ व शितपेय बनविणारा उद्योग | २,०१४.२० | २,०१४.२० | -- | -- | प्रती महिना |
| २९ | मद्य उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ३० | धोबी काम उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| ३१ | चष्मा चौकटी बनविणारा उद्योग | २,५९२.०० | २,५९२.०० | २,५९२.०० | -- | प्रती महिना |
| ३२ | तेल गिरणी उद्योग | २,९९३.७५ | २,९९३.७५ | -- | -- | प्रती महिना |
| ३३ | कागद व कागदी पुठ्ठे बनविणारा उद्योग | २,३५७.५० | २,३५७.५० | २,३५७.५० | -- | प्रती महिना |
| ३४ | प्लास्टिक उद्योग | २,५२०.०० | २,५२०.०० | २,५२०.०० | -- | प्रती महिना |
| ३५ | रंग व वॉर्निश बनविणारा उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ३६ | पोहे, चुरमुरे व कुरमुरे बनविणारा उद्योग | २,९९३.७५ | २,९९३.७५ | -- | -- | प्रती महिना |
| ३७ | यंत्रमाग उद्योग<br>(१८४ पेक्षा जास्त),<br>(१८४ पेक्षा कमी) | ६,४३३.००<br>४,५०३.१० | ६,४३३.००<br>४,५०३.१० | ६,४३३.००<br>४,५०३.१० | --<br>-- | प्रती महिना |
| ३८ | मुद्रण उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ३९ | सार्वजनिक मोटर वाहतुक उद्योग | २,९९३.७५ | २,९९३.७५ | -- | -- | प्रती महिना |
| ४० | तयार कपडे बनविणे उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ४१ | रबर उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| ४२ | भात, पिठ व डाळ गिरणीतील उद्योग | २,९९३.७५ | २,९९३.७५ | -- | -- | प्रती महिना |
| ४३ | रबरी [illegible] बनविणारा उद्योग | २,९९३.७५ | २,९९३.७५ | २,९९३.७५ | -- | प्रती महिना |
| ४४ | पोलादी सामान बनविणारा उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ४५ | [illegible] उद्योग | २,४६६.२० | -- | -- | -- | प्रती महिना |
| ४६ | [illegible] व खडी [illegible] उद्योग | २,८४५.५० | २,८४५.५० | -- | -- | प्रती महिना |
| ४७ | सौंदर्य प्रसाधन व साबण बनविणारा उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| ४८ | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | २,२१४.०० | २,२१४.०० | २,२१४.०० | -- | प्रती महिना |
| ४९ | [illegible] | २,६२५.०० | २,६२५.०० | २,६२५.०० | -- | प्रती महिना |
| ५० | [illegible] उद्योग | २,५२०.०० | २,५२०.०० | २,५२०.०० | -- | प्रती महिना |
| ५१ | कातडी [illegible] व चामड्याच्या वस्तु तयार करणे | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ५२ | धातूची भांडी बनविणारा उद्योग | २,९२३.३० | २,९२३.३० | २,९२३.३० | -- | प्रती महिना |
| ५३ | [illegible] फाकट बनविणारा उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| ५४ | लाकडी फर्निचर बनविणारा उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना |
| ५५ | घड्याळाचे पट्टे बनविणारा उद्योग | २,९९३.७५ | २,९९३.७५ | २,९९३.७५ | -- | प्रती महिना |
| ५६ | [illegible] उद्योग | २,[illegible]५.०० | २,१२५.०० | २,१२५.०० | -- | प्रती महिना |
| ५७ | मातीची भांडी बनविणारा उद्योग | २,२००.०० | २,२००.०० | २,२००.०० | -- | प्रती महिना |
| ५८ | वन व वनशास्त्र विषयक रोजगार | २,२५५.०० | २,२५५.०० | -- | -- | प्रती महिना |
| | | अतिदुर्गम क्षेत्र | इतर क्षेत्र | -- | -- | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५९ | चांदी उद्योग | २,६४०.०० | २,६४०.०० | -- | -- | प्रती महिना |
| ६० | तंबाखू (बिडी उद्योग) | ८९.४० | ८९.४० | -- | -- | प्रती दिन |
| ६१ | स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत) | १,४७५.०० | १,४७५.०० | १,४७५.०० | -- | प्रती महिना |
| ६२ | रंग व रसायने बनविणारा उद्योग | २,९२१.४५ | २,९२१.४५ | २,९२१.४५ | -- | प्रती महिना |
| ६३ | विटा व कौले बनविण्याच्या कारखान्यातील कामधंदा | १,८९०.०० | १,८९०.०० | -- | -- | प्रती महिना |
| ६४ | म्हशी किंवा गाई किंवा दोन्ही जेथे दुध काढण्यासाठी, स्वच्छ करण्यासाठी, चारा घालण्यासाठी आणि इतर सर्व अनुषंगिक प्रक्रियासाठी ठेवण्यात येतात अशा कोणत्याही जागेतील कामधंदा (तबेला उद्योग) | ३,१३७.२० | ३,१३७.२० | ३,१३७.२० | -- | प्रती महिना |
| ६५ | मिठागरामधील कामधंदा | २,५९०.०० | -- | -- | --- | प्रती महिना |

विशेष भत्याचे दर परिमंडळनिहाय प्रत्येक अनुसूचित उद्योगाकरीता दर्शविण्यात आले आहेत.

(अ. खु. पेंडसे)
कामगार उप आयुक्त, ( ग्रा.वि. )
व सक्षम प्राधिकारी,
किमान वेतन अधिनियम, १९४८,मुंबई

(१२७)

क्र.ग्रावि/किवेअ/२०१५/कार्या-१० | ८७३७
कामगार आयुक्त यांचे कार्यालय,
कामगार भवन, ब्लॉक-ई, सी-२०,
वान्द्रे कुर्ला संकुल, वान्द्रे (पुर्व),
मुंबई-४०० ०५१.

कर्मचारीवर्ग खाते
रा. प. मध्यवर्ती कार्यालय, मुंबई-८
आवक क्र. 2734
दिनांक 12-6-15

दिनांक : 15 JUN 2015

प्रति,

मा. व्यवस्थापक (क.व औ.सं)
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
कर्मचारी खाते,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई-८

**विषय :-** शिकाऊ उमेदवार विद्यावेतनबाबत

संदर्भ : आपला दिनांक-२३.०१.२०१५ रोजीचा अर्ज.

उपरोक्त विषयासंदर्भात आपल्या अधिक माहितीकरिता **सार्वजनिक मोटार वाहतुक कामधंदा** या अनुसूचित रोजगाराची दि. २०.०७.२०१० रोजीची अधिसूचना व दि. ०५.०२.२०१५ रोजीची **विशेष भत्ता** प्रत सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे

कामगार उप आयुक्त,(ग्रावि)
मुंबई

APO (UR)

Gotake Reference222

**कामगार आयुक्त यांचे कार्यालय,**
**"कामगार भवन", ई - ब्लॉक, सी - २०,**
**वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**
**दिनांक- ५ फेब्रुवारी, २०१५**

क्र.ग्रा.वि./किवेअ/वि.भ./२०१५-१/कार्या-१० किमान वेतन अधिनियम,१९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्त्याचे दर **दिनांक ०१.०१.२०१५ ते दिनांक ३०.०६.२०१५** या कालावधीकरिता जाहीर करीत आहे.

| अ. क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ निहाय विशेष भत्त्याचे दर | | | | कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ | परिमंडळ-४ | | |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | | |
| १ | २ | ३ | | | | ४ | ५ |
| १ | मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायवादीच्या आस्थापनातील अधिवक्ते किंवा न्यायवादी यांचा अधिसंघ संस्था व विधी व्यवसायाच्या संबंधित आस्थापनेतील कामधंदा | २,२१२.०० | २,२१२.०० | २,२१२.०० | -- | प्रती महिना | |
| २ | मोटर दुरुस्ती कार्यशाळा उद्योग | ३,१०८.०० | ३,१०८.०० | ३,१०८.०० | -- | प्रती महिना | |
| ३ | बेकरी उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | प्रती महिना | |
| ४ | कापुस दाबणे व पिंजणे उद्योग | २,९१३.७५ | २,९१३.७५ | २,९१३.७५ | -- | प्रती महिना | |
| ५ | कापड रंगविणे, छपाई उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | -- | प्रती महिना | |
| ६ | काजु प्रक्रिया उद्योग | २,३९७.५० | संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता | | | प्रती महिना | |
| ७ | कागदी, गवती पुठ्ठयापासून खोकी तयार करणारा उद्योग | २,७४७.२५ | २,७४७.२५ | २,७४७.२५ | -- | प्रती महिना | |
| ८ | रासायनिक खते बनविणारा उद्योग | २,९४२.५० | २,९४२.५० | २,९४२.५० | -- | प्रती महिना | |
| ९ | कॅन्टीन आणि क्लब उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| १० | सिमेंट व सिमेंटवर आधारीत उद्योग | ३,५९६.४० | ३,५९६.४० | ३,५९६.४० | -- | प्रती महिना | |
| ११ | रस्ते तयार करणे, देखरेख करणे, बांधकाम उद्योग | २,५२०.५० | २,५२०.५० | २,५२०.५० | -- | प्रती महिना | |
| १२ | चित्रपट प्रदर्शनाचा उद्योग | २,९९६.५० | २,९९६.५० | २,९९६.५० | २,९९६.५० | प्रती महिना | |
| १३ | सायकल यांत्रिकी कार्यशाळेतील कामधंदा | २,८०८.७५ | २,८०८.७५ | | -- | प्रती महिना | |
| १४ | दवाखाना उद्योग | २,०५९.०० | २,०५९.०० | २,०५९.०० | -- | प्रती महिना | |
| १५ | औषधी द्रव्ये व औषध बनविणारा उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| १६ | दुग्धालय ( डेअरी ) उद्योग | ३,०५२.५० | ३,०५२.५० | ३,०५२.५० | -- | प्रती महिना | |
| १७ | लिखाणाच्या वह्या बनविणारा उद्योग | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| १८ | खाण्याचा तंबाखू उद्योग | २,७४५.०० | संपूर्ण महाराष्ट्र राज्याकरिता | | | प्रती महिना | |
| १९ | अभियांत्रिकी उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| २० | कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम २ पोट कलम (एम) या व्याखेतील कारखाने | २,८०८.७५ | २,८०८.७५ | २,८०८.७५ | -- | प्रती महिना | |
| २१ | शाईपेन व बॉलपेन बनविणारा उद्योग | ३,४३२.७५ | ३,४३२.७५ | ३,४३२.७५ | -- | प्रती महिना | |
| २२ | चित्रपट निर्मिती उद्योग | ३,२१०.०० | ३,२१०.०० | -- | -- | प्रती महिना | |
| २३ | काच बल्ब बनविणारा उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| २४ | काच उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| २५ | निवासी हॉटेल व उपाहारगृह उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| २६ | केश कर्तनालय उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | रुग्णालय उद्योग | २,७२०.२५ | २,७२०.२५ | २,७२०.२५ | -- | प्रती महिना | |
| २८ | बर्फ व शितपेय बनविणारा उद्योग | २,३११.२० | २,३११.२० | -- | -- | प्रती महिना | |
| २९ | मद्य उद्योग | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| ३० | धोबी काम उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| ३१ | चष्मा चौकटी बनविणारा उद्योग | २,८८९.०० | २,८८९.०० | २,८८९.०० | -- | प्रती महिना | |
| ३२ | तेल गिरणी उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | -- | प्रती महिना | |
| ३३ | कागद व कागदी पुठ्ठे बनविणारा उद्योग | २,६७३.७५ | २,६७३.७५ | २,६७३.७५ | -- | प्रती महिना | |
| ३४ | प्लास्टिक उद्योग | २,८०८.७५ | २,८०८.७५ | २,८०८.७५ | -- | प्रती महिना | |
| ३५ | पेन्ट व वॉर्निश बनविणारा उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | # |
| ३६ | पोहे, चुरमुरे व कुरमुरे बनविणारा उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | -- | प्रती महिना | |
| ३७ | यंत्रमाग उद्योग | १,०७३.०० | १,०७३.०० | १,०७३.०० | -- | प्रती महिना | # |
| ३८ | मुद्रण उद्योग | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| ३९ | सार्वजनिक मोटर वाहतुक उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | -- | प्रती महिना | |
| ४० | तयार कपडे बनविणे उद्योग | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| ४१ | रबर उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| ४२ | भात, पिठ व डाळ गिरणीतील उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | -- | प्रती महिना | |
| ४३ | रबरी फुगे बनविणारा उद्योग | ३,२०२.५० | ३,२०२.५० | ३,२०२.५० | -- | प्रती महिना | |
| ४४ | पोलादी सामान बनविणारा उद्योग | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| ४५ | सिप्झ उद्योग | २,९०२.८० | -- | -- | -- | प्रती महिना | |
| ४६ | दगड फोडणे व खडी करणे उद्योग | ३,१३४.२५ | ३,१३४.२५ | -- | -- | प्रती महिना | |
| ४७ | सौंदर्य प्रसाधने व साबण बनविणारा उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| ४८ | दुकाने व व्यापारी आस्थापना उद्योग | २,५११.०० | २,५११.०० | २,५११.०० | -- | प्रती महिना | |
| ४९ | सफाईगार व मेहतर कामधंदा | २,९१३.७५ | २,९१३.७५ | २,९१३.७५ | -- | प्रती महिना | |
| ५० | लाकुड कटाई उद्योग | २,८०८.७५ | २,८०८.७५ | २,८०८.७५ | -- | प्रती महिना | |
| ५१ | कातडी कमावणे व चामड्याच्या वस्तु तयार करणे | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| ५२ | धातुची भांडी बनविणारा उद्योग | ३,१४८.८० | ३,१४८.८० | ३,१४८.८० | -- | प्रती महिना | |
| ५३ | लाकडी फोटो चौकट बनविणारा उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| ५४ | लाकडी फर्निचर बनविणारा उद्योग | १,९८८.०० | १,९८८.०० | १,९८८.०० | -- | प्रती महिना | |
| ५५ | घड्याळाचे पट्टे बनविणारा उद्योग | ३,२०२.२५ | ३,२०२.२५ | ३,२०२.२५ | -- | प्रती महिना | |
| ५६ | हातमाग उद्योग | २,३५८.७५ | २,३५८.७५ | २,३५८.७५ | -- | प्रती महिना | |
| ५७ | मातीची भांडी बनविणारा उद्योग | २,४४२.०० | २,४४२.०० | २,४४२.०० | -- | प्रती महिना | |
| ५८ | वन व वनशास्त्र विषयक रोजगार | २,५५७.५० | २,५५७.५० | -- | -- | प्रती महिना | |
| | | अतिदुर्गम क्षेत्र | इतर क्षेत्र | -- | -- | | |
| ५९ | चांदी उद्योग | २,९४२.५० | २,९४२.५० | -- | -- | प्रती महिना | |
| ६० | तंबाखू (बिडी उद्योग) | ६०८.०० | ६०८.०० | -- | -- | प्रती महिना | # |
| ६१ | स्थानिक स्वराज्य संस्था (ग्रामपंचायत) | १,७७५.०० | १,७७५.०० | १,७७५.०० | -- | प्रती महिना | |
| ६२ | रंग व रसायने बनविणारा उद्योग | ३,१९१.५० | ३,१९१.५० | ३,१९१.५० | -- | प्रती महिना | |
| ६३ | विटा व कौले बनविण्याच्या कारखान्यातील कामधंदा | २,०५५.०० | २,०५५.०० | -- | -- | प्रती महिना | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६४ | म्हशी किंवा गाई किंवा दोन्ही जेथे दुध काढण्यासाठी, स्वच्छ करण्यासाठी, चारा घालण्यासाठी आणि इतर सर्व अनुषंगिक प्रक्रियासाठी ठेवण्यात येतात अशा कोणत्याही जागेतील कामधंदा (तबेला उद्योग) | ३,३७९.२० | ३,३७९.२० | ३,३७९.२० | -- | प्रती महिना | |
| ६५ | मिठागरामधील कामधंदा | २,८०८.७५ | -- | -- | --- | प्रती महिना | |
| ६६ | शेतकी कामधंदा | ९३६.२५ | ९३६.२५ | ९३६.२५ | ९३६.२५ | प्रती महिना | |

\# अ.क्र. ३५,३७,६० समोरील अनुसूचित उद्योगांचे विशेष भत्याचे दर पुनर्निर्धारीत दिनांका नुसार खाली दर्शविले आहेत.

| अ. क्र. | अनुसूचित उद्योगाचे नांव | परिमंडळ निहाय विशेष भत्याचे दर | | | | कालावधी | शेरा विशेष कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ | परिमंडळ-२ | परिमंडळ-३ | परिमंडळ-४ | | |
| | | रुपये | रुपये | रुपये | रुपये | | |
| ३५ | पेन्ट व वॉर्निश बनविणारा उद्योग | १,६५२.०० | १,६५२.०० | १,६५२.०० | -- | प्रती महिना | दि.२२.१०.१४ ते दि.३१.१२.१४ या कालावधीकरीता |
| ३७ | यंत्रमाग उद्योग (१८४ पेक्षा जास्त) , | ६,८०९.०० | ६,८०९.०० | ६,८०९.०० | -- | प्रती महिना | दि.०१.०१.१५ ते दि.२८.०१.१५ या कालावधीकरीता |
| | (१८४ पेक्षा कमी ) | ४,७६६.३० | ४,७६६.३० | ४,७६६.३० | -- | | |
| ६० | तंबाखू (बिडी उद्योग) | ३६१.०० | ३६१.०० | -- | -- | प्रती महिना | दि.१०.११.१४ ते दि.३१.१२.१४ या कालावधीकरीता |

विशेष भत्याचे दर परिमंडळनिहाय प्रत्येक अनुसूचित उद्योगाकरीता दर्शविण्यात आले आहेत.

05/2/15

(अ. सु. पेंडसे)
कामगार उप आयुक्त,(प्रा.वि.)
व सक्षम प्राधिकारी,
किमान वेतन अधिनियम, १९४८,मुंबई

परिपत्रक

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ४९७९

भ.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,

महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,

मुंबई ४०० ००८

दिनांक :०७ ऑक्टोबर,२०१५

महाव्यवस्थापक (आवेदन)

रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)

रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक

रा. प. प्रादेशिक कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,

रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,

दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,

म.रा.मा.प.महामंडळ,

मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादी

संदर्भ - या कार्यालयाचे परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/मावक/१३६ दिनांक २० फेब्रुवारी,२०१४

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,शुध्दीपत्र क्रमांक विपतप्र/२०१५/प्र.क्र.६२/मावक दिनांक ७ जुलै,२०१५ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन शुध्दीपत्राची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

प्रत सादर रवाना :-

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/ समन्वय)/ (प्रशासन)/ (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन शुध्दीपत्राची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन शुध्दीपत्राची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक विपताप्र/२०१५/प्र.क्र.६२/मावक
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.
दिनांकः ७ जुलै २०१५

**प्रति,**

१) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
२) सर्व विभागीय आयुक्त (महसूल)
३) सर्व जिल्हाधिकारी, सर्व जिल्हे,
४) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
५) सर्व उपजिल्हाधिकारी, सर्व जिल्हे,
६) सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व जिल्हे
७) सर्व सदस्य सचिव, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, सामाजिक न्याय विभाग
८) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग
९) सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण

**विषयः**-महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादी

**संदर्भः**- शासन पत्र क्रमांक संकीर्ण २००८/यादी/ प्र.क्र.५५३/मावक-५ दि.२६ सप्टेंबर २००८

# शुध्दीपत्र

संदर्भातील पत्रान्वये महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादीमधील महाराष्ट्र राज्यातील सर्व इतर मागासलेल्या वर्गाची यादी (आरक्षण १९ टक्के) मधील क्रमांक ८५ मध्ये कची असे नमूद करण्यात आलेले आहे. सदर इ.मा.व. यादीतील अ.क्र. ८५ मध्ये खालीलप्रमाणे दुरूस्ती करण्यात येत आहे.

यापुढे महाराष्ट्र राज्यातील अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्गाची यादीमधील महाराष्ट्र राज्यातील सर्व इतर मागासलेल्या वर्गाची यादी (आरक्षण १९ टक्के) मधील क्रमांक ८५ मध्ये कची, ( शासन निर्णय क्र.सीबीसी-१४६७-अ दि. १३-१०-१९६७) काछी, कुशवाह, शाक्य, मौर्य,मुराई, सैनी,(शासन निर्णय क्र. सीबीसी १४/२००१/प्र.क्र.२३२/मावक-५ दि.१-६-२००४) कोइरी, कोईरी, कोयरी व कुशवाहा (शासन निर्णय क्र. सीबीसी १०/२००८/प्र.क्र.५९७सुधारीत/मावक दि.३०-१-२०१४) असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुध्दीपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७१३१६१९२८४९२२ असा आहे. हे शुध्दीपत्र डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( उ. शि. लोणारे )**

सहसचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय मुंबई यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीतील सर्व आस्थापनांना वरील माहिती पृष्ठांकित करावी.

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक २७/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ५२८८
म.रा.मा.प. महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :२८ ऑक्टोबर,२०१५

महाव्यवस्थापक (आवेदन)
रा.प.प्रादेशिक कार्यालय पुणे
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था भोसरी पुणे

प्रादेशिक व्यवस्थापक
रा. प. प्रादेशिक कार्यालय,
मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

कार्यशाळा व्यवस्थापक,
रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक,
म.रा.मा.प.महामंडळ,
मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदूर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - दि.१५/६/१९९५ नंतर दिनांक १७/१०/२००१ पर्यंत शासकीय व निमशासकीय सेवेत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा कर्मचा-यांच्या सेवेबाबत.

संदर्भ - १) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ८ /१९९६
क्र.राप/आस्था/माजा-२/१९५५ दिनांक २१.३.१९९६
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १४ /२००४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/३४५९ दिनांक २ ऑगस्ट,२००४
३) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १५ /२००४
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/३५२६ दिनांक ५ ऑगस्ट,२००४
४) परिपत्रक क्र.राप/आस्था/मावक/३३८४ दिनांक ११ जुलै,२००६
५) परिपत्रक क्र.राप/कर्मवर्ग/मावक/१७७६ दिनांक १७ एप्रिल,२०१२
६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ६५/२००१
क्र.राप/आस्था/माजा-२/६२२१ दिनांक २७ डिसेंबर,२००१
७) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ०५ /२०१३
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/२५४५ दिनांक १४ जून,२०१३
८) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १६/०९
क्र.राप/कर्मवर्ग/२११० दिनांक १५ जुलै,२००९

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक:बीसीसी-२०१५/प्र.क्र.२७६A/१५/१६-ब, दिनांक २१ ऑक्टोबर,२०१५ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

--२--

**प्रत सादर रवाना :-**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन/ प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/समन्वय)/ (घटकसंवर्ग) यांचे माहितीसाठी.उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /(मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन निर्णयाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

Guy~919

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**दि. १५/६/१९९५ नंतर दिनांक १७/१०/२००१ पर्यंत शासकीय व निमशासकीय सेवेत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी अद्यापपर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नाही अशा कर्मचा-यांच्या सेवेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक : बीसीसी -२०१५/ प्र. क्र. २७६ A/१५/१६-ब**
मंत्रालय, मुंबई -४०००३२.
**दिनांक : २१ ऑक्टोबर, २०१५.**

वाचा:-

१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी १०९४/प्र.क्र.६८/९४/१६-ब, दि. १५ जून,१९९५
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००४/प्र.क्र.४५/०४/१६-ब, दि. २४ जून,२००४
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००२/प्र.क्र.९३/०४/१६-ब, दि. ३० जून,२००४
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. बीसीसी २००५/प्र.क्र.२८/०५/१६-ब, दि. १५.१२.२००५ (क्र. बीसीसी २०११/प्र.क्र.९२९/११/१६-ब, दि. ७ जानेवारी, २०१२ च्या शुध्दीपत्रकासह)
५) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २०००
६) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक,क्र. बीसीसी -२०१२/ प्र. क्र. ३३२/१२/१६-ब, दि. १८ मे, २०१३.
७) दिनांक ७.८.२०१५ रोजी हलबा समाजाच्या समस्यांबाबत मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीतील निर्णय.

**शासन परिपत्रक :-**

शासन निर्णय दि. १५/६/१९९५ नुसार, अनुसुचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५/६/१९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जर अवैध ठरले व त्यांनी विशेष मागास प्रवर्गाचे **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र** सादर केले तर, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

२. संबंधित अधिकारी / कर्मचारी दि. १५/६/१९९५ रोजी ज्या पदावर कार्यरत होते त्या पदावर त्यांची सेवा जेष्ठता दिनांक १५/६/१९९५ अशी निश्चित करावी असे आदेश शासन निर्णय दि. २४/६/२००४ निर्गमीत केले आहेत.

३. अनुसुचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे दि. १५/६/१९९५ पूर्वी शासन सेवेत नियुक्त झालेल्या मागासवर्गीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र जर अवैध ठरले व त्यांनी ते ज्या मागास प्रवर्गाचे आहेत, त्या मागास प्रवर्गाचे **जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र** सादर केले तर, त्यांच्या सेवेस संरक्षण देण्याचा निर्णय दि.३०/६/२००४ च्या शासन निर्णयान्वये शासनाने घेतला आहे व त्यांची सेवा जेष्ठता दि.१५/६/१९९५ अशी निश्चित केली आहे

४. दि. १५/६/१९९५ नंतर अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अनुसुचित जमातीचे प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांच्या सेवेस सद्यस्थितीत कोणतेही संरक्षण नाही. दिनांक १५/६/१९९५ नंतर शासन सेवेत नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे अनुसूचित जमातीचे

प्रमाणपत्र अवैध ठरल्यास त्यांच्या सेवेसही संरक्षण देण्यात यावे, या मागणीवर विचार करण्यासाठी मंत्रीगट नियुक्त करण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने दि.२५/२/२००९ च्या बैठकीत घेतला. त्यानुसार शासन निर्णय दि. ५/३/२००९ नुसार मंत्रीगटाची स्थापना करण्यात आली होती त्यानंतर दिनांक ४/३/२०११ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रीगटाची पुनर्रचना करण्यात आली होती.

५. दिनांक ४/३/२०११ च्या शासन निर्णयान्वये तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठित केलेल्या मंत्रीगटाचा अहवाल प्राप्त झाला आहे. सदर मंत्रीगटाच्या शिफारशीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. यास्तव तत्कालीन महसूल मंत्री, यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्री गटाने सादर केलेल्या अहवालासंदर्भात शासनाचा पुढील निर्णय होईपर्यंत, दिनांक १५/६/१९९५ नंतर दिनांक १७/१०/२००१ पर्यंत, या कालावधीत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे शासन सेवेत नियुक्त झालेल्या ज्या कर्मचा-यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरले आहे किंवा ज्या कर्मचा-यांनी **जात वैधता प्रमाणपत्र** अद्यापपर्यंत सादर केलेले नाही, अशा कर्मचा-यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात येऊ नये अथवा त्यांच्या सेवा समाप्त करण्यात येऊ नये.

६. वरील सूचना हया दिनांक १५/६/१९९५ नंतर दिनांक १७/१०/२००१ पर्यंत शासन सेवेत अनुसूचित जमातीच्या प्रमाणपत्राच्या आधारे नियुक्त झालेल्या कर्मचा-यांपुरत्याच लागू राहतील. आरक्षण कायदा-२००४ मधील कलम ४(१) नुसार अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क,भटक्या जमाती-ड, विशेष मागास प्रवर्ग, आणि इतर मागास प्रवर्गासाठी राखून ठेवलेल्या जागा त्या संबंधित प्रवर्गातील उमेदवारांमधून भरणे आवश्यक आहे. या कायदयातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी मागासवर्गीय अधिकारी/कर्मचारी यांच्या जात प्रमाणपत्राची पडताळणी करणे आवश्यक आहे.

७. सदर शासन परिपत्रक सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील असलेल्या सर्व विभाग प्रमुखांच्या/नियुक्ती प्राधिका-यांच्या निदर्शनास आणावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५१०२११५५११९९५०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( टि. वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) राज्यपाल यांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव,
३) उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,

४) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
७) प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्यांना उपरोक्त विषयासंदर्भातील परिपत्रकांमधील सूचनानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
८) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अखत्यारीत असलेल्या सर्व जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांना तसेच जात प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांना सदर परिपत्रकाची प्रत पाठवून त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना द्याव्यात.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की जात प्रमाणपत्र देण्यास सक्षम असलेल्या त्यांच्या अधिपत्याखालील अधिकाऱ्यांना उपरोक्त विषयासंदर्भातील परिपत्रकांमधील सूचनानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
१०) सर्व विभागीय आयुक्त,
११) सर्व सहायक आयुक्त (मावक)
१२) सर्व जिल्हाधिकारी,
१३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१४) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१५) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१६) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१८) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१९) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२०) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२१) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२२) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२३) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
२४) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
२५) संचालक, सेवायोजन, मुंबई,
२६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
२७) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
२८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३०) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,

सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर परिपत्रकाची प्रत,त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

३१) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३२) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक २८/२०१५

क्रमांक:राप/आस्था/७०८-जीई/ ५२८८
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४००००८
दिनांक : २८ ऑक्टोबर, २०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/अमरावती अकोला/ वर्धा/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : सैनिकी निवृत्तीवेतन धारकाची नागरी सेवेत पुनःनियुक्ती झाल्यानंतर नियमित वेतनश्रेणीत करावयाच्या वेतन निश्चितीबाबत.**

**संदर्भ :** १) या कार्यालयाचे कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१५/१९८७
(क्र.१५/१९८७ जा.क्र.राप/आस्था/७०८-जीई/३५६८ दि.३.७.१९८७.)
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१०/१९८८
(जा.क्र.राप/आस्था/७०८-जीई/४६३५ दि.२.७.१९८८)
३) जा.क्र.राप/आस्था/७०२-जीई/२५२५ दि.५.६.२००४
४) जा.क्र.राप/आस्था/७०४-जीई/५०२४ दि.२९.१२.२००९.

---

सैनिकी सेवेतून निवृत्त होऊन राज्य परिवहन महामंडळाच्या सेवेमध्ये पुनःनियुक्त होणा-या कर्मचा-यांची वेतननिश्चिती करण्याबाबतच्या संदर्भाधिन परिपत्रकीय सूचना निर्गमित करण्यात आलेले आहेत. तथापी संदर्भित परिपत्रक ४ (दि.२९.१२.२००९) च्या सूचनांमुळे पुनःनियुक्त माजी सैनिकांचे वेतन नियमित वेतनश्रेणीत आल्यानंतर संरक्षित होत नसल्याबाबतचा मुद्दा माजी सैनिक यांनी त्यांचे निवेदनानुसार तसेच मान्यता प्राप्त कामगार संघटनेद्वारे उपस्थित केला की,संदर्भित परिपत्रक ४ मधील सूचना हया फक्त कनिष्ठ वेतन श्रेणीतील कर्मचा-यांस लागू होत असून सदरहू कर्मचारी ज्या वेळी नियमित वेतनश्रेणीवर येतील त्या वेळी काही विभागांनी सैनिकी निवृत्ती धारकाचे वेतन नियमित वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यावर वेतननिश्चिती करून उर्वरित रक्कम वैयक्तिक वेतन अशी दर्शविण्यात येत असल्याचे निदर्शनास आणण्यात आले, तरी त्या अनुषंगाने सैनिकी निवृत्ती वेतनधारकाची वेतननिश्चिती हि नियमित वेतनश्रेणीवर आल्यानंतर कशा पध्दतीने करावी याबाबतीत सर्व विभागात एकसुत्रता रहाण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे सूचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

निवृत्ती वेतन धारक माजी सैनिकांना राज्य परिवहन महामंडळामध्ये दि.३१.०३.२००८ पूर्वी पुनःनियुक्ती दिल्या नंतर संबधीत कर्मचारी समय वेतनश्रेणीवर (Time Scale) घेतल्यावर तसेच रा.प.महामंडळातील कनिष्ठ वेतनश्रेणीचा विहित कार्यकाळ दि.३१.०३.२००८ रोजी वा त्या पूर्वी पूर्ण केल्यानंतर त्यांस नियमित वेतनश्रेणीत घेताना नियमित वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यावर वेतननिश्चिती न करता महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील खंड १६२ (ब) अन्वये सेवा विनियम ६७ (१) व सेवा विनियम ६५(ब) ३ नुसार सैन्य दलातून निवृत्त होतान शेवटी मिळालेल्या निवृत्तीच्या मुळ वेतन संरक्षित करता यावे या करिता रा.प.महामंडाळात ज्या पदात नियुक्ती झालेली आहे त्या पदातील नियमित वेतनश्रेणीतील असुधारीत वेतनश्रेणीत वेतन टप्पा असल्याने त्या वेतन टप्प्यावर वा त्या वेतनश्रेणीच्या निकटतम टप्प्यावर वेतन निश्चिती करण्यात यावी. *निकटतम टप्पा म्हणजे त्या वेतनश्रेणीतील पुढील टप्प्यावर वेतननिश्चिती करण्यात येऊ नये.*

तसेच निवृत्ती वेतन धारक माजी सैनिकांना राज्य परिवहन महामंडळामध्ये दि.०१.०४.२००८ रोजी वा तद्नंतर पुन:नियुक्ती दिल्यानंतर संबधीत कर्मचारी समय वेतनश्रेणीवर (Time Scale) आल्यावर तसेच रा.प.महामंडळातील कनिष्ठ वेतनश्रेणीचा विहित कार्यकाळ दि.०१.०४.२००८ रोजी वा त्या नंतर पूर्ण झाल्यानंतर त्यांस नियमित वेतनश्रेणीत घेताना नियमित वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यावर वेतननिश्चिती न करता महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम-१९८२ मधील खंड १६२ (ब) अन्वये सेवा विनियम ६७ (१) व सेवा विनियम ६५(ब) ३ नुसार सैन्य दलातून निवृत्त होतान शेवटी मिळालेल्या सैनिकी निवृत्तीच्या मुळ वेतन संरक्षित करता यावे या करिता रा.प.महामंडाळात ज्या पदात नियुक्ती झालेली आहे त्या पदातील नियमित वेतनश्रेणीत (वेतन टप्पा नसल्याने)सैनिकी निवृत्ती वेतन संरक्षित करण्यात यावे.

तथापी ज्या सैनिकी सेवेतील संरक्षित करावयाचे मुळ वेतन रा.प.मधील त्या पदातील नियमित वेतनश्रेणीच्या किमान टप्प्यापेक्षा कमी असल्यास अश्या कर्मचा-यांची वेतन निश्चिती, नियमित वेतनश्रेणीतील किमान टप्प्यावर करण्यात यावी व ज्यांचे वेतन नियमित वेतनश्रेणीच्या कमाल टप्प्यापेक्षा जास्त असेल, अश्या सैनिकी निवृत्ती वेतन धारकाची वेतन निश्चिती नियमित वेतनश्रेणीत कमाल टप्प्यावर करण्यांत येऊन उर्वरित रक्कम वैयक्तिक वेतन दर्शविण्यात यावे,वैयक्तिक वेतनावर अनुषंगिक भत्ते अनुज्ञेय असणार नाही.

उदा :- 'क्ष' या माजी सैनिकी निवृत्त वेतन धारकाची रा.प.महामंडळातील सुरक्षा रक्षकाच्या असुधारीत नियमित वेतनश्रेणीत रू.२४००-४५-३०७५-५०-३३७५-५५-४१४५ मध्ये समय वेतनश्रेणीत कार्यरत असल्यावर माजी सैनिकाचे निवृत्त वेतन रूपये ३५९४/- असल्यास अश्या कर्मचा-यांचे वेतन सुरक्षा रक्षकाच्या नियमित वेतनश्रेणीत संरक्षित करण्यात यावे किंवा वेतनश्रेणीचा टप्पा असल्यास त्या टप्पावर वा त्याच्या निकटतम टप्पावर म्हणजेच 'क्ष' या कर्मचा-यांचे मुळवेतन सुरक्षा रक्षक या नियमित वेतनश्रेणीत रू.३५९५/- वर संरक्षित करून वेतननिश्चिती करण्यात यावी.

आपणांस पुन्हा सूचित करण्यात येत आहे की, निवृत्ती वेतन धारक माजी सैनिकांना रा.प.महामंडळाच्या सेवेत कनिष्ठ वेतनश्रेणीत व पदात समयवेतनश्रेणीत (Time Scale) नेमणूक दिल्यावर करावयाची वेतन निश्चितीबाबत संदर्भित परिपत्रक ४ च्या सूचने अधिनच करण्यात यावी.

सदर परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने प्रसारीत करण्यात येत आहे.

उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर रवाना :**

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/
महाव्यवस्थापक (भां.व ख.)/महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / मा.अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

उप-महाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

D:\GA\PEX-Serviceman\Circular

परिपत्रक

क्रमांक:राप/आस्था/२१७-ए/ ५४०३
**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,**
**मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,**
डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई- ४०० ००८
दिनांक : ३१/१०/२०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक / अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय : आगारातील चालक/वाहकसह सर्व कामगारांना रजेचा समान हक्क देणेबाबत.**

**संदर्भ : या खात्याचे**
**१) परिपत्रक क्र. ३३/१९९६**
**(क्र.राप/आस्था/२१७-ए/७६१८,दि.१५.११.१९९६)**
**२) परिपत्रक क्र.राप/आस्था/२१७-ए/५९८५, दि.२२.१२.२०१४**

----

रा.प.महामंडळातील चालक/वाहक कर्मचा-यांना रजा मंजूर करण्यासाठी वरील परिपत्रकान्वये सविस्तर सूचना दिलेल्या आहेत, असे असतानाही चालक/वाहकांना त्यांच्या रजेचा कोटा निश्चित करताना मोठया प्रमाणावर फेरफार केला जात असल्याचे मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांच्याकडे वेगवेगळया माध्यमातून प्राप्त झालेल्या तक्रारीवरून दिसून आलेले आहे. त्यामुळे मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी आगारातील चालक/वाहकांसह सर्व कामगारांना रजेचा समान हक्क देण्यात यावा असे निदेश दिलेले आहेत.

तरी संदर्भित परिपत्रकाच्या सूचनांचे सर्व घटक प्रमुख यांनी स्वत:पुनश्च अवलोकन करावे व त्या सूचने अधिन आगारामध्ये कर्मचा-यांच्या रजा अर्जाबाबत नोंदी हया दिनांक व वेळ नोंदवून (क्लॉकवाईज) अचूकरित्या करण्यात येत आहे काय याची प्रत्यक्ष तपासणी घटक प्रमुख यांनी वेळोवेळी करण्यात यावी. सुधारीत रजा पध्दतीतील 'अ' रजिस्टर मधील नमुन्यात याबाबतच्या नोंदी करण्यात येऊन त्याची एक प्रत आगारातील कर्मचा-यांच्या माहितीस्तव सूचना फलकावर लावण्यात यावी, तसेच कर्मचा-यांस रजा अर्ज मिळाल्याबाबतची दिनांक व वेळ टाकून पोहोच देण्यात यावी. तसेच रजेच्या कोटयानुसार चालक-वाहकांना अर्जाच्या जेष्ठता क्रमवारीनुसार त्यांची रजा पगारी वा बिनपगारी होणार आहे याबाबत रजिस्टरच्या नोंदीवरून त्यांना तात्काळ अवगत करावे.

मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी दिलेल्या निर्देशानुसार आगारातील चालक/वाहकांसह सर्व कामगारांना रजेचा समान हक्क देण्यात यावा. कोणत्याही परिस्थितीत रजेबाबत विषमता व पक्षपातीपणा आढळल्यास संबधित अधिकारी/पर्यवेक्षकीय कर्मचा-यांस जबाबदार धरण्यात येईल. तसेच आगारांना भेट देण्या-या वरिष्ठ अधिकारी यांनी रजेबाबतच्या नोंदवहीची प्राधान्याने तपासणी करून जर रजेबाबत गैरप्रकार आढळून येत असेल तर संबधितांवर तात्काळ कारवाई करावी.

तरी संदर्भित सूचनांची काटेकोरपणे व अत्यंत पारदर्शकपणे अमलबजावणी करण्याबाबत मा.परिवहन मंत्री तथा अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांनी स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. त्यांचे तंतोतंत पालन करण्यात यावे.

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

उपमहाव्यवस्थापक (कर्मचारीवर्ग)

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २९ / २०१५

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ ५५२४
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : ०६ .११.२०१५.

- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे /औरंगाबाद/ नागपूर/ नाशिक/ अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

....

विषय : अनुकंपा तत्वावरील नियुक्ती बाबतची प्रकरणे विभागीय स्तरावर योग्य तऱ्हेने हाताळणेबाबत.

*****

रा.प.महामंडळामध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयाकडून सूचना प्रसारित करण्यात आल्या आहेत. परंतु मध्यवर्ती कार्यालयाच्या असे निदर्शनास आले आहे की, काही विभागांमध्ये मध्यवर्ती कार्यालयाने दिलेल्या सूचनांचे पालन योग्य रितीने केले जात नाही. काही विभागांमध्ये रा.प.कर्मचा-याच्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरी देताना रा.प.कर्मचाऱ्याचे पाल्य / अवलंबित यांचेऐवजी अन्य उमेदवाराने रा.प.कर्मचाऱ्याच्या पाल्याच्या / अवलंबिताच्या नावावर नियुक्ती स्विकारल्याचे निदर्शनास आले आहे. सदर बाब अत्यंत गंभीर असून महामंडळाच्या सध्याच्या अनुकंपा तत्वावरील कार्यपध्दतीचा भंग करणारी व महामंडळाची फसवणूक करणारी आहे.

वर नमूद केलेल्या प्रकरणांना आळा घालण्याच्या दृष्टीने सर्व विभागांनी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करणे आवश्यक आहे. या कार्यपध्दतीमध्ये प्रामुख्याने खालील मुद्यांचा अंतर्भाव करावा.

(१) कर्मचाऱ्याच्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरी देताना कर्मचा-याच्या परिवारातील अन्य सदस्यांकडून रा.प.कर्मचा-याच्या ज्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात येणार आहे तो रा.प.कर्मचाऱ्याचा अवलंबित असल्याची बाब पडताळून घ्यावी. याकरीता कुटुंबातील सदस्यांची यादी दर्शविणारी कागदपत्रे जसे की, शिधापत्र, पॅन कार्ड, आधार कार्ड इत्यादींची पडताळणी करावी. त्याचबरोबर कुटुंबातील अन्य सदस्यांकडून रा.प.कर्मचा-याच्या ज्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात येणार आहे तो कर्मचा-याच्या कुटुंबातील सदस्य असल्याचे लेखी निवेदन संबंधितांकडून घेण्यात यावे. कुटुंबातील सदस्यांपैकी जर मुलीचे लग्न झाले असेल तर त्यांचा सासरचा पत्ता व संपर्क क्रमांक कार्यालयाने प्राप्त करुन घ्यावा.

(२) मृत कर्मचाऱ्याच्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर नोकरी देताना वर नमूद केल्याप्रमाणे सदर व्यक्ती रा.प.कर्मचाऱ्यावर अवलंबून असल्याची पडताळणी करावी.

(३) अनुकंपा तत्वावरील कर्मचाऱ्याच्या अवलंबितास आगारामध्ये नियुक्ती दिल्यानंतर अथवा अगोदर सदर उमेदवाराने अनुकंपा नोकरीसाठी सादर केलेल्या अर्जाची एक प्रत संबंधित आगाराकडे पाठविण्यात यावी व सदरच्या अर्जावर अनुकंपा तत्वावर नोकरी दिलेल्या उमेदवाराचा सुस्पष्ट फोटो लावण्यात यावा.

(४) अशा प्रकारे अनुकंपा तत्वावरील रा.प.कर्मचाऱ्याच्या अवलंबिताचे अनुकंपा प्रकरण प्रगत करतेवेळी दोन रा.प.कर्मचाऱ्यांची साक्षीदार म्हणून सदर उमेदवाराच्या अर्जावर स्वाक्षरी घेण्यात यावी.

(५) अनुकंपा तत्वावरील उमेदवारास नोकरी देण्याचे प्रकरण प्रगत करतेवेळी यापूर्वी प्रसारित केलेल्या परिपत्रकीय सूचनांबरोबरच वर नमूद केलेल्या सूचनांची अंमलबजावणी करावी.

(६) प्रादेशिक व्यवस्थापक यांनी आपल्या प्रदेशांतर्गत विभागांत अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिलेली प्रकरणे तसेच प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आलेल्या प्रकरणांची तपासणी, तपासणी पथक तयार करून करावयाची आहे. सदर तपासणी पथकामध्ये विभागीय कर्मचारीवर्ग अधिकारी, आस्थापना पर्यवेक्षक/ अनुकंपा तत्वावरील कामकाज पहाणारे वरिष्ठ/ कनिष्ठ लिपीक यांचा समावेश करावा. यासाठी मध्यवर्ती कार्यशाळेकडील कर्मचा-यांचा वापर करावयाचा आहे. अशा पथकांकडून अन्य विभागांमधील अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिलेली व प्रतिक्षा यादीवरील प्रकरणांची पूर्णपणे तपासणी करावी.

..२..

(७) अनुकंपा तत्वारील नेमणुकीसाठी ठेवावयाच्या नोंदीबाबत या कार्यालयाचे परिपत्रक क्र. राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/१११५ दिनांक १२.०३.२००९ नुसार सुचना आहेत. सदर परिपत्रकीय सूचनांनुसार नोंदवही (Register) अद्ययावत ठेवण्यात येते किंवा कसे? याबाबतही तपासणी करावी.

(८) उपरोक्त नमूद केलेल्या सूचनांप्रमाणे प्रादेशिक व्यवस्थापक यांनी प्रादेशिक स्तरावर तपासणीकरीता पाठविण्यात येणाऱ्या पथकांस योग्य त्या मार्गदर्शक सूचना देण्यात याव्यात. तपासणीचे कामकाज मर्यादित कालावधीमध्ये पूर्ण होणे आवश्यक आहे. प्रदेशांतर्गत विभागांच्या तपासणीबरोबरच प्रादेशिक व्यवस्थापक यांनी, त्यांच्याशी संलग्न असलेल्या मध्यवर्ती कार्यशाळा म्हणजेच प्रादेशिक व्यवस्थापक, पुणे यांनी मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी; प्रादेशिक व्यवस्थापक, औरंगाबाद यांनी मध्यवर्ती कार्यशाळा, औरंगाबाद आणि प्रादेशिक व्यवस्थापक, नागपूर यांनी मध्यवर्ती कार्यशाळा, नागपूर यांचेकडील अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिलेली व त्यांच्याकडे प्रतिक्षा यादीवर ठेवण्यात आलेल्या प्रकरणांची तपासणी पथकांकडून करावयाची आहे.

(९) प्रादेशिक व्यवस्थापक यांनी अनुकंपा तत्वावरील प्रकरणांच्या तपासणीसाठी तपासणी पथकास कालबध्द कार्यक्रम आखून द्यावा व तपासणी बाबतचा सर्वंकष अहवाल प्रादेशिक व्यवस्थापक यांनी त्यांच्या अभिप्रायासह मध्यवर्ती कार्यलयाकडे लवकरात लवकर पाठवावा. तपासणीमध्ये जे महत्वाचे मुद्दे आढळतील त्याचा उल्लेख अहवालामध्ये करावा. तसेच प्रादेशिक व्यवस्थापक यांना सध्याच्या अनुकंपा तत्वावर देण्यात येत असलेल्या नोकरीच्या अनुषंगाने उमेदवाराच्या पात्रतेविषयी आणखी काही सूचनांची आवश्यकता वाटल्यास त्या संबंधित तपासणी पथकांस देण्यात याव्यात.

- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

....

विषयः महामंडळामध्ये नियुक्ती दिलेल्या चालकांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधीच्या कागदपत्राची तपासणी करणेबाबत.

संदर्भ :१) Administrative Circular No.72, STO/ADM/114. Dtd.18.10.1950
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३५/१९९९.
राप/आस्था/माजा-२/७५०७ दिनांक २०.१२.१९९९
३) सामान्य स्थायी आदेश क्र.५०३ मधील कलम-२६ द्वारे केलेली तरतूद.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/७४१ दिनांक १०.२.२०१४.
५) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/५९४२ दिनांक ९.१२.२०१५.

...

रा.प.महामंडळामध्ये चालक (कनिष्ठ) पदाच्या भरतीसाठी एस.एस.सी.उत्तीर्ण अशी शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

त्याचबरोबर संदर्भित परिपत्रकाद्वारे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन व पदवी परीक्षेचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झालेला वा यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापिठातून पदवी धारण केलेले उमेदवार पात्र समजण्यात यावे व त्याचबरोबर राष्ट्रीय मुक्त विद्यापिठ संस्था,नवी दिल्ली यांचे मराठी व इंग्रजीसह किमान ५ विषयासह शालान्त परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र धारण केलेल्या उमेदवारांची राज्यशासन सेवेमध्ये ज्या ज्या ठिकाणी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण अशी अर्हता विहीत केली असेल त्या ठिकाणी शासन सेवेसाठी शालान्त परीक्षा समकक्ष पात्रता आपोआप धारण केली आहे असे समजण्यात यावे या आशयाच्या सूचना दिनांक १०.२.२०१४ रोजीच्या परिपत्रकाद्वारे प्रसारित करण्यात आलेल्या आहेत.

या कार्यालयाकडे चालक पदाच्या निवडीच्या वेळी काही उमेदवारांनी बोगस शैक्षणिक अर्हतेचे दाखले सादर केले अशा काही तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत.

या विषयाच्या अनुषंगाने आपणांस सूचना देण्यात येतात की, रा.प.महामंडळामध्ये चालक (कनिष्ठ) पदाची नियुक्ती दिलेल्या सर्व उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्राची पडताळणी संबंधीत एस.एस.सी.बोर्ड मुक्त विद्यापिठ, राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली या संस्थेकडून करण्यात यावी व पडताळणी अंती ज्या उमेदवारांचे शैक्षणिक अर्हतेचे दाखले बनावट आढळतील अशा कर्मचा-यांविरुध्द रा.प.महामंडळाद्वारे वेळोवेळी प्रसारित केलेल्या परिपत्रकामधील सूचनांप्रमाणे विनाविलंब कार्यवाही करावी. जेणेकरुन बनावट शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांच्या नियुक्ती रद्द करणे प्रशासनाला शक्य होईल.

प्रादेशिक व्यवस्थापक यांनी प्रदेशांतर्गत विभागाच्या वर नमुद केलेल्या कार्यवाहीवर कार्यक्षम नियंत्रण ठेवावे.विभागांद्वारे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे एका महिन्यामध्ये पाठविण्यात यावा.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

F:\Asthapana 2015\Circular.docx

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक : ३७/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/६०६५
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक : १५.१२.२०१५.

- महाव्यवस्थापक (आवेदन),रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / औरंगाबाद / नागपूर/ नाशिक / अमरावती.
- कार्यशाळा व्यवस्थापक रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे / औरंगाबाद / नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/ अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/ उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

....

विषयः रा.प.महामंडळातील वर्ग-३ (राज्यसंवर्ग) व वर्ग-३ (घटकसंवर्ग) व वर्ग-४ पदामधील सरळसेवा भरती व अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक अर्हतेच्या दाखल्याची / गुणपत्रकाची पडताळणी संबंधीत शैक्षणिक संस्था व विद्यापिठामार्फत करणेबाबत व उमेदवारांची चारित्र्य पडताळणी करणेबाबत.

संदर्भ :१) Administrative Circular No.72, STO/ADM/114. Dtd.18.10.1950
२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३५/१९९९.
राप/आस्था/माजा-२/७५०७ दिनांक २०.१२.१९९९
३) सामान्य स्थायी आदेश क्र.५०३ मधील कलम-२६ द्वारे केलेली तरतूद.
४) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/७४१ दिनांक १०.२.२०१४.

...

रा.प.महामंडळातील वर्ग-३ (राज्यसंवर्ग) व वर्ग-३ (घटकसंवर्ग) व वर्ग-४ पदामधील निरनिराळी पदे सरळसेवा भरती व अनुकंपा तत्वावरील नियुक्तीद्वारे भरण्यात येतात. प्रत्येक पदाकरीता निरनिराळी शैक्षणिक अर्हता विहित केलेली आहे.

रा.प.महामंडळातील निरनिराळी पदे भरण्याची कार्यवाही केल्यानंतर ज्या उमेदवारांना वर्ग-३ (राज्यसंवर्ग) व वर्ग-३ (घटकसंवर्ग) व वर्ग-४ पदामधील निरानिराळया पदावर नियुक्त्या दिल्या जातात अशा उमेदवारांच्या संबंधीत पदासाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक अर्हता संबंधीचे दाखले,गुणपत्रिका संबंधीत शैक्षणिक मंडळ एस.एस.सी. बोर्ड, विद्यापिठाकडे तपासणीसाठी पाठविण्यात यावी व तपासणीअंती जर शैक्षणिक अर्हता दाखले / गुणपत्रिका बनावट आढळल्यास सदर कर्मचा-यांविरुध्द रा.प.महामंडळाच्या सेवाविषयक कार्यपध्दती व वेळोवेळी प्रसारित केलेल्या परिपत्रकामधील सूचनेप्रमाणे कार्यवाही करावी.

त्याचबरोबर कर्मचा-यांच्या चारित्र्य पडताळणीची कार्यवाही करावी. जेणेकरुन महामंडळामध्ये अनुचित पध्दतीने सेवाप्रवेश घेतलेल्या कर्मचा-याच्या नियुक्त्या वेळीच खंडीत होतील.

वर नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता दाखले व गुणपत्रिका तपासणीसाठी काही शैक्षणिक मंडळ, विद्यापिठाद्वारे शुल्काची आकारणी करण्यात येते. ज्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक अर्हता दाखला गुणपत्रिकाची तपासणी करता शुल्क आकारणी केली जाईल अशी रक्कम संबंधित कर्मचा-यांकडून वसुल करण्यात यावी व अशाप्रकारे कार्यवाही कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्रमांक ३६/२०१५ दिनांक १५.१२.२०१५ अन्वये चालक (कनिष्ठ) पदाकरीता नियुक्ती दिलेल्या कर्मचा-यांच्या शैक्षणिक अर्हता दाखले,गुणपत्रिका तपासणीसाठी शुल्क आकारल्यास त्याबाबतची वसुलीही संबंधित कर्मचा-यांकडून करण्यात यावी.

सदरची कार्यपध्दती अत्यंत महत्वाची असल्यामुळे विनाविलंब कार्यवाही करण्यात यावी. वर नमुद केल्याप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास एका महिन्यामध्ये अवगत करण्यात यावा. प्रादेशिक कार्यालयाद्वारे प्रदेशांतर्गत विभागाच्या कार्यवाहीवर कार्यक्षम नियंत्रण ठेवण्यात आले. विभागांद्वारे करण्यात येत असलेल्या कार्यवाहीचा वेळोवेळी आढावा घेऊन सर्व विभागांद्वारे केलेल्या कार्यवाहीचा एकत्रित अहवाल दिनांक ३१.१.२०१६ पर्यंत मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

सदरची बाब अत्यंत महत्वाची समजण्यात यावी.

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव/
मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) /
सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय).

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्रमांक ३८/२०१५

क्र.राप/कर्मवर्ग/मावक/ ६९८०
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८
दिनांक :- १८ डिसेंबर,२०१५

- महाव्यवस्थापक (आवेदन)
  रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण)
  रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
- प्रादेशिक व्यवस्थापक
  रा. प. प्रादेशिक कार्यालय,
  मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
- कार्यशाळा व्यवस्थापक,
  रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,
  दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक,
  म.रा.मा.प.महामंडळ,
  मुंबई/ठाणे/रत्नागिरी/रायगड/सिंधुदुर्ग/पालघर/पुणे/सातारा/सांगली/सोलापूर/कोल्हापूर/नाशिक/धुळे/जळगांव/अहमदनगर/औरंगाबाद/बीड/जालना/नांदेड/उस्मानाबाद/लातूर/परभणी/नागपूर/चंद्रपूर/भंडारा/वर्धा/ गडचिरोली/अमरावती/बुलढाणा/अकोला/यवतमाळ.

विषय - शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा.उच्च न्यायालयाच्या दिनांक ७ एप्रिल,२०१५ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.

संदर्भ - कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. ०७/२०१५
क्र.राप/कर्मवर्ग/मावक/११६ दिनांक २४ फेब्रुवारी,२०१५

*****

उपरोक्त विषयाबाबत महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन शुद्धिपत्रक क्रमांक : बीसीसी-२०१३/ प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३/१६-ब, दिनांक २ डिसेंबर,२०१५ ची प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडली आहे.

वरील शासन शुद्धिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची कृपया पोच द्यावी.

सोबत :वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**प्रत सादर रवाना :-**

१) मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / उपमहाव्यवस्थापक (विधि)/ सचिव,म.रा.मा.प. महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य कामगार अधिकारी / जनसंपर्क अधिकारी/ अध्यक्षांचे स्वीय सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यबळ/ समन्वय)/ (प्रशासन)/ (घटकसंवर्ग)/(सामान्य प्रशासन) यांचे माहितीसाठी. उपरोक्त शासन शुद्धिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

२) मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) यांचे माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी. उपरोक्त शासन शुद्धिपत्रकाची प्रत यासोबत जोडली आहे.

सोबत :वरीलप्रमाणे

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.) करिता

**शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ७ एप्रिल, २०१५ च्या अंतरीम आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही.**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन शुध्दिपत्रक क्रमांक: बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब**
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : २ डिसेंबर , २०१५.

**वाचा:-**

१. सन २०१४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३, दिनांक ९ जुलै, २०१४. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४.
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक सीबीसी-१०/२०१३/प्र.क्र.३५/ मावक, दि.१५ जुलै,२०१४.
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२४.७.२०१४.
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०१३/प्र.क्र.३५४/भाग-२/२०१३ /१६-ब, दि.२१.२.२०१५.
५. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, ( महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ )

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ या अध्यादेशाविरोधात मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.२०५३/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १४.११.२०१४ च्या आदेशान्वये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून, उपरोक्त संदर्भाधीन क्रमांक ४ येथे नमूद केलेल्या दिनांक २१.२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये **शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता आरक्षणाच्या तरतुदीनुसार सरळसेवा भरतीसाठी व शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता मा. उच्च न्यायालयाच्या अंतरिम आदेशानुसार करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सविस्तर सूचना निर्गमित करण्यात आलेल्या होत्या. तथापि,** महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ चे कायदयात रूपांतर होऊन महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१४, (महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ ) अस्तित्वात आला आहे. सदर अधिनियमास याचिका कर्त्यांनी रिट याचिका क्रमांक ३१५१/२०१४ अन्वये आव्हान केले आहे. या प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिनांक ७.४.२०१५ रोजीच्या आदेशानुसार महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमास स्थगिती दिलेली आहे

व त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश विचारात घेता, या विभागाच्या दिनांक २१.२.२०१५ च्या आदेशात सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन शुध्दिपत्रक :-

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३१५१/२०१४ या प्रकरणी दि.७.४.२०१५ रोजी दिलेले आदेश विचारात घेऊन शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

अ) सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधीन क्र.४ येथील दिनांक २१.२.२०१५ रोजीच्या शासन निर्णयामधील अनुक्रमांक **“प)”** येथे नमूद सुचना वगळण्यात येत आहेत.

आ) शैक्षणिक व सामाजिक मागास प्रवर्गांतर्गत मराठा समाजास शासकीय/निमशासकीय सेवा (सरळसेवा भरतीसाठी ) व शैक्षणिक संस्थांमध्ये १६ टक्के आरक्षण देण्याबाबतच्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १/२०१५ या अधिनियमाची अंमलबजावणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयापर्यंत स्थगित करण्यात येत आहे. सदर स्थगितीमुळे शासकीय व निमशासकीय सेवेतील सरळसेवा भरतीकरिता दिनांक ९ जुलै, २०१४ पूर्वीच्या प्रचलित आदेशांनुसार विहित केलेल्या १०० बिंदुनामावलीचा वापर करून पदे भरण्याची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक संस्थामधील प्रवेश पूर्वीच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सुरु राहतील.

इ) शासकीय व निमशासकीय सेवेतील रिक्त पदांसाठी दि.१४.११.२०१४ पूर्वी, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणासह जाहिरात दिली असल्यास, अशा पदांवर मा. उच्च न्यायालयाचा अंतिम निर्णय होईपर्यंत खुल्या प्रवर्गातील, गुणवत्तेनुसार पात्र उमेदवारांमधून तात्पुरत्या स्वरूपात जास्तीत जास्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी किंवा सदर न्यायालयीन प्रकरणाचा अंतिम निर्णय, यापैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीकरिता, तदर्थ स्वरूपात नेमणुका करण्यात याव्यात.

ई) उपरोक्त नेमणुका या मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या रिट याचिका क्र.३१५१/२०१४ श्री. संजित शुक्ला विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर संलग्न याचिका या प्रकरणी होणाऱ्या अंतिम निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येतील,ही बाब संबंधितांच्या नियुक्ती आदेशात स्पष्टपणे नमूद करावी.

२. सदर शासन निर्णय राज्यातील सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालये, सेवामंडळे, महानगरपालिका, नगरपालिका, शैक्षणिक संस्था,स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हा परिषदा, महामंडळे,शासकीय अनुदान प्राप्त संस्था,विद्यापीठे,सहकारी संस्था, शासकीय उपक्रम व शासनाच्या अधिपत्याखालील किंवा शासनाने अनुदान दिलेली मंडळे इत्यादींना लागू राहील. याबाबत सर्व प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व क्षेत्रिय कार्यालयांना/आस्थापनांना योग्य ते आदेश निर्गमित करावेत व सदर आदेशाची संबंधित प्रशासकिय विभागाने तातडीने अंमलबजावणी करावी.

३. सरळसेवेद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्त्यांबाबत व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत वरीलप्रमाणे शासन निर्णयाचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ, ३८७८/२०१५, दिनांक १४.०८.२०१५ , विधी व न्याय विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ८२१/२०१५ दिनांक ०९.०९.२०१५ आणि अनौपचारिक संदर्भ क्र. ११२४/२०१५ दिनांक २४.११.२०१५ अन्वये प्राप्त सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन शुध्दिपत्रक शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१५१२०२१७५८१६६८०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**( टि. वा. करपते )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. सभापती,विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२) मा. अध्यक्ष विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
३) मा. विरोधी पक्षनेता,विधानपरिषद
४) मा. विरोधी पक्षनेता,विधानसभा
५) सर्व विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य
६) राज्यपाल यांचे सचिव,
७) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
८) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
९) मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य.
१०) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग,
११) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानसभा)
१२) प्रधान सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय(विधानपरिषद)
१३) सर्व विभागीय आयुक्त,
१४) सर्व सहायक आयुक्त (मागासवर्ग कक्ष)
१५) सर्व जिल्हाधिकारी,
१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ शाखा, मुंबई,
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
१९) प्रबंधक, लोकायुक्त आणि उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२०) प्रबंधक,महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण,मुंबई,नागपूर,औरंगाबाद,
२१) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२२) सचिव,राज्य निवडणूक आयोग,
२३) सचिव,राज्य माहिती आयोग,
२४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
२५) राज्यातील सर्व महामंडळे आणि उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२६) सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२७) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२८) संचालक, समाजकल्याण, पुणे,
२९) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक,
३०) संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
३१) संचालक, सेवायोजन, मुंबई,
३२) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर,
३३) महालेखापाल, महाराष्ट्र १/२ (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर,
३४) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
३५) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
३६) सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
३७) सर्व मंत्रालयीन विभाग, त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिपत्त्याखालील सर्व विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सदर शासन निर्णयाची प्रत, त्यांच्या स्तरावरुन स्वतंत्रपणे पाठवून कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात याव्यात.
३८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई
३९) सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षांची मध्यवर्ती कार्यालये,महाराष्ट्र राज्य,
४०) निवड नस्ती, कार्यासन १६-ब.

***********

# सामान्य स्थायी आदेश क्र.१२१६ दि.२६ नोव्हेंबर२०१५

(कर्मचारीवर्ग खात्याने प्रसारीत केलेला)

विषय : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ (सेवाप्रवेश, बढती, जेष्ठता व पुन:प्रवर्गीकरण कार्यपध्दतीच्या परिशिष्ठ "अ" व "ड" मध्ये फेरबदल)

संदर्भ : वेळोवेळी दुरुस्त केल्यानुसार सामान्य स्थायी आदेश क्र. ५०३, दि. १९.०६.१९५९.

******

संचालक मंडळाने ठराव क्र. २००५:०१:०५, दि. २९.०१.२००५ अन्वये पर्यवेक्षकीय संवर्ग निर्माण करण्यास मंजूरी देऊन त्यामध्ये काही बदल करणे आवश्यक झाल्यास तसे बदल करण्याचे अधिकार मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना दिले आहेत, त्यानुसार खाली नमुद केल्याप्रमाणे नविन निम्नस्तर पदे निर्माण करुन त्याची वेतनश्रेणी कामगार करार सन २०१२-२०१६ नुसार दि.०१.०४.२०१२ पासून सुधारीत करण्यात आली असून ती खालीलप्रमाणे आहे.

## परिशिष्ठ "अ" भाग (२) वाहतुक

| प्रवर्ग | वेतन श्रेणी | रकाना १ मधील पदाच्या प्रवर्गावर ज्यापासुन बढती देता येते तो प्रवर्ग | खात्याच्या बढत्यांचे प्रमाण | सरळसेवा प्रवेशाचे प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| सहा. वाहतुक अधिक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.७६६०-२५०२० | --- | --- | १००% |
| वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |
| **भाग (३) भांडार** | | | | |
| भांडार पर्यवेक्षक (कनिष्ठ) / वरिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु. ४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.७६६०-२५०२० | --- | --- | १००% |
| भांडारपाल (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **भाग (४) स्थापत्य अभियंता** | | | | |
| कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.७६६०-२५०२० | --- | --- | १००% |
| कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.७६६०-२५०२० | --- | --- | १००% |
| **भाग (५) यंत्र अभियांत्रिकी** | | | | |
| सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक(कनिष्ठ) / तांत्रिक सहाय्यक(कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.७६६०-२५०२० | --- | --- | १००% |
| वरिष्ठ कार्यदेशक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४७००-५१३७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.७८३०-२५५८१ | --- | --- | १००% |
| कनिष्ठ कार्यदेशक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.७६६०-२५०२० | --- | --- | १००% |
| प्रभारक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु. ६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |
| आरेखक (यांत्रिकी) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |
| **भाग (६) सुरक्षा** | | | | |
| सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सहा.सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४०५०-४४२७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.५०५०-१६६११ | --- | --- | १००% |
| आगरक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |
| **भाग (७) लेखा** | | | | |
| लेखाकार (कनिष्ठ) / कनिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |
| वरिष्ठ संगणित्र चालक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.रु.६७९०-२२१९१ | --- | --- | १००% |

## परिशिष्ठ " ड"

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | सहा. वाहतुक अधिक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.७६६०-२५०२० | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) वाहतूक क्षेत्रातील कामाचा २ वर्षाचा अनुभव (रा.प. कर्मचा -यांसाठी केवळ सहा.वाह.निरिक्षक /वाहतूक निरिक्षक व वरिष्ठ कारकून, पदातील वाहतूक खाते / शाखेच्या कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार''एम.एस.सी.आय.टी.'' /तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>४) शारिरीक पात्रता : ऊंची -१६३ सें.मी. (किमान ) (महिला उमेदवारांसाठी ऊंची १५३ सें.मी.)<br>५) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |
| २ | वाहतूक निरीक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.६७९०-२२१९१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) वाहतूक क्षेत्रातील कामाचा १ वर्षाचा अनुभव (रा.प. कर्मचा-यांसाठी केवळ सहा.वाह.निरिक्षक /वाहतूक नियंत्रक व वरिष्ठ कारकून, पदातील वाहतूक खाते/शाखेच्या कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३)उमेदवार''एम.एस.सी.आय.टी.'' / तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | ४) शारिरीक पात्रता :<br>ऊंची -१६३सें.मी.(किमान )<br>(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५३ सें.मी.)<br>५) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प.मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. | |
| ३ | लेखाकार (कनिष्ठ)/ कनिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य विषयातील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) लेखापाल कामाचा १ वर्षाचा अनुभव (रा.प.कर्मचा-यांसाठी वरिष्ठ लिपिक पदातील लेखा खात्यातील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) उमेदवार ‘‘एम.एस.सी.आय.टी.‘‘/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |
| ४ | भांडार पर्यवेक्षक (क.)/ वरिष्ठ संग्रह पडताळक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७६६०-२५०२० | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा वाणिज्य वा विज्ञान शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>किंवा<br>ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (तीन वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) साठा/साम्रगी व्यवस्थापनचा कोर्स उत्तीर्ण असल्यास प्राधान्य<br>३) मोटारीचे सुटे भाग इ. भांडार सामान हाताळणे व त्याच्या नोंदी ठेवणे व खरेदी करण्याबाबतचा २ वर्षांचा व्यावहारिक अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी वरिष्ठ लिपिक पदातील भांडार खात्यातील कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>४) उमेदवार ‘‘एम.एस.सी.आय.टी.‘‘/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| ५ | भांडारपाल (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.६७९०-२२१९१ | १)वाणिज्य वा विज्ञान शाखेचा पदवीधारक असणे आवश्यक.<br>किंवा<br>ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (३वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) साठा/सामग्री व्यवस्थापनचा कोर्स उत्तीर्ण असल्यास प्राधान्य<br>३) मोटारीचे सुटे भाग इ. भांडार सामान हाताळणे व त्याच्या नोंदी ठेवणे व खरेदी करण्याबाबतचा १ वर्षांचा व्यावहारिक अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी कनिष्ठ लिपिक पदातील भांडार खात्यातील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>४) उमेदवार ''एम.एस.सी.आय.टी.'' / तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |
| ६ | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.७६६०-२५०२० | १) स्थापत्य अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३ वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या स्थापत्य अभियांत्रिकी विषयामधील पदवीधारकास अधिक पसंती. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल) |
| ७ | कनिष्ठ अभियंता (विद्युत) (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु. ७६६०-२५०२० | १) विद्युत अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका (३ वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त विद्यापिठाच्या विद्युत अभियांत्रिकी शाखेतील पदवीधारकास अधिक पसंती. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |
| ८ | सहाय्यक कार्यशाळा अधिक्षक / तांत्रिक सहाय्यक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.७६६०-२५०२० | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (३ वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | (रा.प.कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा/आगार कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>४) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक. | |
| ९ | वरिष्ठ कार्यदेशक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४७००-५१३७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.७८३०-२५५८१ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (तीन वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा २ वर्षाचा अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा/आगार कार्यशाळेतील कामाचा २ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>४) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक.<br>५) उमेदवाराने संबंधित व्यवसाय चाचणी परीक्षा (ट्रेड टेस्ट) उत्तीर्ण होणे आवश्यक. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १० | कनिष्ठ कार्यदेशक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४६००-५०२८<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.७६६०-२५०२० | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका. (तीन वर्षे मुदतीची) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा/ आगार कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>४) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक.<br>५) उमेदवाराने संबंधित व्यवसाय चाचणी परीक्षा (ट्रेड टेस्ट) उत्तीर्ण होणे आवश्यक. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |
| ११ | प्रभारक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु. ६७९०-२२१९१ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची किमान पदविका.(तीन वर्षे मुदतीची ) असणे आवश्यक.<br>२) मोटार दुरुस्ती कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव. (रा.प.कर्मचा-यांसाठी रा.प.कार्यशाळा/ आगार कार्यशाळेतील कामाचा १ वर्षाचा अनुभव ग्राहय राहील.)<br>३) ऑटोमोबाईल, किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील पदवीधारकांस अधिक पसंती.<br>४) अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचा परवानाधारक असावा किंवा रा.प. मध्ये प्रशिक्षणासाठी उपस्थित झाल्याच्या तारखेपासून दोन | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | वर्षाच्या मुदतीत अवजड वाहतूकीची वाहने चालविण्याचे लायसन्स सादर करणे आवश्यक.<br>५) उमेदवाराने संबंधित व्यवसाय चाचणी परीक्षा (ट्रेड टेस्ट) उत्तीर्ण होणे आवश्यक. | |
| १२ | आरेखक (यांत्रिकी) (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.६७९०-२२१९१ | १) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची पदवी/ पदविका ऑटोकॅडसह (३वर्षे) मुदतीची असणे आवश्यक तसेच ऑटोकॅड विषयाबाबत व्यवसाय चाचणी घेण्यात येईल.<br>**किंवा**<br>२) ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल अभियांत्रिकीमधील शासनमान्य संस्थेची पदवी/ पदविका (३वर्षे) मुदतीची असणे आवश्यक तसेच शासनमान्य / खाजगी संस्थेची ''ऑटोकॅड प्रमाणपत्र परीक्षा किमान २ महिने मुदतीची उत्तीर्ण असणे आवश्यक. तसेच, ऑटोकॅड विषयाबाबत व्यवसाय चाचणी घेण्यात येईल.<br>३) ऑटोकॅड संबधीत व्यवसायातील कामाचा १ वर्षाचा अनुभव | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |
| १३ | वरिष्ठ संगणित्र चालक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ) वेतनश्रेणी. रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी. रु.६७९०-२२१९१ | गणित किंवा सांख्यिकी किंवा वाणिज्य किंवा विज्ञान यामधील पदवीधर<br>किंवा<br>अभियांत्रिकीमधील पदविकाधारक. एखाद्या मान्य संस्थेचा / विद्यापिठाचा संगणित्र चालन/ संगणित्रविज्ञान इ. मधील प्रमाणपत्र/ पदविका पाठयक्रम पूर्ण केलेल्या उमेदवारांना विशेष पसंती. उमेदवारांना अभियोग्यता | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | (कलदर्शक) उत्तीर्ण व्हावे लागेल.<br>टिप :- स्वतंत्रपणे, पाळयांमध्ये काम करावे लागेल. | |
| **१४** | सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) कायदेविषयक ज्ञान हे अतिरिक्त अर्हता म्हणून समजण्यात येईल<br>३) माजी सैनिक / पोलीस यांना प्राधान्य.<br>४) उमेदवार "एम.एस.सी.आय.टी." / तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>५) शारिरीक पात्रता ऊंची १६५ से.मी.(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५५ से.मी.)छाती ७८ सें.मी.न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी)<br>६) शारिरीक क्षमतेची चाचणी :<br>(१) ५ मिनिटात १ कि.मी. धावणे.<br>(२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशा रितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.<br>(३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक- एक पाय टाकून (अ‍ॅस्ट्राइड) १० उडया मारणे. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल) |
| **१५** | सहा.सुरक्षा निरीक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४०५०-४४२७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) उमेदवार | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | वेतनश्रेणी.<br>रु.५०५०-१६६११ | ''एम.एस.सी.आय.टी.''/ तत्सम शासनमान्य संस्थेचा संगणक कोर्स उत्तीर्ण असावा.<br>३) शारिरीक पात्रता ऊंची १६५ से.मी.(महिला उमेदवारांसाठी ऊंची १५५ से.मी.) छाती ७८ सें.मी.न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी)<br>४) शारिरीक क्षमतेची चाचणी :<br>(१) ५ मिनिटात १ कि.मी. धावणे.<br>(२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशा रितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.<br>(३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून (ॲस्ट्राइड ) १० उडया मारणे. | |
| **१६** | आगरक्षक (कनिष्ठ) | अ) प्रथम ३ वर्षाकरीता (कनिष्ठ)वेतनश्रेणी.<br>रु.४१६०-४५४७<br>ब) ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी.<br>रु.६७९०-२२१९१ | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कोणत्याही शाखेतील पदवीधारक असणे आवश्यक.<br>२) मान्यताप्राप्त शासकीय संस्थेची अग्नीक्षमनाची पदवीका आवश्यक.<br>३) ''२'' मधील अर्हतेशी समकक्ष सेनादलाची अर्हता असणा-या माजी सैनिकांना अधिक पसंती.<br>४) शारिरीक पात्रता ऊंची १६५ से.मी. (महिला उमेदवारांसाठी ऊंची १५५ से.मी.) छाती ७८ सें.मी.न फुगविता (पुरुष उमेदवारांसाठी )<br>५) शारिरीक क्षमतेची चाचणी.<br>(१) ५ मिनिटात १ कि.मी. धावणे. | ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ५वर्ष शिथिल) |

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | अर्हता व अनुभव | वरची वयोमर्यादा |
|---|---|---|---|---|
| | | | (२) जमीनीशी समांतर बारला छाती टेकेल अशारितीने सिंगल बारवर पुलअप्स काढणे.<br>(३) सर्व अवयवांचा समन्वय साधून दोन्ही बाजुला एक-एक पाय टाकून (अॅस्ट्राइड) १० उडया मारणे. | |

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

क्रमांक : राप/प्रशा/कर्मवर्ग/३३६-अ/ ५८८३
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई ४०० ००८.
दिनांक २८/११/२०१५.

**प्रत माहिती सादर रवाना :**

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं. अ.)/ उपमहाव्यवस्थापक (विधि)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/

मुख्य स्थापत्य अभियंता /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक अधिकारी /मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.) / अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव /उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव / मानसेवी मुख्य वैद्यकीय अधिकारी/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे सचिव

कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/सहा.कर्मचारीवर्ग अधिकारी (मनुष्यब/नियोजन/ समन्वय)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(घटकसंवर्ग)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग).

महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.

उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.

प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प. प्रादेशिक कार्यालय,

मुंबई /पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती.

कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.

विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,

मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/नांदेड/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/ सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली/वर्धा/ अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

परिपत्रक

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ ६३३९
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई सेंट्रल,मुंबई-४०० ००८.
दिनांक: ३१ डिसेंबर,२०१५.

महाव्यवस्थापक (आवेदन),प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण)रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा,दापोडी,पुणे/औरंगाबाद/नागपूर.
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
ठाणे/ मुंबई/पालघर/रायगड /रत्नागिरी /सिंधुदूर्ग /नाशिक /जळगांवं/ धुळे /अहमदनगर /
पुणे/सातारा /सांगली/कोल्हापूर /सोलापूर /औरंगाबाद /जालना / लातूर /उस्मानाबाद /परभणी/ नांदेड /
अमरावती / अकोला / नागपूर / वर्धा / भंडारा / चंद्रपूर / गडचिरोली.

**विषय: म.रा.मा.प.महामंडळातील अधिकारी/कर्मचारी व त्यांचे कुटुंबियांसाठी मोफत आरोग्य सेवा सुरु करण्याबाबत.**

**संदर्भ: १)क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/३६६८ दि.१६.०७.२०१५.**
**२)स्मरणपत्र क्र.१ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/४००६ दि.७/८/२०१५.**
**३)स्मरणपत्र क्र.२ क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/५४६४ दि.०३/११/२०१५.**

--------

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भित परिपत्रकान्वये आपल्या घटक / विभागातील सर्व रा.प.अधिकारी / कर्मचारी व त्यांचे कुटूंबियांची माहिती विहीत नमुन्यामध्ये संकलित करुन ती या कार्यालयास पाठविण्याबाबत कळविण्यांत आले होते. सदरची माहिती विहीत मुदतीत उपलब्ध न झाल्याने संदर्भित क्र.२ व ३ नुसार तसेच प्रादेशिक कार्यालयास दूरध्वनीद्वारे पुन्हा कळविण्यात आले होते. सदर माहितीची तपासणी करता सदरची माहिती त्या त्या विभागाच्यां नियुक्ती कर्मचारी संख्येप्रमाणे जुळत नसल्याने पुन्हा एकदा पडताळणी करुन विभागातील सध्याचे एकूण नियुक्त स्थिती प्रमाणे संदर्भित परिपत्रक क्र.१ नुसार दिलेल्या विहीत नमुन्यात पाठविण्यात यावी. सदरची माहिती देताना एकूण कर्मचारी व त्यांचे अवलंबित यांचीही संख्या कळविण्यात यावी.

स्वदेश सोशल व हेल्थ फाऊंडेशन तर्फे देण्यात येणारी मोफत आरोग्य सेवा रा.प.कर्मचा-यांना लागू करण्यासाठी रा.प.महामंडळातील कार्यरत सर्व अधिकारी / कर्मचारी यांची विहीत नमुन्यातील माहिती स्वदेश फाऊंडेशनला पुरविणे आवश्यक आहे. स्वदेश फाऊंडेशनतर्फे प्रत्येक कर्मचारी व त्यांचे कुटूंबियांसाठी हेल्थ कार्ड देण्यात येणार असून सदर हेल्थ कार्डच्या आधारेच मोफत आरोग्य सेवेचा लाभ रा.प.कर्मचारी व कुटूंबियांना घेता येणार आहे. ज्या कर्मचा-यांची माहिती या कार्यालयास प्राप्त झालेली नाही अशा कर्मचा-यांना हेल्थ कार्ड नसल्यास सदर योजनेचा लाभ घेता येणार नाही व त्यामुळे कामगार तक्रार उद्भवल्यास त्याची सर्व जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घेण्यात यावी.

तरी या परिपत्रकाद्वारे पुन्हा सुचना देण्यात येत आहे की, आपल्या घटक / विभागातील सर्व कर्मचा-यांची एकत्रित माहिती संकलित करुन 'Excel ' मध्ये stadm@rediffmail.com येथे दिनांक १०/०१/२०१६ पर्यंत मेल करण्यात यावी.

सदरची बाब अत्यंत तातडीची समण्यात यावी.

सही -
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं)**

कृ.मा.प.

<u>प्रत सादर रवाना:</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी /
महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (भां.व ख) / महाव्यवस्थापक (यं.अ) /
उप महाव्यवस्थापक (नियोजन) /उप महाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / उप महाव्यवस्थापक(विधि) /
मुख्य कामगार अधिकारी /सचिव, म.रा.मा.प.महामंडळ /मुख्य स्थापत्य अभियंता /
सहा.जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिक / मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक /
मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेमं)/उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सहाय्यक /
अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/मुख्य मानसेवी वैद्यकीय अधिकारी /सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय) /
(मनुष्यबळ) / (घटक संवर्ग)/ (प्रशासन)(सामान्य प्रशासन) यांचे माहितीसाठी.

**महाव्यवस्थापक (क.व औ.सं)**

**कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र३९/२०१५.**

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/युआर/ ६३८४
म.रा.मा.प.महामंडळ,मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आ.ना.मार्ग,
मुंबई- ४०० ००८.
दिनांक -३१ डिसेंबर, २०१५.

महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
प्रादेशिक व्यवस्थापक, रा.प.प्रादेशिक कार्यालय, मुंबई/ पुणे/ औरंगाबाद/नागपूर/नाशिक/ अमरावती.
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी-पुणे/ औरंगाबाद/नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.मुंबई/ पालघर/ रायगड/ रत्नागिरी/ सिंधुदूर्ग/ ठाणे/ नाशिक/ जळगाव/ धुळे/ अहमदनगर/ पुणे/ कोल्हापूर/ सांगली/ सातारा/ सोलापूर/ औरंगाबाद/ बीड/ जालना/ लातूर/ नांदेड/ उस्मानाबाद/ परभणी/ नागपूर/भंडारा/ चंद्रपूर/ गडचिरोली/ वर्धा/ अमरावती/अकोला/बुलढाणा/यवतमाळ.

विषय : महामंडळामध्ये नियुक्ती दिलेल्या चालकांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधीच्या कागदपत्राची तपासणी करणेबाबत.

संदर्भ : (१) Administrative Circular No.72, STO/ADM/114, Dated 18.10.1950.
(२) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क.३५/१९९९.
क्र.राप/ आस्था/माजा-२/७५०७, दिनांक २०.१२.१९९९.
(३) सामान्य स्थायी आदेश क्र.५०३ मधील कलम २६ व्दारे केलेली तरतूद.
(४) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/यूआर/७४१, दिनांक १०.०२.२०१४.
(५) या कार्यालयाचे पत्र क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/यूआर/५९४२, दिनांक ०९.१२.२०१५.
(६) कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क.३६/२०१५.
क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/६०६४, दिनांक १५.१२.२०१५.

या कार्यालयाच्या संदर्भ (६) मध्ये नमूद केलेल्या परिपत्रकाव्दारे चालक (कनिष्ठ) पदी नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचे शैक्षणिक अर्हतेचे दाखले संबंधित शिक्षण मंडळाकडून तपासणी करण्याबाबतच्या सूचना दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करावी. सदर परिपत्रकातील परिच्छेद (३) मधील दोन ओळी वगळून खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

"या कार्यालयाकडे मुक्त विद्यापीठाचे प्रमाणपत्र असलेल्या उमेदवारांना अपात्र ठरवून दिल्ली बोर्डाच्या खोट्या प्रमाणपत्राच्या आधारावर काही उमेदवारांना पात्र ठरविण्यात येत असून खरी पात्रता सिध्द करु शकणा-या उमेदवारांवर अन्याय झाला आहे, अशा आशयाचा तारांकित प्रश्न उपस्थित केला आहे व वृत्तपत्रामध्ये देखिल उलट-सुलट बातम्या प्रसारित झाल्या आहेत".

त्याच बरोबर संदर्भ क्र.५ मध्ये दर्शविण्यात आलेला दिनांक ०९.१२.२०१५ ऐवजी ०८.१२.२०१५ असा वाचण्यात यावा.

या परिपत्रकाव्दारे अशा सूचना देण्यात येत आहेत की, ज्या विभागाच्या चालक (कनिष्ठ) पदाच्या निवडयाद्या अद्यापपर्यंत जाहीर झालेल्या नाही, अशा विभागांनी चालक (कनिष्ठ) पदाची निवडयादी जाहीर झाल्यानंतर राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली यांची शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सदर प्रमाणपत्र (सेकंडरी स्कूल एक्झामिनेशन सर्टिफिकेट) धारण करणाऱ्या उमेदवारांचे दाखले प्रथम राष्ट्रीय मुक्त विद्यालय संस्था, नवी दिल्ली येथे तपासणीसाठी पाठविण्यात यावे. तपासणीअंती सदरचे दाखले वैध आढळल्यास उमेदवारांना चालक (कनिष्ठ) पदी नियुक्ती देण्यात यावी. जर सदरचे दाखले बनावट आढळल्यास उमेदवारांना नियुक्त्या देण्यात येऊ नयेत व पुढील उचित कार्यवाही करावी.

उपरोक्त अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती वेळोवेळी मध्यवर्ती कार्यालयाला अवगत करावी.

प्रादेशिक व्यवस्थापक यांनी प्रदेशांतर्गत विभागाच्या वर नमूद केलेल्या कार्यवाहीवर कार्यक्षम नियंत्रण ठेवावे व वेळोवेळी अहवाल मध्यवर्ती कार्यालयाकडे पाठविण्यात यावा.

सदरची बाब अत्यंत महत्वाची समजण्यात यावी.

उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक.

<u>प्रत सादर रवाना :</u>

(१) मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे स्वीय सहाय्यक यांना मा.अध्यक्ष महोदयांच्या अवलोकनार्थ सादर करण्यासाठी.

(२) मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव यांना मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या अवलोकनार्थ सादर करण्यासाठी.

(३) सचिव, म.रा.मा.प.महामंडळ यांना उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्न क्र.३८२८० च्या अनुषंगाने माहितीस्तव.

महाव्यवस्थापक (कवओस).

f:\documents and settings\vc md\desktop\chalak aharta tapasani.docx